
# ईश्वराचे मानवीकरण
# यहुदी, ख्रिस्ती व
# इस्लामी परंपरेत ईश्वराची संकल्पना
# अवर्णनीयचे वर्णन

ANTHROPOMORPHIC DEPICTIONS *of*

# God

*The* Concept of God in Judaic, Christian and Islamic Traditions

*Representing the Unrepresentable*




Zulfiqar Ali Shah

IIIT Books-In-Brief Series

# ईश्वराचे मानवीकरण
# यहुदी, ख्रिस्ती व
# इस्लामी परंपरेत ईश्वराची संकल्पना
# अवर्णनीयचे वर्णन

✻ लेखक ✻
ज़ुल्फिकार अली शाह

Institute of Objective Studies

© IIIT, 1444 AH / 2023 CE
IIIT, P.O. Box 669, Herndon, VA 20172, USA ● www.iiit.org
P.O. Box 126, Richmond, Surrey TW9 2UD, UK ● www.iiituk.com

*This book is in copyright. Subject to statutory exception and to the provisions of relevant collective licensing agreements, no reproduction of any part may take place without the written permission of the publishers.*

**ISBN : 978-93-91659-24-0**

*The views and opinions expressed in this book are those of the author and not necessarily those of the publisher. The publisher is not responsible for the accuracy of URLs for external or third-party internet websites, if cited, and does not guarantee that any content on such websites is, or will remain, accurate or appropriate.*

**Iswarache Manvikaran**
**Yahudi, khristi v Islami Paramparet ishwarachi Sankalpana**
**Avarniyche Varnan**
(Marathi)
**Zulfiqar Ali Shah**

**Translator : Hayatmahammed Pathan**
**Translation of Anthropomorphic Depictions of God - The Concept of God In Judaic, Christian and Islamic Traditions** Representing the Unrepresentable
IIIT Books-in-Brief Series

Original title in English was published in 2012 by IIIT

First published in Marathi, 2023
Published in India by: Institute of Objective Studies
162, Jogabai Main Road, Jamia Nagar, New Delhi 110025
email: ios.newdelhi@gmail.com | www.iosworld.org

Distributed by
Genuine Publications and Media Pvt. Ltd.
B - 35 (LGF), Nizamuddin West, New Delhi 110013
Tel.: +91-11-41827475, 24352732, 24352048
email: info@genuinepublications.com | www.genuinepublications.com

Printed at Bosco Society for Printing and Graphic Training, New Delhi
Price: 100.00

# IIIT **संक्षिप्त पुस्तक मालिका**

IIIT संक्षिप्त पुस्तक मालिका संस्थेचा बहुमोल प्रकाशन संग्रह आहे. वाचकांना मूळ लेखनाचा गाभा कळण्यासाठी संक्षेपात दिलेला हा सार आहे. याची निर्मिती आटोपशीर स्वरूपाची आहे. तसेच वाचनास सोपी व वेळेची बचत करणारी आहे. बारकाईने लिहिलेला हा सारांश मोठ्या ग्रंथाचा जवळून घेतलेला धांडोळा आहे. हा प्रयत्न वाचकांना मुख्य लेखन वाचण्यासाठी प्रेरित करेल, अशी आशा आहे.

ज़ुल्फिकार अली शाह यांचे ॲन्थ्रोपोमॉर्फिक डेपिक्शन्स ऑफ गॉड : द कन्सेप्ट ऑफ गॉड इन ज्युडाइक, ख्रिश्चन ॲण्ड इस्लामिक ट्रॅडिशन्स हे पुस्तक खूप मोठे काम आहे. मूळ विस्तृत पुस्तक २०१२ साली इंग्रजीत प्रसिद्ध झाले. यात त्यांनी तिन्ही इब्राहिमी धर्मांतील ईश्वराच्या मानवीकरणाची स्थिती सखोलपणे अभ्यासली आहे. यासाठी त्यांनी जुना करार, नवा करार व कुरआन या अनुक्रमे तिन्ही धर्मांच्या ग्रंथांचा आधार घेतला आहे.

यहुदी व ख्रिस्ती धर्मांनी संपूर्ण इतिहासात ईश्वराचे आकलन होण्यासाठी प्रयत्न केले आहेत. इस्लामी धारणेच्या पूर्णपणेविरुद्ध असलेल्या या यहुदी व ख्रस्ती धर्मांच्या दृष्टीकोनाविषयी सदर लेखकाने मांडणी केली आहे. या धर्मांनी ईश्वर विषयक संकल्पना हाताळण्यासाठी चौकट कशी निवडली? ती चौकट, धर्मशास्त्राच्या चर्चेतून आलेले निष्कर्ष किंवा नंतरच्या शतकात चर्चने काढलेले फतवे धर्मग्रंथाला किती धरून आहेत? तसेच त्यांचे ग्रीक तत्त्वज्ञान सामावून घेणे या साऱ्यांचा लेखकाने सखोल अभ्यास केला आहे. शाह यांनी मानवीकरणविरोधातील इस्लामची मजबूत भूमिका, इस्लामी धर्मशास्त्राची तौहीदविषयक मांडणी, तसेच ईश्वराची ९९ नावे व त्यांचा मुस्लिमांच्या ईश्वरविषयक समजुतीचा अर्थ आणि विशेषणे याची मांडणी केली आहे. तसेच हे यहुदी व ख्रिस्ती धर्मांबाबत मुस्लिमांच्या मांडणीत कसे कसोटीचा दगड बनले आहेत याची चर्चा केली आहे. त्यांचे धर्मशास्त्रीय भाष्य व परिप्रेक्ष्य एकेश्वरवादाच्या विरोधात जात नसले तरी ते ही संकल्पना कशी पातळ करतात याची समीक्षा केली आहे. निधर्मीवादाने मांडलेल्या ईश्वर मरण पावल्याच्या चर्चेने ईश्वराचे मानवीकरण हा कळीचा मुद्दा झाला आहे. ईश्वराचा शोध ही गोष्ट, विशेषतः आजच्या काळात, बौद्धिक तृष्णेचा भाग झाली आहे.

शाहांच्या मते, मानवीकरण व शारीरीकरण संकल्पना ही आधुनिक निरीश्वरवादाची प्रमुख कारणे आहेत. यावरून शाह अंतिम निष्कर्षावर पोचले आहेत. ते सांगतात की, उत्तरआधुनिक काळातील ईश्वर शोधाची तहान पूर्वआधुनिक काळातील मानवीकरण व शारीरीकरण संकल्पना भागवू शकणार नाहीत. या संकल्पनांनी ईश्वराला या विश्वात निश्चित ऐतिहासिक कार्य देऊन निश्चित अशा जागेवर खाली आणले आहे. त्यातून ईश्वराची ओळख असलेल्या आध्यात्मिक व बौद्धिक शक्तीचा घट केला आहे. त्याने ईश्वराच्या पवित्रतेची जाण व त्याच्याविषयीची श्रद्धा यांपासून माणसांना पथभ्रष्ट केले आहे.

धर्मशास्त्रीय चर्चेत ऐतिहासिकदृष्ट्या केंद्रबिंदू असलेल्या या विषयावरील कोणत्याही अभ्यासासाठी किंवा वादविवादासाठी डॉ. शाह यांचा ग्रंथ उपयुक्त ठरणारा आहे.

संक्षिप्तीकरण : **जुल्फिकार अली शाह**

**Translation of Anthropomorphic Depictions of God - The Concept of God in Judaic, Christian and Islamic Traditions**
Representing the Unrepresentable
या मूळ ग्रंथाच्या संक्षिप्त इंग्रजी आवृत्तीवरून.

ISBN hbk : 978-1-56564-576-9
ISBN pbk : 978-1-56564-575-2
2012

# विषय प्रवेश

सदर पुस्तक यहुदी (ज्यू), ख्रिस्ती व इस्लाममधील ईश्वराच्या मानवीकरणाचा (Anthropomorphism) व शारीरीकरणाचा (Corporealism) यांचा सखोल अभ्यास आहे. (मानवीकरण म्हणजे ईश्वराने मानवी शरीर धारण करून पृथ्वीवर अवतरणे आणि शारीरीकरण म्हणजे ईश्वराला माणसासारखे शरीर आणि अंग असल्याची कल्पना करणे किंवा तसे अनुचित स्वरूप प्रदान करणे). यासाठी यहुदींचा जुना करार, ख्रिस्तींचा नवा करार आणि कुरआनचा आधार घेतला आहे. तसेच नंतरच्या धर्मशास्त्रीय मांडणीचाही तपशीलवार अभ्यास आहे. यात मानवीकरणाच्या अनुषंगाने झालेले धर्मग्रंथावरील भाष्य, अन्वयार्थ आणि धर्मशास्त्रीय समीक्षा यांचा विचार केला आहे. या गोष्टींचा ईश्वराच्या धारणेविषयी तिन्ही धर्मांच्या अनुयायांवर झालेला लक्षणीय प्रभाव तपासला आहे.

ईश्वराने त्याच्या नैतिक प्रतिमेतून माणसाला निर्माण केले. म्हणजेच मानवजातीने न्याय, समता, निःपक्ष व्यवहार, एकमेकांसाठी आदर, सहानुभूती, प्रेम, करुणा व परोपकार आदी गुण असलेल्या ईश्वराच्या सन्मार्गावर वाटचाल करत जीवन जगणे आहे. याउलट मानवजातीने ईश्वराच्या अगदी मूलभूत नैतिक आदेशांचा भंग करणे पसंत केले. त्याने ईश्वराच्या कृपेची परतफेड तो स्वतःसारखा मानवरूपी असल्याचे कल्पून केली. शब्दातीत अतिशायी ‘इतर’ असलेल्यास ओबडधबड संरचनेच्या व अवकाशाच्या क्षेत्रात आणले. हेही कशासाठी तर छुपे आपमतलब व स्वार्थी आकांक्षेसाठी. इब्राहिमच्या लेकरांनी (म्हणजेच सेमिटिक जाणीव असलेल्यांनी) शब्दातीत व अतिशायी असलेल्या ईश्वराला अतिशय खाजगी, राष्ट्रीय स्वरूप दिले आणि त्याचे मानवीकरण केले. यामुळे तो त्यांच्यापेक्षा जादा मोठा, बलवान व घातक असा पण, त्यांचीच आवृत्ती बनला. या माणसांनी त्यांचे निरनिराळे खाजगी, सामूहिक व राष्ट्रीय हेतू, कर्मकांड, कल्पना, पसंती-नापसंती आदी ईश्वरावर आरोपित करण्यापर्यंत मजल गाठली. ते जराही कचरले नाहीत. त्यातून त्यांनी संकुचित अशा राष्ट्रीयत्व, कबिला, वंश, राजकारण, विचारधारा आणि अगदी धर्मशास्त्राला आकार दिला.

भूप्रदेश, वंश व ऐतिहासिक व्यक्ती किंवा खास दैवी धारणा वा नियम या मर्यादित कारकांना उच्चस्थानी नेऊन ठेवत मानवजातीने या अनंतपटीने हलके असलेल्या अशा अनेकांना एकमेव व अंतिम असलेल्याच्या शेजारी उभे केले. या सर्वांचे स्वरूप व मूल्ये अशाश्वत असूनही त्यांना एकमेव अशा शाश्वताच्या जागी स्थान दिले. त्याने केलेले हे भ्रष्ट धाडस, राष्ट्रीय वा वैयक्तिक स्वरूपाच्या ईश्वराची ही मानवी कल्पना माणसांना तिखट प्रतिक्रिया, हिंसक विरोध आणि त्यातून येणाऱ्या शून्यत्वाकडे घसरत नेणे भाग आहे. प्रबोधनाचा देववाद, त्यापाठोपाठ वैज्ञानिक अज्ञेयवाद आणि शेवटी निरीश्वरवाद हा त्याचा परिपाक आहे. विज्ञानविकासाची न थांबवता येणारी घोडदौड आणि निधर्मी मानवतावाद व भौतिकवादाने धर्म व ईश्वराच्या संकल्पनेची घेतलेले जागा याने नव्या सांस्कृतिक भावनिष्ठेला जन्म दिला. त्यातून येणाऱ्या धाडसी मांडण्यांनी मानवी धारणांची घट्ट पकड घेतली; जसे, कार्ल मार्क्सने धर्माला लोकांचा अफू म्हटले. या सर्वांमुळे याच जीवनात जास्तीत जास्त भौतिक गरजा भागवणे आणि हे सुख-समाधान मृत्यूनंतर स्वर्गासारख्या ठिकाणी घेण्यासाठी पुढे ढकलण्याची गरज नाही हा विचार मानवी आनंदाची गुरुकिल्ली बनला. अर्थात जीवनाच्या अर्थाची उकल करणे, भौतिक समस्यांना आध्यात्मिक व नीतिमूल्यांची उत्तरे देणे आणि मृत्यूनंतरच्या जीवनासाठी तयारी करणे या धर्माच्या मूळ कारणांचा विसर पडला. तसेच मानवी अहंकार सुखवू न देणे, लालसा, वासनेचा स्वैराचार आणि ताबडतोब सुख-समाधान मिळवण्याची भूक न भागवणे या धर्माच्या मूळ कारणांचा विसर पडला.

दरम्यानच्या काळात जे जे गुणात्मक, संख्यात्मकरित्या मोजता येत नाही, किंवा साधं निरीक्षण करता येत नाही ते ते कालबाह्य समजले गेले. म्हणून अतिशायी असलेला ‘इतर’ जो उपयुक्ततेच्या परीघाबाहेर आणि त्याविरुद्ध आहे, जो अनुभवजन्य वैज्ञानिक तथ्याच्या स्वरूपात स्वतःला मांडत नाही, तो निरर्थक ठरला. धर्माला केवळ बालसुलभ भीती व अनुभवांचा परिपाक म्हणून नाकारण्यात आले. श्रद्धेच्या बाबतीत याचा परिणाम अतिशय गंभीर व हानिकारक झाला. तो इतका की अगदी अमेरिकन ईश्वरशास्त्रवेत्ता हार्वी कॉक्स यांनीही त्यांच्या प्रचंड खपाच्या द सेक्यूलर सिटी पुस्तकात ईश्वर मरण पावल्याचे जाहीर केले आणि अतिशायीऐवजी मानवतेचे दैवीकरण केले.

वक्तव्यांपेक्षा आकडेवारी जास्त बोलकी असते. वैज्ञानिक कारणमीमांसा व निधर्मी मानवतावादात गुंतलेले कर्मठ पाश्चात्त्यांचे नवे धाडसी जग आपल्या जाणीवेतून देव-धर्माला काढून टाकण्यात काही प्रमाणात यशस्वी ठरले आहे. मात्र, ते मानवी दुःखे, विषमता व हिंसेला संपवू शकले नाही. मानवी इतिहासातील खरोखर काही भयंकर युद्धे निधर्मी विचाराच्या आणि हिटलर व मुसोलिनी यांसारख्या हुकूमशहांच्या फलकांखाली लढली गेली. काहीजण म्हणू शकतील की, प्रबोधनयुगाची आशा ऑश्वित्झच्या यहुदी छळछावणीत मरण पावली. समाजवाद व साम्यवादाचे मधुप्रेम १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीनंतर, चिनी क्रांतीनंतर व रशियाच्या अफगाणिस्तानवरील आक्रमणानंतर धुळीस मिळाले. भांडवलवाद व विज्ञानयुगाचे तेज दोन विश्व युद्धांत काळवंडले.

इतकेच नाही तर निरीश्वरवादाच्या कल्पना मागील काही शतकांत स्वतःच तयार केलेल्या समस्यांमध्ये गुरफटल्या आहेत. उदा. शून्यवाद, निरर्थकता, अफाट क्षमतेच्या माणसांना लुटणे आणि आशा बाळगणे की ती धार्मिक दृष्टीकोनातून आल्याचे समजले जावे. या समस्या अतार्किक व गंभीर आहेत. त्या ईश्वर, विश्वनिर्मिती व सार्थक जीवनावरील श्रद्धेपेक्षा जास्त गंभीर आहेत.

ईश्वराचा वेध मानवी स्वभावाचा अंगभूत गुण आहे. कारण तो जीवनाच्या अर्थाचा, माणसाच्या अस्तित्वाच्या उद्देशाचा वेध आहे. ही वैश्विक ओढ समजून घेण्यासाठी दैवीकरण केलेली मानवता उपयोगी नाही. या समस्येवरील खरा उपाय 'तो दुसरा' आहे. जो गूढ, वर्णनाच्या पलीकडे आहे, अतिशायी आहे. जो सगळ्यांच्या अस्तित्वाचे कारण आणि माणसांच्या जीवनार्थ शोधाच्या ध्यासाचे अंतिम उत्तर आहे. मानवी यातना, अस्वस्थता व शोधाचे सच्चे उत्तर या अस्तित्वाच्या अतिशायी स्रोताला दिल्या जाणाऱ्या योग्य प्रतिसादात आहे. ते त्याच्या स्वरूपाविषयी चिंता करण्यात किंवा त्याच्या अस्तित्वाविषयी केवळ श्रद्धा बाळगण्यात नाही. धर्म ही पूर्णपणे विषयात्मक अनुभूती आहे. त्यामुळे ईश्वर मोजमापातून समजून घेता येत नाही. तर तो आंतरिक भाव व संवादातून समजून घेता येतो. अशा प्रकारच्या प्रतिसादासाठी स्वतःची पूर्ण गुंतवणूक हवी, त्यासोबत आध्यात्मिक कसरती व धर्मपरायणता, वाहून घेणे, शिस्तबद्धता व नैतिक जीवनशैली गरजेची आहे.

दयाभाव असणारी ही जीवनशैली माणसाला स्वार्थ, लालसा, अहंकार व संकुचित ओळख यांच्या बेड्या तोडून मुक्त होण्यासाठी सक्षम करते. त्यामुळे खरे ईश्वरीय ऐक्य प्रतिबिंबित होते आणि त्यातून पुढे निर्माण होणारे मानवी ऐक्य, अस्तित्व व विश्वही प्रतिबिंबित होते.

अन्याय व हिंसाचार माजलेल्या जगात, जो बहुतांशवेळा ईश्वराच्या नावाने होतो, पुढे जाण्याचा मार्ग हा आपली पातळी ओळखण्यात आहे. आम्ही माणसांनी हजारएक वर्षे आपल्या कल्पनेत ईश्वराची प्रतिमा पुन्हा रचण्यात आणि त्यातून दैवी-मानवी संबंधास पुन्हा त्याच्या योग्य स्थानी प्रस्थापित करण्यास प्रेरणा घेण्याची गाठलेली पातळी ओळखणे गरजेचे आहे. आपण इथवर कसे आलो हे समजून घेतल्याशिवाय हे साध्य करणे शक्य नाही.

एकंदर लेखकाच्या मते उत्तरआधुनिक व उत्तरनिधर्मी काळात ईश्वराचा शोध हा पूर्वआधुनिक मानवीकरण आणि शारीरिकरणाच्या संकल्पनेच्या साहाय्याने घेता येणार नाही. या संकल्पनांनी थेट ईश्वराला त्याची स्पष्ट ऐतिहासिक कार्ये व स्थान ठरवत खाली खेचले आहे. त्याचे स्थान घटवत खालच्या स्थानावरील ईश्वर केले आहे. हे माणूस भटकण्याचे कारण बनले. त्याच्या केवळ उल्लेखाने माणसाच्या मनात आदरयुक्त भीती व पूज्यभाव निर्माण व्हायला पाहिजे. पण वरील कारणामुळे तसे होत नाही.

प्रकरण पहिले

# मानवीकरणवादाची समस्या व वर्गवारी

निधर्मवाद, तात्त्विक भौतिकवाद, अज्ञातवाद व उघड निरीश्वरवादाने २१ व्या शतकातील धार्मिक क्षेत्र घुसळून काढले आहे. ते इतके की सच्ची श्रद्धा असणारे धार्मिक लोक अल्पसंख्य झाले आहेत. निधर्मीकरणाच्या प्रक्रियेतून देश पुढे जात असल्याने पाश्चात्त्य श्रद्धा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. हे श्रद्धेचे व ईश्वराचे मरण अतिशायी ईश्वराविषयी शतकांच्या सामान्य देववादी मांडणीतून आणि खास करून यहुदी (ज्यू) व ख्रिस्ती मांडणीतून आले आहे.

गेली अनेक शतके तत्त्ववेत्ते, बुद्धिजीवी व शास्त्रज्ञ ईश्वरविषयक देववादी मांडणी खूप मानवीकरण असलेली, आदिम, गोंधळात टाकणारी आणि गुंतागुंतीची असल्याचे सांगत आले आहेत. त्यामुळे अतिशायी ईश्वर व त्याच्या संस्था माणूस आणि त्याच्या परिसरासाठी गैरलागू झाल्याचे ते सांगतात. धर्माने घातलेल्या बंधनांतून, त्याच्या माणूस व विश्वाच्या कथित अन्वयार्थातून वैज्ञानिक व सांस्कृतिक निर्मितीवर देवाच्या नावाने घातलेल्या बंधनातून माणसाला मुक्त करण्यासाठी देव मरण पावल्याची हाक देणे गरजेचे वाटले. या दृष्टीकोनाने माणसाला स्वायत्त, त्याच्या संस्कृती व नियतीचा अर्मयादित निर्माता मानले. त्यांनी देव हा माणसाच्या भीतीतून आणि विश्वात देव-देवतांना स्थान देत त्यांना आपले संरक्षक मानण्याच्या प्राथमिक जाणिवेतून उदयास आल्याचे गृहीतक अधोरेखित केले गेले. साधी मांडणी असल्याने या दृष्टीकोनास काही मूलभूत गोष्टींकडे दुर्लक्ष करणे भाग पाडले. या दृष्टीकोनाने माणसाची ईश्वरावरील श्रद्धा, काळागणिक त्याचे वाढते ज्ञान व वाढत्या बुद्धिमत्तेनुसार अधिक उन्नत होत गेल्याच्या तथ्याकडे दुर्लक्ष केले आहे. प्राथमिक अवस्थेपासून सुविकसित संस्कृती व सुसज्ज अभिसंस्कृतीपर्यंत झालेल्या मानवी विकासाकडे आणि त्यातून धर्म हा विषय बौद्धिक पातळीवर पोचल्याच्या तथ्याकडे दुर्लक्ष केले आहे. पूर्वी धर्म बौद्धिक विषय नसल्याचे समजले जात होते, याकडेही या दृष्टीकोनाने दुर्लक्ष केले आहे. अर्थात व्यापक प्रमाणात शिकवल्या जाणाऱ्या विज्ञान व तत्त्वज्ञानाने मानवी संस्कृती व तिच्या कामकाजातून ईश्वराची गरज काढून टाकली. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर विश्वनिर्माता म्हणून भजला जाणारा ईश्वर आज माणसाचा

व त्याच्या परिसराचा निर्मिक म्हणून स्वीकारला जात नाही. याउलट माणसाने त्याच्या कल्पनेतून ईश्वराची निर्मिती केल्याचे आपल्याला वारंवार सांगितले जाते.

मानवी कल्पनेतून देवाचा उगम झाल्याचा सिद्धांत वा विचार हा अलीकडचा नाही. त्याचा शोध ख्रिस्त जन्माच्या आधी सहाशे वर्षे मागे ग्रीक तत्त्वज्ञ व कवी झेनोफेन्सपर्यंत (इ.पू. ५७०-४७०) जातो. असेही सांगितले गेले की धर्म व ईश्वर हे नैसर्गिक पर्यावरण व माणसाच्या परिसराचा अन्वयार्थ लावण्याच्या आणि तो नियंत्रित करू पाहण्याच्या, तसेच त्याचे कोड्यात टाकणारे व विचलित करणारे तत्त्व स्पष्ट करण्याच्या मानवी इच्छा व प्रयत्नातून निर्माण झाले आहेत. पंधराव्या शतकात फ्रान्सिस बेकन (इ.स. १५६१-१६२६) यांनी नोंदवले की, मानवी समजूत विश्वाच्या स्वभावा वर आधारित नसून तर ती स्पष्टपणे मानवी स्वभावाच्या जवळ असणाऱ्या कारणांवर आधारित आहे. ही महत्त्वाची निरीक्षणे नव्या युगाच्या कसमोहोर (हॉलमार्क) आहेत; म्हणजेच विज्ञानाचे युग. बेकन यांनी म्हटले आहे की, माणसाने ईश्वराचे मानवीकरण केले आहे.[१] मानवी विचार प्रक्रियेचे निरीशमानवीकरण ही विज्ञान व अनुभवजन्यवादाची गरज आहे. सोळाव्या शतकात फ्रेंच लेखक बर्नार्ड फॉन्टेनली (इ.स. १६५७-१७५७) यांनी मानवी विचार व संस्कृतीच्या विकासासाठी वैश्विक स्वरूपाची क्रांतिकारक अशी अभ्यासचौकट प्रदान केली आहे. त्यांनी सांगितले की, माणसाने जे अज्ञात आहे, जे दिसू शकत नाही त्याचे स्पष्टीकरण त्याला ज्ञात असलेल्या आणि दिसणाऱ्या घटकांच्या आधारे केले आहे. माणसाच्या नियंत्रणापलीकडे असलेल्या नैसर्गिक शक्तींनी लोकांना कल्पना करण्यास भाग पाडले की, या शक्ती माणसापेक्षा जास्त ताकदीच्या आहेत; त्या मानवी जीवन व नियती लक्षणीयरित्या प्रभावित करू शकतात.[२] नैसर्गिक शक्तींमधील विविधता प्राथमिक दैवतांची संख्या सांगते. या दैवतांचे स्वरूप मानवी आहे. कारण त्या माणसाच्या विचारातून व परिस्थितीतून जन्माला आल्या आहेत. मानवी विचार पद्धतीतील व संस्कृतीतील बदलांप्रमाणे या दैवतांचे स्वरूप, गुणवैशिष्ट्ये व विशेषणे बदलत जातात. आदिम लोकांनी त्यांच्या दैवतांना ओबडधोबड गुणवैशिष्ट्ये चिकटवली. उदा. शरीर, शारीरिक गुण आणि प्राथमिक स्वरूपातील मानवीकरणाची गुणवैशिष्ट्ये आदी. शिक्षित व अधिक विकसित समूहांनी दैवतांना अधिक विकसित स्वरूप व गुण चिकटवले. जसे; प्रेम, करुणा,

आध्यात्मिक अस्तित्व व अतिशायी गुणवैशिष्ट्ये. कोणत्याही समाजात देव किंवा दैवतांच्या धारणेतून त्या समाजाची संस्कृती व त्याचे उन्नत स्वरूप प्रतिबिंबित होते.

आधुनिक काळात संशोधक डेव्हिड ह्युम (इ.स. १७११-१७७६) यांनी या दृष्टीकोनाचा पाया घातला. त्यांनी देवतांच्या मानवीकरणाच्या स्वरूपाचे तपशीलवार विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, ईश्वरविषयक धारणा कारणमीमांसेतून प्रकटलेल्या नाहीत; त्या जीवनाविषयीची नैसर्गिक अनिश्चितता व भवितव्याविषयीची भीती यातून प्रकटलेल्या आहेत. ईश्वरविषयक संकल्पनेकडे उत्क्रांती पद्धतीने पाहात ह्युम यांनी मूळ उगमाचा एकेश्वरवादाचा सिद्धांत नाकारला. त्यांनी आदिम स्वरूपाचे धर्म मर्तिपूजक किंवा बहुदेववादी असल्याची मांडणी केली. ह्युम यांच्या मते ईश्वरविषयक कल्पनेचा उगम माणसाने त्याच्या आशा व भीतीचे ब्रह्मांडात आरोपित केलेल्या मानुषीकरणाचा आणि देवांच्या स्वकल्पनारचित प्रतिमांच्या उपासनेचा परिणाम आहे.[३] आपल्या परिचित मानवी वर्गाप्रमाणे सर्व अज्ञात शक्तींना मानवी रूप देण्याचा हा कल आपल्या दैवी श्रद्धेचा पाया आहे. ह्युम यांच्या या विश्लेषणाने धार्मिक तत्त्वज्ञानाच्या व समाजशास्त्राच्या अनेक संशोधकांसाठी संदर्भबिंदू म्हणून मार्गदर्शनाचे काम केले आहे. त्यांनी ह्युम यांच्याशी सहमती दर्शवत त्यांची मते उद्धृत केली आहेत. उदा. ऑगस्त कोम्त, लुडविंग फायरबाख, एडवर्ड टेलर, सिगमंड फाइड, थॉमस द क्विन्सी, रॉबर्ट ब्रॉवनिंग, मॅथ्यू अर्नोल्ड, रेरार्ड मेनली हॉपकिन्स, एमिली ब्रोन्ट, जॉ.पॉल सार्त्र, मॉरिस मरल्यू पोन्टी, अल्बर्ट कामू, ए.जे. आयर व इ.डी. क्लेम्के. फायरबाख यांनी सांगितले की, 'धर्मशास्त्र हे मानवशास्त्र आहे. धर्माचा उद्देश, ज्याला आपण ग्रीकमध्ये थिओस व आपल्या भाषेत गॉड (ईश्वर) म्हणतो तो, माणसाच्या दैवीकरणाशिवाय दुसरा कोणताही आशय सांगत नाही. म्हणून धर्माचा इतिहास माणसाच्या इतिहासाशिवाय दुसरे काहीही नाही.'[४] त्यांनी जोर देऊन सांगितले की, माणसाचा ईश्वर माणूस आहे. पारंपरिक धर्म लोकांच्या अफूशिवाय दुसरे काहीही नाही आणि म्हणून तो नष्ट केला पाहिजे; जेणे करून लोकांना त्यांच्या गाढ निद्रेतून जागे करता येईल. विज्ञान हे काम करू शकते.

एकोणिसाव्या शतकात चार्ल्स डार्विन यांनी त्यांचा नैसर्गिक निवडतत्त्वाचा सिद्धांत पुढे आणला. त्यांनी ईश्वर सृष्टीचा निर्माता व रचनाकार

असल्याच्या आणि निसर्गाला उद्देश, रचना व तो अपरिवर्तनीय असल्याच्या पारंपरिक धर्मवादी मांडणीला बाजूला सारले.[५] माणसाला खास पद्धतीने तयार करणारा ईश्वर प्रेमळ आहे ही संकल्पना बायबलच्या (नवा करार) आधिभौतिक मांडणीचा पाया आहे. जगाकडे पाहण्याचा ख्रिस्ती दृष्टीकोन माणसाचा घसरण्याचा स्वभाव, बलिदानाद्वारे मुक्ती देणारा दैवी हस्तक्षेप, म्हणजेच मुक्तीसाठी येशूंचे सुळावर चढणे आणि पुन्हा जिवंत होणे याभोवती विकसित झाला आहे. डार्विनच्या दृष्टीकोनाने आणि निसर्ग स्वायत्त, स्वयंशिस्त व उत्क्रांतिकारक असल्याच्या अन्वयार्थाने पारंपरिक ख्रिस्ती दृष्टीकोन बाजूला सारला. त्याला कोपरनिकस, गॅलिलिओ व न्यूटन यांच्या वैज्ञानिक मांडणीने जितके मागे ढकलले त्यापेक्षा खूप जास्त डार्विनच्या मांडणीने ढकलले. डार्विनच्या सिद्धांताने आव्हान दिले आणि ख्रिस्ती आधिभौतिक मांडणीचा पाया चांगलाच हादरवला. डार्विनच्या उत्क्रांतीने प्रत्येक गोष्टीसाठी ईश्वर निर्मितीचा मूळ स्रोत असण्याची आणि विश्वाचा एकमेव सांभाळकर्ता असण्याची गरज संपुष्टात आणली. जर सृष्टी तिच्या मूळ आदिम घटकापासून नैसर्गिकरित्या उत्क्रांत झाली असेल आणि ती कोणत्याही बाह्य दैवी हस्तक्षेपाशिवाय नैसर्गिक निवडतत्त्वाच्या प्रक्रियेतून सतत उत्क्रांत होत असेल तर स्वाभाविकरित्या असे म्हणावे लागेल की, तिला अस्तित्वात येण्यासाठी, टिकून राहण्यासाठी व सातत्य ठेवण्यासाठी ईश्वराची गरज नाही.

धार्मिक क्षेत्रातून विरोध होत असतानाही उत्क्रांतीचा सिद्धांत एकोणिसाव्या शतकात आघाडीच्या सर्व विद्याशाखांना मार्गदर्शक तत्त्व बनला. परिणामी एकोणिसाव्या शतकातील अनुभववादी शास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व निसर्गवादी मंडळींनी ईश्वराला स्वर्गात किंवा येथील उपयोजनाच्या कक्षेबाहेर शोधले नाही. त्याचा शोध त्यांनी स्वतःच्या विश्वात घेतला; निसर्गात, मानवी आत्म्यात, मानसमध्ये किंवा मानवी समाजात शोधले. या सर्वांनी जवळजवळ एका सुरात त्याला माणसाच्या अनुभवात स्थान दिले. म्हणजेच माणूस ज्यामुळे कल्पना मिळवतो आणि तो त्याच्या भावनांनी प्रभावित होतो त्या मानसिक प्रक्रियेत स्थान दिले. दैवी कल्पनेचा उगम मानवी विश्वात झाल्याचे गृहीत धरून अनेक संशोधकांनी ईश्वर व धर्माच्या कल्पनेच्या उगमाचे नेमके स्थान शोधण्यासाठी अथक संशोधन केले. फादर विल्हेल्म श्मिट सारख्या

संशोधकांनी त्यांच्या संशोधानातील निष्कर्ष हे सिद्ध करण्यात खर्ची घातले की, आदिम धर्म सगळीकडे एकेश्वरवादी संकल्पनेनेच उगम पावले आहेत. त्याकाळी एकेश्वरवादाचे प्रमाण तुरळक कधीच नव्हते. बहुतांश मानवशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि अगदी काही कथित धर्मशास्त्रज्ञ यांनी हे सांगण्यात समाधान मानले की, साध्या स्वरूपाच्या आदिम संस्कृतींमधील प्राणिपूजा, क्षुद्रवस्तुपूजा आणि देवक (टॉटेम) यातून धर्माचा उगम झालेला आहे. याचाच पुढे विकास होऊन त्यातून बहुदेववादी, बहु-एकेश्वरवादी, एकेश्वरवादी आणि शेवटी आजच्या काळात मोठ्या प्रमाणात असलेले यहुदी, ख्रिस्ती व इस्लामसारखे नैतिक एकेश्वरवादी धर्म उदयास आले.

या विद्वानांमध्ये कितीही मतभेद असले तरी ते एका बिंदूवर सहमत आहेत. तो बिंदू म्हणजे, ईश्वराला स्वतःचे वास्तविक असे अस्तित्व नाही. तो त्याच्या अस्तित्वासाठी माणसांच्या गरजा, आकांक्षा आणि भीती यावर अवलंबून आहे. त्यांच्या मते, ईश्वर हा शब्द केवळ माणसाच्या सामाजिक विश्वाचे आणि आंतरिक, बाह्य कारकांचे वास्तवाभासन, व्यक्तीकरण किंवा प्रक्षेपण आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ईश्वर विषयक मांडणी ही माणूसविषयक मांडणी आहे किंवा फायरबाख यांच्या शब्दांत वर सांगितल्याप्रमाणे धर्मशास्त्र हे मानवशास्त्र आहे. ही ईश्वराविषयीची महत्त्वाची समजूत विसाव्या शतकापर्यंत चालत आली. मानवशास्त्रज्ञ क्लाऊड लेवी स्ट्रास यांनी सांगितले की, धर्मात निसर्गनियमांच्या मानुषीकरणाचा आणि निसर्गाचे मानवीकरण करण्याचा समावेश आहे.[६] समकालीन मानवशास्त्रज्ञ स्टिवर्ट गुथरी यांच्या मते, धर्म हा मानवीकरणवाद आहे.[७]

या निरीक्षणाच्या प्रकाशात आणि ज्ञात श्रद्धा परंपरांच्या अभ्यासात आपल्याला दिसते की, मानवीकरणवाद हा जवळजवळ सर्व पवित्र ग्रंथांत वेगवेगळ्या प्रमाणात सामावलेला आहे. या परंपरांचे पाईक असलेले बहुतांश धर्मशास्त्रज्ञ त्यांच्या पवित्र ग्रंथांतून मानवीकरणवाद काढून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न करताना दिसतात. कारण हे पवित्र ग्रंथ खुद्द अशा प्रयत्नांना नकार देतात. सर्व धर्म परंपरांचा धांडोळा घेणे इथे शक्य नाही. त्यामुळे आपण विकसित तीन सेमिटिक धर्मांपुरती निरीक्षणे नोंदवू. यहुदी, ख्रिस्ती व इस्लाम. हे धर्म इब्राहिमी श्रद्धा परंपरेतून उगम पावले असल्याचा त्यांचा दावा आहे. हिब्रू बायबल म्हणजेच जुना करार ग्रंथातील ईश्वराला मानवीगुण आरोपित

केले आहेत. तेही दोन्ही मानसिक व शारीरिक पातळीवर. माणूस हा आमच्या प्रतिमेत व आमच्यासारखा साकारला आहे हे सांगणे ईश्वराला अनुरूप ठरावे, अशी ही व्यवस्था आहे. ख्रिस्ती बायबल म्हणजेच नवा करार ग्रंथात ईश्वराला पूर्णपणे मानवी रूप दिले आहे; येशू ख्रिस्ताचे अवतरणे. काही यहुदी विद्वान आणि चर्चचे काही फादर सातत्याने यात दुरुस्ती करू पाहात असले तरी दोहोंच्या परंपरेत ईश्वराचे शारीरिक स्वरूपातील मानवीरूप काही संपलेले नाही (या प्रयत्नांविषयी पुढील प्रकरणात सविस्तर चर्चा आहे). या प्रवृत्तीला ठामपणे व सातत्याने थारा न देणारा एकमेव ग्रंथ कुरआन आहे. त्याने आदिम मानवीकरण आणि शारीरिक वर्गीकरणापासून ईश्वराचे संरक्षण केले आहे. यहुदी व ख्रिस्तींच्या प्राथमिक स्वरूपासारखा नसला तरी याबाबत मुस्लिम पंथांत संघर्ष तसा जुना आहे.

दुसऱ्या बाजूला ईश्वराविषयी मानवीकरणाची धारणा असलेल्या धर्मावर टीका करत आधुनिक काळातील अनेक विद्वानांनी, तत्त्ववेत्त्यांनी व शास्त्रज्ञांनी तिला नाकारले आहे. विज्ञानाचा विकास किंवा वैज्ञानिक आधिभौतिकता आणि निसर्गाच्या तांत्रिक अन्वयार्थामुळे धर्माविषयी उदासीनता आली आहे. तसेच या उदासीनतेचे काही अंशी कारण ईश्वर विषयक धार्मिक धारणांचे अतिरंजित मानवीकरणही आहे; विशेषतः यहुदी व ख्रिस्ती धर्माबाबत. निधर्मी माणसाला मानवीकरण केलेल्या, माणसासारख्या दिसणाऱ्या आणि माणसासारख्या कोणत्याही गोष्टीबाबत मर्यादा असणाऱ्या ईश्वराची गरज नाही. तो त्याच्या समस्यांची उत्तरे जगातच शोधू इच्छितो. तो अशा मर्यादित ईश्वराशिवाय जगण्यात आनंदी आहे. तरी सुद्धा या सर्वांसाठी आधुनिक माणसातील दूरीभाव, अगलभाव, व्यक्तिनिष्ठवाद, सापेक्षवाद आणि शून्यवाद हे भाव देखील जबाबदार आहेत. तसेच अतिशय अनिष्टसूचक आहे, दोस्तोएवस्कीच्या शब्दांत, 'जर ईश्वर नसेल तर मग सर्वकाही संमत आहे.'[८] सध्या धार्मिक मूल्ये सामान्यतः बांधून ठेवत नाहीत. नैतिक मूल्ये अंतिम नसली तरी ती सापेक्ष आहेत. ही मूल्ये अदृष्य होत आहेत; विशेषतः अमेरिका व युरोपमध्ये अनपेक्षित वेगाने ऱ्हासमान आहेत. तसेच साऱ्या विकसित जगात कौटुंबिक मूल्यांची घसरण होत आहे. सीएनएनच्या ९ मार्च २००९च्या एका पाहाणीत अमेरिका कमी ख्रिस्ती होत असल्याचे पुढे आले.[९] तसेच समकालीन धार्मिक व नैतिक आचरण वीस वर्षांपूर्वीपेक्षा खूप खूप वेगळे आहे. त्रितत्त्व, अवतार व मूळ पाप अशा अनेक

ख्रिस्ती धार्मिक धारणा, तसेच लैंगिक सभ्यता, जीवाचे रक्षण आणि कौटुंबिक आब अशा नैतिक मूल्यांबाबत सर्रास तडजोड केली जात आहे किंवा त्याचा अन्वयार्थ अशा पद्धतीने केला जातो की माणूस वेगळाच प्राणी बनतो. ईश्वराविषयी आधुनिक काळातील संकल्पना ही मागील शतकांतील आदरयुक्त भीतीसारखी निर्माण करण्यासारखी नाही. आधुनिक माणसाने स्वतःला धर्मवादी अतिशायी ईश्वरापासून दूर केले आहे. जगात ईश्वरभीरू लोक जरूर आहेत, पण बहुतांश लोक कुरआनात सांगितल्याप्रमाणे आहेत, 'त्या लोकांसारखे होऊ नका जे ईश्वराला विसरले आणि ईश्वराने त्यांना स्वतःला विसरवले' (५९:१९).

वरील चर्चा ईश्वरविषयक धार्मिक समजुतीविषयी दोन स्वतंत्र आरोपांकडे नेते.  पहिला आहे, मानवीकरणवाद. यात ईश्वराचे अस्तित्व पूर्णपणे नाकारलेले नाही. पण, ईश्वरविषयक भौतिक वर्णन हे माणसाच्या स्वतःच्या स्वरूपाविषयक समजुतीतून आले आहे. हे धर्माविषयी मानवीकरणाचा आरोप लावणाऱ्यांच्या मतास पाठिंबा देणार आहे. हा आरोप करणाऱ्या ग्रीक तत्त्वज्ञ झेनोफेन्सपासून असे सांगितले गेले की, ईश्वराने हे भौतिक जग निर्मिले आणि तो स्वतः माणसांपेक्षा वेगळा आहे. त्याला मानवी स्वरूप चिकटवणे, मग ते स्वरूप कितीही थोर असले तरी ते ईश्वरविषयक परिपूर्णतेची मोडतोड करणारेच आहे आणि ते ईश्वराविषयी कोणतेही वर्णन नसण्याच्या स्थितीपेक्षा खूप वाईट आहे.

दुसरा आरोप आहे कपोलकल्पनेचा. याचे पाठीराखे मानतात की, ईश्वर काल्पनिक असून त्याला खरे अस्तित्व नाही. अस्तित्वशास्त्रानुसार तो माणसांवर अवलंबून आहे. कारण त्यांनी स्वतःचा स्वभाव, गुणधर्म व गुणवैशिष्ट्ये यातून त्याला कल्पिले आहे. स्टिवर्ट गुथरी नोंदवतात की, धर्म मानवीकरण केलेला आहे असे जेव्हा लोक म्हणतात त्याचा अर्थ देवतांना मानवी गुण चिकटवलेले आहेत किंवा ईश्वराचे अस्तित्व असल्याच्या दाव्यात निसर्गाला मानवी गुण चिकटवलेले असतात. आधीच्या अर्थात धर्म प्रतीकात्मक कृतीची शक्ती प्रदान करत ईश्वराला माणसासारखे बनवतो. नंतरच्या अर्थात धर्म निसर्गात देवतांना पाहात त्याला माणसासारखे बनवतो. या आरोपांची सत्यता व खोली तपासण्यासाठी मानवीकरण व अतिशायी अशा काही महत्त्वाच्या संज्ञा स्पष्ट कराव्या लागतील.

**मानवीकरणवाद**

मानवीकरणवाद किंवा Antropomorphism हा ग्रीक शब्द Anthropos (माणूस) Morph (स्वरूप किंवा रूप) यावरून आला आहे. संज्ञा म्हणून हा शब्द आधुनिक असून तो अठराव्या शतकात आकारास आला. मानवीकरणवादाची सामान्य व्याख्या अशी होऊ शकते, जाणतेपणी वा अजाणतेपणी नैसर्गिक कारकांना मानवी गुणांमध्ये प्रकट करण्याचा खोलवर रुजलेला कल किंवा बिगरभौतिक, आध्यात्मिक कारकांना भौतिक स्वरूपात, विशेषतः मानवी स्वरूपात वर्णन करणे. धार्मिक संदर्भाने त्याचा वापर देवतांचे मानवी रूपात वा वर्गातील अनुभूती, अभिव्यक्ती व आवाहनाचा वैश्विक पातळीवरील मानवी कल प्रकट करतो. मानवी ईश्वर किंवा मानवी सदस्य असेही मानवीकरणवादाचा अर्थ सांगता येईल.

ईश्वर व धर्माचे होकायंत्र नियंत्रित ठेवण्यासाठी, म्हणजेच चर्चचा प्रभाव व माणूसविषयक, त्याच्या परिसरविषयक अन्वयार्थ नियंत्रित ठेवण्यासाठी अनुभववादी शास्त्रज्ञ व विद्वानांनी अतिकाल्पनिक दृष्य किंवा भौतिक मानवीकरणवादास पुढे केले. हा आरोप करताना त्यांनी माणसाशी तुलना करता येईल असे ईश्वराचे सर्व पैलू व्यापण्यासाठी त्याचा विस्तार केला. कोणतेही दैवी गुण किंवा वैशिष्ट्ये आध्यात्मिक असोत वा नैतिक असोत त्यांना मानवी क्षेत्राशी जोडत निव्वळ मानवीकरणवाद असे परिभाषित केले. त्यांनी मानवीकरणवादाचा आरोप इतक्या जोरकसपणे मांडला की, हे कोणत्याही दैवी गुणांना किंवा वैशिष्ट्यांना माणसाशी जोडण्याची शब्दशः चढाओढ लागली. मर्यादेच्या पलीकडे विस्तारत नेल्याने या आरोपाचे सत्त्व संपले. मूळ संदर्भाला लागून असलेले त्याचे सर्व विश्वसनीय अर्थ संपले. तो केवळ नावड व्यक्त करणारा शब्द बनला.

**अवतार** (Incarnation)

अवतार हा मानवीकरणवादाचाच भाग आहे. इथे माणूस ईश्वरासारखा किंवा ईश्वराच्या प्रतिमेतून साकारल्याचा विचार नसला तरी ईश्वराचे वर्णन मानवी स्वरूपात आणि मानवी वर्गात केलेले असते. पण अवतार ही संज्ञा खासकरून माणसाला ईश्वराच्या सत्य प्रतिमेत सादर करण्याबाबत आहे. जेकब न्यूस्नर यांनी केलेल्या व्याख्येप्रमाणे याचा अर्थ, ‘ईश्वराला हाडामांसी, शारीरिक, भावनिक व सद्गुणाच्या पातळीवर माणसासारखा आणि

मर्त्यांसारखी कार्यसाधने व कार्य प्रकार असणारा म्हणून प्रतिबिंबित करणे.'[१०] एकाच वेळी पूर्ण ईश्वर व पूर्ण माणूस ही येशूंविषयक ख्रिस्ती धारणा अवतार कल्पनेचा शिखर गाठणारी आहे. तसेच शारीरिकवाद व मानवीकरणवाद बाबतीतही टोक गाठणारी आहे. अनेक ख्रिस्ती विद्वान याउलटही मानतात. जर ईश्वर पूर्णपणे ऐतिहासिक व्यक्तीत प्रकट होत असेल आणि मानवी मर्यादा अगदी मृत्यूसारख्या वेदनादायक बिंदूपर्यंत अनुभवत असेल तर त्याच्या रूपाने आपल्यासमोर शारीरिकवादाचा कळसबिंदू आहे.

ईश्वराने मृत्यूची चव चाखण्याच्या धारणेने ईश्वर मरण पावल्याच्या सिद्धांताला हातभार लावला आहे. तसेच या धारणेने ईश्वराला आधुनिक संस्कृती व समाजासाठी अप्रासंगिक ठरवले आहे. कारण स्पष्ट आहे. जर ईश्वर सुळावर येशूंचा त्याग करत असेल तर, अशा ईश्वरावर आधुनिक माणूस कदापि विश्वास ठेवणार नाही. असा ईश्वर माणसाला सर्वांत जास्त गरज असलेल्या प्रसंगी त्याची साथ सोडणार नाही, याची काय हमी आहे? (आदम-ईव्हने) मनाई केलेले सफरचंद खाल्ल्याची साधी चूक ईश्वर माफ करू शकत नाही आणि येशू नावाच्या निर्दोष भल्या माणसाचे रक्त सांडून मुक्ती मिळेपर्यंत कोट्यवधी निष्पाप माणसांना, मुलांना, महिलांना अनेक शतके नरकासम आगीत छळतो; अशा ईश्वराविषयी आधुनिक माणूस गंभीरपणे शंका घेतो. विशेषतः अशा ईश्वराच्या न्याय, दया, प्रेमळ स्वभाव आणि विविधतेविषयी त्याला शंका वाटते. रक्त सांडून सुळाच्या माध्यामातून मुक्ती मिळवल्यानंतरही पाप नष्ट करत नाही किंवा नियंत्रित करत नाही असा ईश्वर व्यवहारवादी, सापेक्षवादी व तार्किक प्रत्यक्षार्थवादी आधुनिक संस्कृतीसाठी अप्रासंगिक आहे. हा ईश्वर रहस्यमय, विरोधाभासी व मानवीकरण केलेला आहे आणि त्याचा काही अर्थ लागत नाही. येशू ख्रिस्तांना अवतरित ईश्वर समजले जाते आणि त्यांना  रोमनांकडून ठार मारले जाते. यातूनच मनात कुठेतरी 'ईश्वर मरतो' हे बिंबणे अपरिहार्य आहे. थोडक्यात दैवीशक्तीच्या मानवीकरणाची परिणती ही माणसाचे दैवीकरण आहे. दैवी शक्तीला फेटाळल्यानंतर माणसाने समस्यांची स्वतःची उत्तरे स्वतःच्या ज्ञानातून व संस्थांमधून शोधणे भाग आहे. तो अतिशायी किंवा अपौरुषेय पारलौकिक क्षेत्रातून साह्य किवा मार्गदर्शन मिळवण्याकडे डोळे लावू शकत नाही. विज्ञान व तंत्रज्ञान देत असलेल्या उत्तरांसाठी कठीण प्रसंगी ईश्वराचा धावा करण्याचा जुना बोधात्मक गोंधळ दूर सारणे गरजेचे ठरते.

**अतिशायिता** (Transcedence)

दुसऱ्या बाजूला ईश्वरासाठी अतिशायी संज्ञा सर्रास वापरली जाते. त्यातून ईश्वराचे मार्गदर्शन सातत्य आणि भौतिक जगापलीकडे त्याचे स्वतंत्र अस्तित्व असल्याचे सांगितले जाते. सर्व दैवी विशेषणांमध्ये अतिशायी हे खूप खास विशेषण आहे. इतर सर्व भौतिक विशेषणे व अलौकिकवाद त्यावर विसंबून आहेत. ईश्वर उपयोगितावादी स्थळ व काळाच्या पलीकडे असल्याने तो या सर्व विश्वाचा निर्माता आहे. इतकेच नाही तर अतिशायी संज्ञा स्वतः ईश्वर व त्याचे अस्तित्व, एकमेवाद्वितीयत्व, शक्ती व प्राधिकारी या त्याच्याविषयीच्या धारणाही सुचवते. तसेच या धारणा मानवनिर्मित नसल्याचेही सूचवते. म्हणून अनुभववादी सांगतात तसे या धारणा निरर्थक व पोकळ शब्द म्हणून निकाली काढता येत नाहीत. याउलट ईश्वर व त्याचे अवतरित संदेश ही मूलभूत साधने आणि या जगाच्या सार्थकतेचा आधार आहेत.

अतिशायिता म्हणजेच Transcedence या इंग्रजी शब्दाची व्युत्पत्ती लॅटीन मूळ शब्द Scando तून झाली आहे. त्याचा अर्थ 'मी वर चढतो' आहे. त्याला जर as, de व trans असे उपसर्ग लागले तर क्रमशः ascend, descend व transcend असे शब्द तयार होतात. म्हणून transcend चा शब्दशः अर्थ कोणतीतरी कोणाच्या तरी वर चढून गेला आहे किंवा काहीतरी वर उठलेला आहे आणि कशाच्या तरी पलीकडे गेलेला आहे. ही व्याख्या दोन बाबी सुचवते; जो पलीकडे गेला आहे तो आणि ज्याच्या पलीकडे गेला आहे ते या दोहोत अंतर आहे. तसेच ती या दोहोंचा परस्पर संबंध किंवा एकमेकांशी संदर्भ स्पष्ट करते. रूपक म्हणून Transcedence च्या अनेक अर्थच्छटा आहेत. तो अनेक अर्थाने वापरला जातो. तो कोणत्या संदर्भाने वापरला त्यावरून त्याचा अर्थ ठरतो हे रूपक या विषयात ईश्वराच्या संदर्भाने वापरण्यात आलेले आहे. तो एकमेव व सर्वांपेक्षा वेगळा व भौतिक जगाशी त्याचा शारीरीकरणाशिवाय असलेला खास संबंध स्पष्ट करण्यासाठी वापरला गेला आहे. ईश्वर Transcedence आहे याचा अर्थ तो या लौकिक जगातून वर गेला आहे, असा त्याचा अर्थ होत नाही. तर तो या लौकिक जगाच्या पलीकडचा, सर्व नश्वर घटकांच्या पलीकडे असल्याचा अर्थ ध्वनित होतो. तो किंवा त्याची शक्ती मर्यादित मानवी विश्वासारखी संपणारी नाही, असे त्यातून

सांगायचे असते. तो नश्वरांसारखा कदापि असणार नाही. ईश्वर अतिशायी संरचना आहे, न तोडता येणारी स्थलिक व कालिक गरज आणि या सर्वांच्या संदर्भात मुक्त असणारा आहे.

**अतिशायिता : तात्त्विक अन्वयार्थ**

वर चर्चा केलेली अतिशायितेची धार्मिक संकल्पना ही तत्त्वज्ञ लावत असलेल्या अर्थापेक्षा वेगळी आहे. त्यांची अतिशायितेची धारणा त्यांच्या दैवी अंतर्शायितेच्या थेट विरोधात जाणारी आहे. ते ईश्वराविषयीचे ऐक्य व एकत्व जोर देऊन सांगतात आणि त्याचे अस्तित्व शुद्ध ठेवण्यासाठी त्याची सर्व मानवी वैशिष्ट्ये व विशेषणे तोडून टाकतात. त्याही पुढे जात ते त्याचा इहलोकाशी संबंध पूर्णपणे तोडतात. काही बाबतीत त्याचा या इहलोकाविषयीचा अधिकारही संपुष्टात आणतात. ही अतिशायितेची टोकाची धारणा अगदी पायथॅगोरस व प्लेटोवाद्यांपासून झिरपत फिलो व नवप्लेटोवाद्यांसह तिन्ही धर्मपरंपरांमधील असंख्य तत्त्वज्ञ व धर्मशास्त्रज्ञांपर्यंत आली आहे. ते दैवी वास्तवासाठी ईश्वरला स्रोत मानतात, त्यापासून बाकी सर्व वास्तव प्रकट झाले आहे; जाणतेपणी किंवा अजाणतेपणी. जशी सूर्यापासून प्रकाशकिरणे प्रकटतात तशी.

**अंतर्शायिता** (Immanence)

अंतर्शायिता ही अतिशायितेच्या विरुद्धार्थी संज्ञा समजली जाते. अंतर्शायी म्हणजे ईश्वर लौकिक सृष्टीत किंवा भौतिक जगात व्यापून असणे. इंग्रजी शब्द Immanence ची व्युत्पत्ती लॅटीन मूळ शब्द manere पासून झाली आहे. त्याचा अर्थ राहाणे किंवा उरणे आहे. त्याला in शब्दयोगी अव्यय लागला तर त्याचा अर्थ कशात तरी राहणे किंवा कशात तरी उरणे होतो. यात नोंद घेण्यासारखे म्हणजे तो ज्यात राहतो किंवा उरतो, तो त्यापेक्षा वेगळा असतो. त्या दोहोत फरक करता येतो. जर तसे नसते तर दोन्ही एकमेकांचा भाग असले असते; ते वेगवेगळे राहिले नसते. त्यामुळे काही राहण्याचा किंवा उरण्याचा प्रश्नच येत नाही. हे तथ्य लक्षात घेतले तर असे सांगता येईल की, अंतर्शायी संज्ञा ही जशी समजली जाते तशी अतिशायीच्या थेट विरुद्धार्थी नाही. ईश्वर अतिशायी असण्याच्या संकल्पनेत ईश्वर व जग यांच्यात एक खास प्रकारचा संबंध गृहीत धरलेला आहे. अतिशायीमध्ये तो इतरांपासून पलीकडे जातो. इथे 'इतर' आवश्यक घटक आहे. म्हणजेच तो

इतरांपेक्षा वेगळा असल्याशिवाय पलीकडे जाऊ शकत नाही. अतिशायी ईश्वराचा भौतिक जगाशी जो संबंध आहे तो निर्मिकाचा व त्याचा सांभाळकर्ता म्हणून. तो जगाच्या निर्मितीचा व त्याच्या अस्तित्वाचा मूळ व एकमेव स्रोत आहे. ईश्वर या भौतिक जगात राहतो आणि तो त्याच्या अस्तित्वाच्या प्रत्येक पैलूसह अंतर्शायी आहे. त्याची शाश्वत शक्ती, ज्ञान, प्राधिकार, संरक्षण व इतर अनेक अनंत वैशिष्ट्ये, परम विशेषणे व गुण यांच्यासह विद्यमान आहेत पण, त्यासोबत अस्तित्वशास्त्र सांगते त्यानुसार तो या जगापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. म्हणून अतिशायितेविरुद्ध अंतर्शायिता किंवा वेगळ्या शब्दात निसर्गाच्या पलीकडे जाण्याच्या विरुद्ध निसर्गात विद्यमान असल्याचे जेव्हा सांगतो, तेव्हा आपण आपल्या अपुऱ्या मानवी भाषेत स्वयं व एकच अस्तित्वाच्या एकमेकांपासून वेगळे असलेल्या दोन पैलूंविषयी सांगत असतो. यामुळे अतिशायिता व अंतर्शायिता वेगवेगळ्या नसून एकमेकांशी संबंधित आहेत. ते एकमेकांना पूरक आहेत; कारण त्यांच्यात एकमेकांचे काही गुण सामाईक आहेत.

अशा पद्धतीची धार्मिक अतिशायिता सेमिटिक (यहुदी, ख्रिस्ती व इस्लाम) धर्मांसाठी केंद्रस्थानी आहे. सश्रद्ध माणसांच्या व्यक्तिमत्त्वावर अतिशायी ईश्वरावरील श्रद्धा खोलवर प्रभाव टाकते. त्यातून त्यांचे संपूर्ण विश्वच आकारास येते. स्वतःपुरती मर्यादित ठेवता येईल, अशी ही श्रद्धा नाही. यामागे एकप्रकारची निकड व त्वरा असते. सच्च्या श्रद्धावान माणसाचे सर्व क्रियाकलाप त्याच्या अतिशायीविषयीच्या विशिष्ट श्रद्धेप्रमाणे आकार घेतलेले व बरहुकूम असतात. कारण त्यांच्यासाठी तो अतिशायीच त्यांच्या अस्तित्वाचा एकमेव स्रोत असतो. एक, अद्वितीय, परिपूर्ण असा भौतिक विश्वापेक्षा वेगळा असला तरी तोच त्याचा स्रोत आहे आणि राखण करणारा व भविष्यासाठी मार्गदर्शन करणारा आहे.

अतिशायी ईश्वराच्या मानवीकरण व शारीरीकरणाविषयी या सेमिटिक परंपरेतील अनुयायींनी स्वीकारलेल्या दृष्टीकोनात काही अंशी फरक आहे. सादिया इब्न जोसेफ (सादिया जेऑन) (इ.स. ८८२–९४२), मोझेस मैमोनीद्स (इ.स. ११३५–१२०४) यांच्यासारख्या मध्ययुगीन यहुदी धर्मशास्त्रज्ञ व तत्त्ववेत्त्यांनी आणि आपल्या काळातील आधुनिक विद्वानांनी वेगवेगळ्या पद्धतीने अन्वयार्थ लावून मानवीकरणाचा प्रकार काढून

टाकण्याचा किंवा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी यहुदी धर्मग्रंथ (हिब्रू बायबल, जुना करार) ईश्वराचे मानवीकरण करणाऱ्या वर्णनांनी व तशा मांडणीने ओतप्रोत भरलेले आहे. त्यामुळे या बुद्धिजीवींचा मानवीकरणवाद हटवण्याचे प्रयत्न कृत्रिम ठरतात. येशू ख्रिस्तांविषयी मताग्रह व अवताराची ख्रिस्ती धारणाही मानवीकरणच आहे. ख्रिस्ती परंपरेत ईश्वर एक व अतिशायी असल्याच्या धारणेवर पुरेसा जोर देऊन सांगितलेले आहे. असे असले तरी ईश्वरी अवतार व पिता, मुलगा, माणसाच्या रूपात ईश्वर, पृथ्वीवर ईश्वर, ईश्वराची आई असे शब्दप्रयोग वारंवार केले जातात. तसेच ईश्वराचा चेहरा, हात दर्शवण्यात येतात. या सर्वांचा मानवी मनावर परिणाम होतो आणि त्याच्या मनात ईश्वराचे शारीरीककरण रुजते. इस्लाम ईश्वर अतिशायी असल्याचे जोर देऊन सांगतो. त्याचे धर्मग्रंथ या अतिशायीस कोणत्याही स्वरूपाच्या मानवीकरण व शारीरीकरणापासून जाणीवपूर्वक जपतात.

पुढील प्रकरणांत बायबल (जुना करार, नवा करार) व कुरआनात असलेल्या अतिशायिता व मानवीकरणाच्या प्रवृत्तीचा तपशिलात धांडोळा घेऊयात.

प्रकरण दुसरे

# मानवीकरणवाद व हिब्रू बायबल (जुना करार)

हिब्रू बायबलमध्ये (तोरात, जुना करार) ईश्वराविषयी समजूत वेगळी आहे. तशीच ती पुढे पूर्ण यहुदी परंपरेत आली आहे. यात मानवीकरण व अतिशायिता या दोन्ही प्रवृत्तींचे मिश्रण आढळते. हिब्रू बायबलमध्ये ईश्वर अतिशायी वास्तव असल्याचे म्हटले आहे. तसेच त्याचे वर्णन मूर्त स्वरूपात मानवीकरणाच्या व शारीरीकरणाच्या संज्ञेत केले आहे. हे दोन ध्रुव किंवा दोन सूत्र संपूर्ण हिब्रू बायबलमध्ये एक समान किंवा एकमेकासोबत चालत असल्याचे दिसून येते. अभिजात काळातील प्रेषितांनी ईश्वराच्या मानवीकरणाचे उल्लेख कमी करण्याचा आणि त्याच्या अतिशायितेवर अधिकाधिक भर देण्याचा लक्षणीय प्रयत्न केला यात शंका नाही. असे असले तरी जुन्या करारात जिथे ईश्वराचे मानवीकरण किंवा तत्सम उल्लेख सापडणार नाहीत असे एखादं दुसरेच पान असेल. हिब्रू बायबलच्या धार्मिक धारणांमध्ये काळागणिक बदल होत असलेला दिसून येतो. ईश्वरासंबंधी अनेक प्रकारच्या संकल्पना जुन्या कराराच्या (हिब्रू बायबलच्या) वेगवेगळ्या भागांत पाहायला मिळतात. पशुदेववाद, बहुदेववाद, इष्टदेववाद, बहु-एकलदेववाद, राष्ट्रीय एकेश्वरवाद आणि वैश्विक व नैतिक एकेश्वरवाद, असे सर्व वाद इस्राइली लोक त्यांच्या आरंभीच्या इतिहासाच्या वेगवेगळ्या काळात व वेगवेगळ्या टप्प्यात आचरणात आणत असल्याचे दिसते. तसेच बायबलच्या रचनाकाराची मनाई नसल्यास बहुतांश सूचनांच्या बाबतीत कानाडोळा केल्याचे दिसते.

काही आधुनिक विद्वानांना पहिल्या आदेशात (शेमा) ईश्वरी ऐक्य, त्याची अद्वितीयता व अतिशायी स्वरूपाला पुष्टी दिसत नाही. ते सांगतात की, यातून बहु-एकलदेववाद किंवा एक याहवेवाद असल्याचे सिद्ध होते; पण काटेकोर एकेश्वरवाद सिद्ध होत नाही. त्यांच्या मते सिनाई पर्वताच्या शिखरावर एकेश्वरवादाचे स्पष्टीकरण झालेले नाही; कारण शेमा याहवेहशिवाय दुसऱ्या देवांचे अस्तित्व स्पष्टपणे नाकारत नाही. तसेच केवळ एका याहवेहचेच अस्तित्व असल्याचेही ठामपणे सांगत नाही. तोरातच्या संपूर्ण पंचग्रंथात अतिशायी एकेश्वरवादाची पुष्टी करणारे किमान एक वक्तव्य सापडणे खूप अवघड आहे. ऐतिहासिकदृष्ट्या सांगायचे तर, यहुदी लोक प्राचीन काळापासून ते आजच्या काळापर्यंत पहिला आदेश याहवेह एक असल्याचे

जोर देऊन सांगतो, असे मानत आले आहेत. दुसऱ्या बाजूला सरसर पाहणाराही पंचग्रंथात ईश्वर एक, एकमेव व अद्वितीय असण्यावरून ओढाताण असल्याचे सहज शोधून काढू शकेल. एका बाजूला याहवेह एक व एकमेव असल्याचे जोर देऊन सांगितले असले तरी, दुसऱ्या बाजूला या मांडणीकडे पार दुर्लक्ष झाल्याचे दिसते. यात इतर देवांचे अस्तित्व मांडूनच थांबण्यात आलेले नाही, तर शक्तिशाली याहवेह इतर देवांना मान्यता देतो आणि स्वतःसाठी इस्त्राइल देश ठेवून घेत इतर देवांच्या वाट्याला वेगवेगळे देश देतो, असे सांगितले गेले आहे. म्हणजेच याहवेह संपूर्ण मानवजातीचा वैश्विक ईश्वर नसून तो केवळ इस्राइल देशाचा ईश्वर आहे. तो इतर अनेक देवांमध्ये एक मोठा आणि इतरांपेक्षा वेगळा देव आहे.

धर्माचा अर्थ मानसशास्त्रीय आभास किंवा सामाजिक गरज असा लावण्यात आला आहे. वास्तविक पाहता असा अर्थ लावणारे बहुतांश पाश्चात्त्य मानवशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व शास्त्रज्ञ हे बहुतांश जुन्या कराराच्या रचनाकारांनी केलेली ईश्वराची स्थानिक, राष्ट्रीय, मानवीकरण आणि प्रगत स्वरूपाची मांडणी हाताळत असल्याचे दिसते. यहुदी, ख्रिस्ती व इस्लामसारख्या अतिविकसित धर्मांच्या पवित्र ग्रंथांच्या तुलनेत ईश्वराची स्थानिक, राष्ट्रीय व शारीरीकरण केलेली मांडणी हिब्रू बायबलमध्ये सर्वांत जास्त आढळते हे खरे. अवताराचे ख्रिस्ती धर्मशास्त्र हे ईश्वराचे मानवीकरण, शारीरीकरण व त्याच्या काही अन्वयार्थातील अनेकेश्वरवादी, देवांची धारणा यांचे समुच्चय व शिखर आहे. ते या सगळ्यातूनच आलेले आहे. असे असले तरी ख्रिस्ती नव्या करारात मानवीकरणाची मांडणी खूप जास्त नाही. मानवीकरणाचे अवतार धर्मशास्त्र ख्रिस्ती श्रद्धांळूंमध्ये प्रसिद्ध असले तरी वास्तविक पाहता ती नव्या कराराच्या अनेक अन्वयार्थाचा एक भाग आहे. कुरआनाचे धर्मशास्त्र खूप अतिशायी स्वरूपाचे आहे. ते प्राणिदेव ते बहुदेववादापर्यंत आणि बहुएकलदेवपासून ते एकेश्वरवादापर्यंत स्वतःला उत्क्रांत करत विकसित झालेले नाही.

हिब्रू बायबलमध्ये ईश्वराच्या मानवीकरणावर दिलेला जोर खूप गहिरा आहे. तोही इतका की बायबलच्या प्राचीन काळात ईश्वराचे मानवीकरण करत त्याला अतिशय स्पष्टपणे मानवी गुण व विशेषणे देत समोर आणले गेले. अगदी दहा आदेश हे ईश्वरीय 'बोटा'ने लिहिले गेले असल्याचे सांगितले गेले.

काही बाबतींत तर मानवीकरणवादाचा वापर ओबडधोबड व खूप उघड आहे. त्यात ईश्वराला मानवी अंग दिले असून त्यासोबत मानवी भावनाही दिल्या आहेत. तो अगदी माणसासारखे वर्तन करत असल्याचे दाखवले आहे (पुढे काही ठिकाणी तपशील चितारले आहे). मात्र, त्यांचा अर्थ कसा लावायचा, त्यांचा प्रभाव व ते आक्षेपार्ह आहे वा नाही, असे धर्मशास्त्रीय प्रश्न अनुत्तरितच ठेवले आहेत. याच्यासह इतर काही मुद्द्यांवर या प्रकरणात चर्चा केलेली आहे.

बायबलमध्ये ईश्वर मानवी स्वरूपात दिसतो. खातो, पितो, विश्रांती घेतो व ताजातवाना होतो. उदा. एका प्रसिद्ध उल्लेखात ईश्वर प्रेषित जेकबसोबत कुस्ती खेळतो. तो जेकबची मांडी निखळवतो. तो शारीरिकदृष्ट्या कमजोर असल्याचेही दाखवले आहे. तो जेकबवर शारीरिक नियंत्रण मिळवू शकत नाही. शेवटी पहाट उजाडत असल्याचे जेकबला सांगून तो स्वतःची त्याच्या मिठीतून सुटका करून घेतो. या कुस्तीमुळे ईश्वर जेकबचे नाव बदलून इस्राइल ठेवतो. इस्राइलचा अर्थ ईश्वराशी कुस्ती खेळणारा किंवा संघर्ष करणारा.

इस्राइली परंपरेच्या आरंभीच्या काळात ईश्वराला दृष्य मानवी स्वरूपाची विशेषणे दिली आहेत. हिब्रू ईश्वरात मर्त्य, मानवी, शारीरिक व मानसिक असे वर्गीकरण आढळते. तिथे ईश्वराला शरीर आहे. तो मयेमरीच्या मैदानात प्रेषित अब्राहम यांच्यापुढे गूढ मानवी स्वरूपात प्रकट होतो. अब्राहम त्याला साष्टांग घालतात, ईश्वराला पिण्यासाठी पाणी देऊ करतात, त्याचे पाय धुण्यासाठी परवानगी देण्याची विनंती करतात, त्याला खाण्यासाठी पाव देतात आणि ईश्वर विनंतीचा स्वीकार करतो आणि ते खातो (१८ :१-९). यातील उल्लेखानुसार पूर्ण मानवी स्वरूपात आलेला ईश्वर स्वतः याहवेह असल्याचे सांगेपर्यंत त्याला अब्राहम ओळखत नाहीत. इक्झोडस (३३ :११) मधील उल्लेखानुसार ईश्वराची पाठ पाहण्यास प्रेषित मोझेस यांना परवानगी दिली गेली. तसेच ईश्वराने त्यांच्याशी समोरासमोर एखाद्या मित्राप्रमाणे संवाद साधला. इस्राइलच्या ज्येष्ठ पुरुषांनीही ईश्वराला पाहिल्याचा उल्लेख आहे. (इक्झोडस २४ :९-१०).

हिब्रू बायबलमध्ये ईश्वराचे प्रकटणे सामान्य बाब आहे. अनेक ठिकाणी हे प्रकटीकरण पूर्ण मानवी स्वरूपात आहे किंवा मानवीकरणाच्या इतर प्रकारांत आहे. मानवीकरणाची कल्पना करण्याचे प्रकार आढळतात. यातील अनेक प्रकट ईश्वराला मनुष्यजातीच्या खूप जवळ आणतात. ते बहुतांश वेळा

मानवी स्वरूपाचे असते; पण तपशीलवार वर्णन व अंगउपांगांच्या बाबतीत फरक आढळतो. आणखी एक बाब खास नमूद करण्यासारखी आहे. ढगांच्या गडगडाटात, विजांच्या कडाडण्यात किंवा ढगांच्या मागे ईश्वर येतो, अशी कल्पना केली जाते. पण याचा अर्थ त्याला शारीरिक रूप नाही, असे नाही. तर उलट पापी हिब्रू त्यांच्या मर्त्य डोळ्यांनी त्याचे तेजस्वी वैभव पाहू शकत नाहीत. ही गोष्ट केवळ त्यांच्यातील पुण्यवान लोकांच्या आवाक्यात आहे. ते त्याचे विराट दर्शन साध्या शारीरिक डोळ्यांनी घेऊ शकतात.

लैंगिक सोडून बहुतेक सर्व मानवी अंगे ईश्वराला असल्याची कल्पना करण्यात आली आहे. ईश्वराला डोके आहे (इसायाह ५९ :१७; पाम ११० : ७). त्याच्या शिरावरील केस हे शुद्ध लोकरीसारखे आहेत (डॅनियल ७ :९ ). त्याचा चेहऱ्याचे वर्णन २३६ वेळा आले आहे. त्याच्या डोळ्यांविषयीचे उल्लेख २०० वेळा आलेले आहेत. त्याला नाक आहे (जेनिसीस ८ :२१), त्याच्या नाकपुड्यांतून धूर येतो, असे वर्णन आले आहे (पाम १८ :८). तो गंध घेऊ शकतो (एक्झोडस २५ :६). ईश्वराच्या कानाविषयी खूप वेळा उल्लेख आले आहेत (नंबर्स ११ :१, II सॅम्युएल२२ :७, पाम ८६ :१ ). ईश्वराला तोंड असल्याचे सांगितले गेले. त्याच्याशी मी तोंडाच्या तोंडात बोलू शकतो (नंबर्स १२ :८). त्याला ओठ आहेत; जीभ आहे व श्वासही आहे. तो रडतो, शोक करतो, दुःखाने आक्रोश करतो (जेरमियाह ९ :१०). तो चुका करतो. दुष्टपणा करतो व त्यासाठी खेदही प्रकट करतो (एक्झोडस ३२:११–१४). हिब्रू बायबल वाचणारा कोणीही एका निष्कर्षापर्यंत आल्याशिवाय राहात नाही. ईश्वराने स्वतःच्या हातांनी माणसाला घडवले व त्याला स्वतःसारखे शरीर दिले, अशी कल्पना हिब्रू बायबल रचणाऱ्यांनी केली आहे; हा तो निष्कर्ष.

ईश्वर मानवी स्वरूपात असला तरी तो अतिशायी आहे, असेही काही प्रसंगी सांगितले गेले आहे. त्याला मानवी आकार व गुण असले तरी तो दूर कुठेतरी स्वर्गात राहतो, अशी मांडणी केल्याचे आढळते. तो त्याच्या खास सिंहासनावर बसतो, शेरूबवर बसून उडतो (शेरूब म्हणजे पंख व मानवी चेहरा असलेला जीव), बागा तयार करतो, तोराह ग्रंथाचा अभ्यास करतो, प्रमुख म्हणून दैवी सभा भरवतो आणि तो स्वर्गातून पृथ्वीवरील लोकांशी थेट संवाद साधतो. ईश्वराच्या मानवीकरणाची काही वर्णने रूपक किंवा आधिभौतिक स्वरूपाची असल्याचे दिसतात. हा आधिभौतिक अन्वयार्थ मान्य होईल अशा

भाषेत ही वर्णने आहेत. पण बहुतांश वर्णनांच्या बाबतीत तसे म्हणण्यास जागा नाही. ईश्वरविषयक ही वर्णने पूर्णपणे शारीरिक व मानवीकरणाच्या स्वरूपातील आहेत. दुर्दैवाने अशा मूर्त व शारीरिक वर्णानांना रूपक किंवा आधिभौतिक अन्वयार्थाचा मुलामा देत बायबलचे अनेक संशोधक गोंधळात टाकतात. प्रसंगी हे संशोधक ईश्वराविषयीची त्यांची समज व त्याच्या स्वरूपाविषयीची त्यांची धारणा हिब्रू बायबलवर कृत्रिमरित्या थोपताना आढळतात. हा प्रयत्न ग्रंथाच्या मूळ लेखनाचा उद्देश व त्याच्या संदर्भांचा पूर्णपणे बचाव करणारा आहे.

बायबल परंपरेतील ईश्वराच्या मानवीकरणाचे मूळ जेनिसीस पुस्तकात आढळते. यहुदी तोराह व ख्रिस्तींच्या बायबलमधील पहिले पुस्तक. श्लोक क्रमांक १ :२६ मध्ये ईश्वराने जाहीर केल्याचे सांगितले गेले, 'नाअसेह आदम बेसेलमेनू किदेमुतेनू'. याचा अर्थ, आपण माणसाला आपल्या स्वतःच्या छबीत व (दिसण्यात) आपल्यासारखे घडवू या. याचा अर्थ लावताना अनेक रूढमतवादी अतिशयोक्तीपूर्ण दावा करतात, की हा श्लोक शारीरिक नाही तर आध्यात्मिक पैलूतून आला आहे. हिब्रू शब्द 'सेलेम' (छबी, प्रतिमा) व देम्यूत (सम, सारखे) हे बाह्य वर्णन सांगणारे शब्द आहेत. ते आंतरिक आध्यात्मिक लक्षणासाठी वापरले जात नाहीत.

हिब्रू ईश्वर त्यामुळे माणसासारखा दिसतो आणि बहुतांशवेळा माणसासारखा वागतो. ही ईश्वर-माणूस सदृष्य संकल्पना हिब्रू बायबलमध्ये मानवीकरण कल्पनेसह एकत्र गुंफलेली आहे. त्यामुळे हा माणसासारखा ईश्वर 'परिवर्तनीय' आहे आणि मुक्तपणे 'स्थळ व काळात' स्थिरावणारा आहे. तो स्थानांतर करतो, बदलतो व बदलांवर प्रतिक्रिया देतो. इतकेच नाही तर, हिब्रू बायबलमधील ईश्वर स्वतःचे मन बदलतो व निर्णयही बदलतो. उदा. प्रेषित मोझेस यांनी ईश्वराला त्याच्या काही वाईट निर्णयांसाठी खेद प्रकट करायला लावले आणि मन बदलण्यास ईश्वराला भाग पाडल्याची नोंद आढळते. प्रसंगी ईश्वर वंशीय छटा असलेला जनजातीय दिसतो, दुसऱ्या प्रसंगी तो उपासनेपेक्षा संपत्ती अधिकारांना जास्त महत्त्व देणारा रियल इस्टेट एजंट भासतो. तो प्रेषित अब्राहम यांच्याशी करार करतो, तो त्यांना व त्यांच्या वंशजांना वंशपरंपरागत हक्काने कायमस्वरूपी प्रॉमिस्ड लॅण्ड देण्याचे वचन देतो, पण काही कारणामुळे तो वचनपूर्ती करत नाही किंवा ते पूर्ण करण्याबाबत तो निरीच्छुक असतो. तो

प्रेषित मोझेस व इस्राइली लोकांना त्यांच्या इजिप्शियन शेजाऱ्यांची सोने-चांदीच्या वस्तू व कपडे यांची लूट करण्यास सांगतो. वारंवार तो अपयश, स्वप्न आणि भीतीच्या स्वरूपात हिब्रूंच्या महत्त्वाकांक्षा व त्यांचा राष्ट्रीय अजेंडा पुढे करताना दिसतो. म्हणून हिब्रू ईश्वरात परिपूर्ण अतिशायी व परिपूर्ण ईश्वर दिसत नाही. उलट तो अपूर्ण, शारीरिक व सांत ईश्वर दिसतो. जुना करार रचणाऱ्यांच्या सांत निर्मितीचे उत्पादन दिसतो.

सुरुवातीच्या काळात हिब्रूंसाठी नैतिक एकेश्वरवाद फार महत्त्वाचा मुद्दा नव्हता. त्यांच्या पितृसत्ताक ईश्वराला समजण्यासाठी इष्टदेववाद हीच योग्य संज्ञा आहे. प्रेषित मोझेस यांच्या आगमनानंतर बहुएकलदेववाद किंवा एक याहवेहवादाने इष्टदेववादाची जागा घेतली. त्याच वेळी ते अतिशय काटेकोर स्वरूपाचे नसले तरी बायबलच्या परंपरेत एकेश्वरवादाचे बीजारोपण करत होते. मोझेस यांचा याहवेह इर्ष्या करणारा ईश्वर आहे. त्याचे विश्व इतर देवांच्या अस्तित्वापासून मुक्त नसल्यामुळे ही इर्ष्या आलेली आहे. इतकेच नाही तर त्यांचा याहवेह मानवीकरणाच्या विशेषणापासून व गुणांपासून मुक्तही नाही. त्याला अतिशय ठळकपणे मानवीकरण व शारीरिक रूपात मांडले आहे. हा मानवीकरणाचा कल नंतरच्या प्रेषित परंपरेतही स्पष्टपणे दिसून येतो. ते एकेश्वरवादाचे खंदे समर्थक आणि त्वेषाने मूर्तीपूजेच्या, प्रतिमापूजेच्या विरोधात असले तरीही त्यांच्यात मानवीकरणाविषयी वेगळी भूमिका दिसत नाही. त्यांच्या ईश्वराला प्राथमिक ओबडधोबड संज्ञेत मांडलेले नसले तरी, शारीरिक व मानवीकरणाची लक्षणे स्पष्ट दिसतात. उदा. ईश्वराने त्याच्या छबीत व त्याच्यासारखे माणसाला घडवले. ईश्वर अतिशायी असल्याचे वरवर सांगणारी अनेक वर्णने आहेत. मात्र, दुसऱ्या बाजूला या अतिशायीत्वास गैरअर्थ काढण्यापासून किंवा कोणत्याही तडजोडीपासून काळजीपूर्वक जपलेले नाही. ईश्वरास मर्त्यांपासून जाणीवपूर्वक वेगळे करणाऱ्या बायबलमध्येच अनेकप्रसंगी ईश्वराला मर्त्यासारखे दाखवले आहे; त्याला मर्त्यांची गुण व वैशिष्ट्ये चिकटवली आहेत. संपूर्ण हिब्रू बायबलमध्ये अतिशायी व मानवीकरण यांच्यात एक प्रकारचा संघर्ष सुरू असल्याचे दिसते. पण, हा संघर्ष मानवीकरणवाद संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने निर्णायक स्वरूपाचा नाही.

यहुदी समुदायाला त्यांच्या धर्मग्रंथात ईश्वराच्या मानवीकरणाची उदाहरणे असणे फारसे खटकलेले नाही. अगदी इ.स. पूर्व पहिल्या शतकात

ग्रीक तत्त्वज्ञानाचा सफाया होईपर्यंत त्यांना फारसे काही वाटले नाही. त्याच्या नंतरच्या काळातही तलमूदमध्ये आलेले रब्बीनिक विचारही बायबलच्या परंपरेतील मानवीकरण काही अपवाद वगळता स्वीकारत असल्याचे दिसते. लिखित तोराहसह मौखिक तोराह किंवा तलमूदलाही यहुदी परंपरेत मोठे व मध्यवर्ती स्थान आहे. ईश्वराने प्रेषित मोझेस यांना लेखीसह तोंडीही तोराह किंवा कायदे दिल्याचे रब्बीनिक धर्मगुरू मानतात. 'हलखा लीमोशे मीसिनाई' चा अर्थच तो आहे. तलमूदमध्ये ईश्वर गाभाऱ्यातील खूप आतल्या बाजूस अतिशय उच्च व भव्य सिंहासनावर बसल्याचे वर्णन आले आहे. तो रब्बी इस्माईल यांना सांगतो, 'माझ्या मुला, मला दुवा दे.' यहुदी लोक ईश्वराला योद्धा किंवा सुशिक्षित लेखक समजत असल्याचे वर्णन मिरदाशमध्ये आहे. लाल समुद्राच्या किनारी हिब्रू लोक ईश्वराच्या दिशेने बोट दाखवत म्हणू शकले, 'माणसाने त्याच्या मित्राचा चेहरा पाहावा तशी त्यांनी ईश्वराची प्रतिमा पाहिली'. ईश्वर पारंपरिक 'टेफिलीन' या ताईतासारख्या काळ्या पेटी बांधतो. तो स्वतःची उपासना करतो आणि तोराह अभ्यासतो. तो सिंहासारखी आरोळी ठोकत म्हणतो, 'मुलांसाठी वाईट केले, ज्यांच्या पापासाठी मी माझे घर नष्ट केले आणि माझे मंदिर जाळले, त्यांना जगातील विविध देशांत परागंदा केले.' ईश्वर ठरलेला दिनक्रम पाळतो व लवायथन या विशाल जलचर जीवासोबत खेळतो. तलमूदमध्ये आलेल्या उल्लेखानुसार, 'दिवस बारा तासांचा असतो. पहिले तीन तास तो पवित्र, त्याला कृपा लाभो, तोरात घेऊन बसतो. दुसरे तीन तास तो संपूर्ण जगाच्या निवाड्यासाठी बसतो. जग दोषी व नष्ट करण्याच्या शिक्षेस पात्र असल्याचे पाहिल्यानंतर तो स्थानांतर करून निवाड्याच्या जागेवरून दयेच्या जागेवर बसतो. तिसऱ्या तीन तासांत तो साऱ्या जगाला खाऊ घालत असतो, अगदी शिंगे असलेल्या म्हशीपासून ते जीवजंतूपर्यंत. शेवटच्या तीन तासांत तो लिवायथनसोबत खेळतो ...'

हिब्रू ईश्वराचा रात्रीचाही क्रम आहे आणि तो हय्योथ (गंधर्व) यांची गाणी ऐकतो. जेरूसलेममधील मंदिर उद्ध्वस्त करण्याच्या कृतीवर, इस्राइली लोकांना परागंदा करण्याच्या कृतीवर वारंवार आक्रोश करत अश्रू ढाळत असतो; त्याचा हा आवाज जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत ऐकू येतो. त्याचा मनस्ताप व राग शांत करण्यासाठी तो त्याचा एक हात दुसऱ्या हातावर आदळतो. तो त्याच्या गुप्त कक्षात इस्राइलींच्या नियतीवर व जेरुसलेमचे मंदिर ध्वस्त करण्यावर रडतो. तो रोज त्याच्या तीन अपयशांवर

रडतो; पहिले पहिल्या मंदिरासाठी, दुसरे दुसऱ्या मंदिरासाठी व तिसरे मूळ स्थानावरून इस्राइली लोकांच्या परागंदा होण्याच्या अपयशावर.' ईश्वराविषयी निंदा स्वरूपाच्या या मांडणीची रब्बींना माहिती आहे. याचा पुरावाही त्यांच्याच म्हणण्यात आहे. 'धर्मग्रंथात असे असले नसते आणि असे कुणी बोलले असते तर त्याची जीभ छाटली असती', अशी कबुली त्यांनी दिली आहे.[११] इतकेच नाही तर धर्मग्रंथात जणू तो ईश्वराविषयी महत्त्वाचा भाग असल्याप्रमाणे ते या दैवी वेदना, आक्रोश व दुःखाच्या मिथकाचा वारंवार उच्चार करत आले आहेत. शेवटी ईश्वर स्वतः प्रसन्न करण्यासाठी जेरुसलेमला येतो आणि अग्नि परीक्षा देतो. ईश्वराने शिक्षा भोगणे व शुद्धी करून घेण्याचे उदाहरण अन्य सेमिटिक परंपरांमध्ये शोधूनही सापडणे कठीण आहे.

ईश्वर रडत असल्याची वर्णने वारंवार आली आहेत. एकेप्रसंगी तो जेरेमियाहला विनंती करत अब्राहम, इसाक, जेकब यांच्यासारख्या प्रमुख पुरुषांची सभा बोलवण्यास सांगतो, जेणे करून ते त्याचे सांत्वन करतील. शक्तिशाली सार्वभौम विश्वाला हतबल राजा लाभल्याचे सांगण्यात आले आहे. तो त्याच्या मुलांचे रक्षण करू शकत नाही, त्याच्या मंदिराचे रक्षण करू शकत नाही, त्याची उपासना प्रस्थापित करू शकत नाही. त्याचा अभिमान मोडून पडल्याने तो खुलेआम रडतो. इतर देशांनी थट्टा करू नये म्हणून तो त्याच्या अंतरंग कक्षात रडतो आणि सांत्वन करण्यासाठी त्याला प्रमुख मानवी पुरुषांना खासगीत बोलावण्याची गरज भासते. परंतु पाहाणे,  बघणे, प्रेम करणे, काळजी घेणे, मदत करणे याच्यासह इतर लहानसहान स्वरूपाचे मानवीकरण काही समस्या नाही. कारण ही विशेषणे माणूस व ईश्वर यांच्यात आवश्यक संपर्क, संवाद घडवून आणण्यासाठी गरजेची आहेत. अडचण तेव्हा उभी राहते जेव्हा आपला सामना अतिशय मूर्त स्वरूपाच्या मानवीकरणाशी होतो. असे मानवीकरण रीत सोडून पलीकडे जात ईश्वराला माणसासारखे रूप देते. जेनेसिस रब्बाहमध्ये इ.स. ४००-४५० दरम्यान आर. होशइयाह यांनी सांगितले, जेव्हा तो पवित्र, कृपावंत पहिला माणूस तयार करण्याविषयी सांगतो तेव्हा त्याच्या देवदूतांच्या मंत्रिमंडळाचा गैरसमज होतो (कारण ईश्वरासाठी माणूस त्याच्यासारख्या प्रतिमेत असल्याने) आणि त्याच्यापुढे ते 'हे पवित्र' (पवित्र म्हणजे, यजमानांचा स्वामी), असे सांगू इच्छितात. एक्झोडस १५:३ मध्ये स्पष्टीकरण देताना म्हटले आहे, '(जगाचा) स्वामी हा लढवय्या माणूस आहे; स्वामी त्याचे नाव आहे.' ईश्वराला प्रत्यक्ष

माणूस म्हणून सादर करण्यात ‘तलमूद’ला संकोच वाटलेला नाही. त्यात लिहिले आहे, माणूस शब्दाचा अर्थ ‘तो एक पवित्र’शिवाय दुसरा काही नाही, त्याच्यावर कृपा होवो. त्यात सांगितल्याप्रमाणे ‘ईश्वर लढवय्या माणूस आहे. ही मांडणी रब्बी जेकब न्यूसनरसाठी ‘मानवतेच्या स्वरूपात दैवी गोष्ट आहे.’

थोडक्यात रब्बीनिक ईश्वर असंख्य मानवी मर्यादांसह पूर्णपणे शरीर धारण केलेला ईश्वर आहे. रब्बीनिक धर्मशास्त्रात ईश्वराची संकल्पना कोणत्याही अर्थाने किंवा स्वरूपाने सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापी अशी नाही. तसेच ती एकेश्वरवादी अतिशायी धर्मशास्त्र सांगतात तशी स्वतंत्र ईश्वराचीही नाही. उलट ती यहुदी धर्म व राजकीय प्रेरणेचे प्रतिबिंब असल्याचे दिसते. रब्बीनिक ईश्वराची नियती यहुदी लोकांच्या नियतीशी बांधलेली आहे. तो त्यांच्या यातना भोगतो आणि त्यांच्या अपयशांवर आक्रोशपूर्ण रूदन करतो. असा आक्रोश करणारा व रडणारा ईश्वर विश्वाचा सर्वशक्तिमान ईश्वर असल्याचे सांगणे कठीण आहे.

ग्रीक विचारांनी अनेक यहुदी विचारवंतांना मानवीकरणवादी वर्णनांच्या शाब्दिक अर्थापासून दूर जात त्याचा आधिभौतिक अर्थ लावण्यास भाग पाडले. उदाहरण म्हणून सांगायचे तर ॲरिस्टोबुलस (इ.स. पूर्व १५०) आणि फिलो ज्युडीयस (इ.स. पूर्व २०–इ.स.४०) यांनी मानवीकरणवादी वर्णने काढून टाकण्यासाठी रूपक अन्वयार्थाचा जोरदार पुरस्कार केला. तेही इतक्या प्रमाणात की फिलो याने ईश्वराची सर्वच्या सर्व विशेषणे काढून टाकली. नंतरच्या मध्ययुगीन काळात सादिया जेऑन (इ.स. ८८२–९४२), बाहया इब्न पकुदा (इ.स. १०४०) आणि जुहा हा लेवी (इ.स. १०७५–११४१) यांनी मानवीकरणाच्या बायबली परंपरेला कडाडून विरोध केला. आपण शेवटी मोझेस मैमोनिद्स (इ.स. ११३५–१२०४) यांच्याकडे येतो. त्यांनी अशारीरिक ईश्वराची आग्रही मांडणी केली आणि ते नाकारणाऱ्यांना पाखंडी व धर्मभ्रष्ट ठरवले. मध्ययुगीन यहुदी तत्त्ववेत्त्यांना ईश्वराचे मानवीकरण त्रासदायक वाटत होते. त्याचे कारण त्यावर मुस्लिम धर्मशास्त्रज्ञांनी कठोर टीका चालवली होती. जाणकार म्हणून मैमोनिद्स यांचे स्थान व अधिकाराविषयी बहुसंख्य यहुदींना शंका वाटत नव्हती व ती आजही वाटत नाही. हे खरे असले तरी त्यांच्या हिब्रू ईश्वराला विवेकी बनवण्याच्या प्रयत्नास सहधर्मियांकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी त्यांच्या अशारीरिक ईश्वरास नकार दिला. त्यांनी मैमोनिद्स यांची

ग्रीकवादी मांडणी बहुसंख्य यहुदींच्या पारंपरिक व धर्मग्रंथ संमत मांडणीच्या विरोधात जाणारी असल्याचे मानले. परिणामी पुढच्या पिढ्यांमध्येही ईश्वराच्या मानवीकरणाची तीच मांडणी चालत आली.

मानवीकरणवादाचा खूप खालचा स्तर आपल्याला जेओनीम कालखंडात पाहायला मिळतो. या कालखंडातील सर्वांत भयंकर पुस्तक म्हणजे शिऊर कोमा यांचे 'ईश्वराच्या उंचीचा अंदाज' आहे. त्यात मानव स्वरूपातील ईश्वर विराट असल्याचे सांगितले आहे. गळा, दाढी, डावा-उजवा डोळा, वरचा-खालचा ओठ, पाय आदी प्रत्येक अंगउपांगांची लांबी-रुंदी फरसंगमध्ये सांगितली आहे (फरसंग म्हणजे लांबी मोजण्याचे जुने एकक. एक फरसंग म्हणजे चार मैल किंवा सहा किमी अंतर). मात्र, या पारलौकिक फरसंगाचे प्रमाण आपल्या फरसंगासारखे नाही. एक फरसंग म्हणजे दशलक्ष हात. एक हात म्हणजे चार वीत आणि एक वीत म्हणजे जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत भरणारे अंतर.' आणि राझियलच्या पुस्तकात म्हटले आहे, 'हे मोजमाप जो जाणतो तो कृपावंत आहे, कारण येणाऱ्या जगात त्याचा वाटा आहे.'[१३]

जुन्या-नव्या करारातील ईश्वराचे प्राथमिक स्वरूपातील मानवीकरणाचे अस्तित्व न नाकारता बायबली विद्वान व धर्मशास्त्रज्ञ त्यापासून दूर जात त्याच्या गरजेची त्यांना वाटत असलेली कारणे स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न करतात. पहिले व सर्वसामान्य कारण म्हणजे ईश्वर प्रत्यक्षात जसा आहे, तशीच कल्पना माणसाचे मन करू शकत नाही, हे गृहीतक. दुसरे कारण सांगितले जाते, प्राचीन काळातील लोकांमधील तात्त्विक समजचा अभाव. त्यामुळे जिवंत, सक्रिय, खासगी व वैयक्तिक अशा ईश्वराची कल्पना करण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. या दृष्टीकोनाला ईश्वराचे मानवीकरण असलेल्या वर्णनांची गरज होती. तिसरे कारण सांगितले जाते की, हिब्रू लोकांचा व्यवहारी स्वभाव, त्यांचा बेधडकपणा आणि त्यांच्या भाषेची भाषाशास्त्रीय संरचना.

परंपरेने मानले जाते की, हिब्रू बायबल (जुना करार) ईश्वराकडून अवतरित झालेले किंवा त्याच्या प्रेरणेतून आलेले आहे. असे असेल तर प्रश्न उपस्थित होतो की, मानवी स्वभावाची निर्मिती करणारा आणि त्याची इच्छा प्रकट करणारा ईश्वर लोकांपुढे स्वतःचे वर्णन योग्य शब्दांत सांगण्यात व योग्य वर्गीकरण

करण्यात अक्षम आहे का? त्याचे अस्तित्व कसे आहे आणि ते कशा पद्धतीने मांडले गेले पाहिजे, हे लोकांना सांगण्यात तो अक्षम आहे का? तो प्राथमिक व ओबडधोबड स्वरूपाच्या मानवीकरणावर अवलंबून का आहे? शेवटी त्याने माणसाला स्वतःविषयीची मूलभूत तथ्ये व सत्यता समजून घेण्याची क्षमता व आवाका दिला आहे, जेणे करून त्याला अंतिम वास्तव व सत्य समजून घेता येईल. वास्तविक पाहता अशा पद्धतीच्या शारीरीकरणाच्या संज्ञांचे असणे हे बायबल धर्मग्रंथ मानवी कृतीचा परिपारक असल्याचे सांगते. प्रगतिशील वा उत्क्रांत होत जाणारा ईश्वरी संदेश आणि प्राथमिक, ओबडधोबड मानवीकरण हे अशारीरिक ईश्वराला समजण्यातील किंवा त्याला योग्य शब्दांत मांडण्याच्या मानवी मर्यादेतून आल्याचे गृहीत धरले तर आणखी एक मोठे गृहीतक जन्माला येते. म्हणजेच बायबलमधील हा भाग दैवी नसून मानव रचित आहे. ईश्वराला समजून घेण्यातील मानवी मर्यादा व अक्षमता हे काही त्याला मूर्त मानवी स्वरूप व आकारात मांडण्याचे कारण असू शकत नाही. सर्वांची ज्यावर सहमती आहे, असे स्वरूप व गुण त्या ईश्वरात नाहीत. ईश्वराला रडायला किंवा आक्रोश करायला न लावताही त्याच्या प्रेमाविषयी व क्षमाशीलतेविषयी जोर देऊन सांगता येते. तसे ते कधीही शक्य आहे. स्वतः ईश्वर दिवसभरात तोराहची २४ पुस्तके वाचतो आणि रात्री मिशना (मौखिक तोराहचा संग्रह) वाचतो, असे न सांगताही तोराहचे महत्त्व इतर अनेक मार्गांनी अधोरेखित करता येते. त्यासाठी ते ईश्वराला वाचायला लावण्याची गरज नाही. एकीकडे ईश्वराचा तीन तासांचा दिनक्रम, त्याचे लिवायथनसोबत खेळणे आणि दुसरीकडे त्याला समजून घेण्यात माणसाच्या मर्यादा असल्याची कारणे सांगणे या दोहोंचा एखाद्याने मेळ तरी कसा लावायचा! इथे परिस्थिती जरा विचित्र दिसते. इथे माणूस ईश्वराला समजून घेतो आहे, इतकेच काय ईश्वराला जाणण्यात तो खूप पुढे गेला असून त्याला ईश्वराची तपशीलवार माहिती आहे. अगदी त्याचा खासगी दिनक्रम आणि तोही मिनिटागणिक माहीत आहे. गूढ ईश्वराची इतकी माहिती योग्य व सुव्यवस्थित संवादाशिवाय शक्य नाही. अतिशायी ईश्वर अशा मर्यादांच्या खूप खूप पलीकडे आहे.

दुसरे असे की, ईश्वराच्या मूळ अतिशायी व एकत्वाला विरूप व अहितकारी असणाऱ्या संज्ञा, वर्गीकरण व गुणवैशिष्ट्ये वापरून तत्त्वज्ञानहीन व्यक्ती वा देशाला ईश्वर समजावून सांगण्याची गरज नाही. गंमत म्हणजे आपण वर चर्चा केलेलीच आहे, तीच हिब्रू भाषा वापरून त्याच देशाच्या व संस्कृतीच्या नागरिकांनी अतिशायी ईश्वर समजून घेतला आणि तसा तो

अशारीरिक, मानवीकरण नसलेल्या संज्ञांमधून मांडलाही. याचा अर्थ ईश्वराचे मानवीकरण भाषेचा अंगभूत गुण किंवा हिब्रूंची व्यावहारिक गरज वा हिब्रू राष्ट्राच्या उद्दामपणाचा भाग आहे. तसे असेल तर त्याचे स्वरूप वैश्विक घडामोडीचा भाग असले पाहिजे. ते तसे नाही. मग त्याचे औचित्य काय? विरोधाभास असा की, मूळ पुरूष वा मोझेस किंवा इतर थोर प्रेषित हे ठाम एकेश्वरवादी होते असे सांगणारे विद्वानच प्राथमिक व ओबडधोबड मांडणीतून ईश्वराला समजून घेण्याचे, त्याची कल्पना करण्याचे समर्थन करतात आणि या प्रयत्नाच्या बचावासाठी युक्तिवादही करतात. स्पष्टपणे सांगायचे तर एकाच वेळी दोन्ही मार्गांनी जाता येत नाही. या विद्वानांनी सांगितल्याप्रमाणे, जर प्रेषित मोझेस किंवा इतर प्रेषितांचे धाडसी म्हणणे लोकांना ईश्वराविषयीची त्यांची धारणा बाळगण्यापासून रोखू शकले नाही, तर ते काही बायबलच्या प्राथमिक मानवीकरणवादी वर्णनांचे प्रमुख कारण असू शकत नाही किंवा तसे ते असता कामा नये. आदिम समाजाच्या ईश्वरीय धारणांविषयीदेखील असेच सांगता येईल.

अडचण अशी की बायबल आदिम हिब्रू लोकांची किंवा हिब्रू राष्ट्राची रचना नसून ती  शब्दशः ईश्वराची वाणी समजले गेले आहे. समाजाची आदिमावस्था, भाषेच्या रचनेची आणि लिहिण्याची मर्यादा, किंवा इतर असे कोणतेही घटक मानवी क्रियाकलापात सक्रिय होतात. ईश्वर चुकीची तथ्ये सांगत नाही किंवा सत्य सांगण्यात चूक करू शकत नाही. तो चुकत नाही. म्हणून ही कारणे बायबली मानवीकरणवाद स्पष्ट करण्यासाठी एकमेव वास्तविक कारण असल्याचे सांगता येत नाही. ईश्वराची आदिम मानवीकरणाची प्रत्यक्ष माणसासारखी विविध रूपे व त्यांचे अस्तित्व, तसेच बायबलमधील संभ्रम, विसंगती स्पष्ट करण्यासाठी इतर तार्किक कारणे, सूचना व आधार यांना जागा ठेवली पाहिजे. हिब्रू बायबलमधील विसंगतीचे प्रमुख कारण व स्पष्टीकरण मानवी क्रियाकलाप आहेत. हिब्रू बायबलच्या संकलनात व प्रसारात मानवी क्रियाकलापांची ही भूमिका आज मान्य करण्यात आली आहे. याचे श्रेय वरील तार्किक गोष्टींना जाते.

यहुदी मंडळी अनेक शतके प्रेषित मोझेस यांना ईश्वराने आदि पुरुषांना दिलेल्या कायद्याचे संकलक किंवा अचूक सांगायचे तर मध्यस्थ म्हणून पाहात होती. ही परंपरा पुढे ख्रिस्तींनी उचलली. मोझेस मैमोनिद्स यांचे आठवे तत्त्व

पुढील शब्दांत आहे, 'तोराह ग्रंथ ईश्वराकडून आला आहे. आमची श्रद्धा आहे, ईश्वराने संपूर्ण तोराह आमचे गुरू मोझेस यांच्यामार्फत दिला ...'[१४] म्हणून ते ईश्वराचे अचूक शब्द आहेत. तसे पाहिले तर हे शब्द अतिशय स्पष्ट आहेत व स्वतःविषयी जोरकसपणे सांगतात. यहुदी लोक तोराहच्या दैवी उगमावर व संपूर्ण तोराह मोझेसमार्फत पोचल्याविषयी अगदी आधुनिक काळ सुरू होईपर्यंत ठाम श्रद्धा बाळगून होते. तोराह बिनचूक, अपरिवर्तनीय व शाश्वत असल्याची त्यांची श्रद्धा होती. तोराहचा शब्दशः अर्थ घेण्याच्या विरोधातील आवाजात क्लेमेंटाइन होमिलीस, सेंट जेरोम व थिओडोर मॉपसस्टिया (मृत्यू इ.स. ४२८) यांच्यासारखे ख्रिस्ती विद्वान, तसेच बाराव्या शतकात इसाक इब्न याशूह, राशी, डेव्हिड किमही व अब्राहम इब्न इझरा (मृत्यू इ.स. ११६७) यांच्यासारख्या काही यहुदी विद्वानांचा समावेश होता. पुढे सोळाव्या शतकात कार्लस्टॅट, ॲण्ड्रीस मासियस (इ.स. १५७४) यांनी आणि सतराव्या शतकात आयझॅक दी पेयर (इ.स. १६५५) व रिचर्ड सायमन, थॉमस हॉब्ज आणि नंतर स्पिनोझा. मात्र, अठराव्या शतकातील कारणमीमांसेच्या काळात प्रेरित ग्रंथ म्हणून बायबली अधिकृतता संपुष्टात आली. शेवटी एकोणिसाव्या व विसाव्या शतकात ज्युलियस वेलह्युसन (इ.स. १८४४–१९१८) यांच्यासारख्या बायबली अभ्यासकांनी चिकित्सा केली आणि विरोध करत तोराह दैवी, अपौरुषेय असल्याच्या व मोझेसमार्फत आल्याच्या धारणेला धक्का दिला. हा विषय जणू निकालात काढला. आर. ई. फ्राइडमन यांनी म्हटले आहे, 'तोराहची पाचही पुस्तके मोझेसने लिहिली किंवा ती कुणा एका लेखकाने लिहिली या दाव्यावर संशोधन करत असलेला एकही बायबली विद्वान आज शोधूनही सापडणे कठीण आहे.'[१५]

जे. वेलह्युसन यांच्या 'डॉक्युमेंटरी हायपोथेसिस' मांडणीने बायबली संशोधनात क्रांती आणली. विशेषतः पंचग्रंथाच्या संशोधनात. त्याच्यानंतर बहुतांश संशोधक पंचग्रंथ हे एकाच व्यक्तीची कृती नसल्याचे म्हणू लागले. वेगवेगळ्या कालखंडात व वेगवेगळ्या लोकांनी त्यात भर घातली. त्यामुळे त्यात विसंगती, सातत्याचा अभाव व निरनिराळी भाषाशैली यांचा प्रादुर्भाव झाला. त्यामुळे अनेक शतकांच्या दाव्याप्रमाणे ते एका व्यक्तीचे म्हणजेच एकट्या मोझेसचे काम असू शकत नाही. या समीक्षात्मक अभ्यासाविरुद्ध चर्च आणि यहुदी लोकांकडून लेखन झाले. मात्र, नवसंशोधनाने दोन्ही धर्मांच्या अनुयायांवर मोठा प्रभाव टाकला. त्यातून तोहराच्या अधिकृततेविषयी फूट

पडली. हेही स्पष्ट झाले की, हिब्रू बायबलच्या लेखकांनी, संपादकांनी व संकलकांनी त्यांच्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे व आवडीप्रमाणे बायबली ईश्वराची रचना केली.

थोडक्यात, वरील निष्कर्ष आणि कारणमीमांसेच्या आधारे आपण सांगू शकतो की, हिब्रू बायबलच्या ईश्वराविषयीच्या समजुतीने, तिच्या विकसित होत जाणाऱ्या किंवा उत्क्रांत होत जाणाऱ्या ईश्वरी कल्पनेने आधुनिक माणसांत पारंपरिक धर्मांतील अतिशायी ईश्वराविषयी बेफामपणा व बेपर्वाई आणली आहे.

इतकेच नव्हे तर बायबली माहिती मानवी घटकाच्या प्रभावाचा सिद्धांत स्पष्टपणे नाकारत नाही, उलट ती बायबलमध्ये असंख्य ठिकाणच्या मानवी घटकाचा प्रभाव अधोरेखित करते. त्यावरून स्पष्ट होते की, तिचा रचनाकर्ता म्हणून श्रेय केवळ माणसाला द्यावे लागते. माणसाने त्याची छबी, त्याचे गुण, त्याची वैशिष्ट्ये ईश्वरावर आरोपित केली आणि ईश्वराला स्वतःसारखे बनवले. शेवटी रॉबीन लेन फॉक्स यांच्या शब्दांत सांगायचे तर,'या धर्मग्रंथात ईश्वर स्वतःविषयी सांगत नाही, तर मानवी रचनाकार त्याच्याविषयी सांगताहेत, त्यांना ईश्वराने त्याच्या छबीत घडवल्याच्या समजुतीप्रमाणे ते ईश्वराला स्वतःच्या छबीत घडवत आहेत.'[१६]

प्रकरण तिसरे

# मानवीकरणवाद व ख्रिस्ती बायबल (नवा करार)

ईश्वराविषयी ख्रिस्ती धारणा थोडीशी वेगळी आहे. ते दावा करतात की, ईश्वर सजीव होऊन पूर्णपणे प्रकटला आहे. तो येशू ख्रिस्ताच्या रूपाने जन्म, शिकवण, मृत्यू व पुनर्जन्म यातून स्वतः गेला आहे. ख्रिस्ती अंतिम धारणा अशी की, येशू ईश्वर नाही, मात्र ईश्वर येशूच्या रूपात जन्माला आला. ईश्वर मानवी जीवनाच्या भाषेत आणि वास्तवात प्रकटला असेल तर मग ईश्वरविषयक ख्रिस्ती धारणा शब्दशः शारीरीकरण व मानवीकरण केलेली असणे अपरिहार्य आहे. ऐतिहासिक मानवी व्यक्ती नाझरेथचे येशू हे एकाच वेळी माणूस व ईश्वर होते. म्हणजेच दैवी शक्तीने मानवी रूपात स्वतः प्रकटणे व स्वतः व्यक्त होण्याची आवश्यक पूर्वअट पूर्ण केली. हे 'मॉर्फ' व 'अँथ्रोपॉस' या दोन ग्रीक शब्दांत भाषांतरीत करता येईल. हे ऐतिहासिक ख्रिस्ती दाव्यात सुचवल्याचे सिद्ध करण्यासाठी दोन गोष्टींवर भर देण्याची गरज आहे. एक : नवा करार ग्रंथ प्रामुख्याने ख्रिस्ती धर्माचे केंद्र म्हणून येशू ख्रिस्ताच्या जीवन व कार्यावर केंद्रित आहे. दोन : ख्रिस्ती सिद्धांताची ऐतिहासिक जडणघडण. आरंभीच्या ख्रिस्ती पादरींनी आकार देणे आणि पुढील ख्रिस्ती पिढ्यांनी त्याला नियमावली म्हणून मान्यता देणे, येशू ख्रिस्त खरोखर ईश्वर व खरोखर माणूस व खरोखर एक असल्याचा सिद्धांत प्रस्थापित करणारी शिकवण मोक्ष मिळवणारी म्हणून सांगणे. हे अवताराचे प्रसिद्ध धर्मशास्त्र अंतरबाह्य पूर्पणे शारीरीकरणाचे आहे आणि वास्तविक पाहता, सेमिटिक जाणीवेतील शारीरीकरणाच्या विचाराचे शिखर आहे.

येशू ऐतिहासिकदृष्ट्या यहुदी लोकांध्ये राहिले. ते त्यांच्या धर्मग्रंथाचा आदर करत. त्यांनी स्वतःकडे त्यांच्या कायद्याचे पूर्ण पालन करणारा म्हणून पाहिले. यहुदी धर्मप्रमुखांशी संघर्ष करत दावा केला ते इस्राइलच्या हरवलेल्या कोकरुंसाठी पाठवले गेले आहेत. ईश्वराविषयी व त्याच्या अतिशायीत्वाविषयी येशूच्या धारणेची वेगळी वैशिष्ट्ये असली तरी, तिच्याकडे साकल्याने पाहिले असता ही धारणा यहुदी लोकांच्या ईश्वरी धारणेपेक्षा फार अलग नाही. आरंभीच्या ख्रिस्ती लोकांना जरूर त्याच्या आपसासच्या यहुदी धर्मात विकसित होत असलेल्या अतिशायी व एकेश्वरवादी दैवी धारणांचा वारसा मिळालेला असला पाहिजे. म्हणजेच निर्मिक ईश्वराविषयी एकत्व, अद्वितीयत्त्व व उच्चत्वाची धारणा या

सोबत मागे चर्चा केलेली काही मानवीकरणाची आव्हाने वारसा म्हणून मिळाली असतील. हे सर्व ख्रिस्ती धर्मपरंपरेसाठी आधारतत्त्व असले पाहिजेत; हे वादातीत आहे. उपलब्ध ऐतिहासिक साधनांच्या आधारे एखाद्यास हे सांगता येईल की, चर्चने हेच अतिशायी एकेश्वरवादी आधारतत्व वापरून एकेश्वरवादाच्या उल्लंघनासाठी अनेकेश्वरवाद्यांचा आणि ग्नोस्टीक इमॅनेशनीस्टांचा (गूढ ज्ञानरचनावाद्यांचा), द्वैतवादी मार्सियनवाद्यांचा प्रतिवाद केला.

अलेक्झांड्रियाच्या क्लेमेंटसारख्या अनेक चर्च फादर यांनी जोर देऊन सांगितले की, हिब्रू बायबलमधील मानवीकरणाच्या वर्णनांकडे आधिभौतिक म्हणून पाहायला पाहिजे. कैसेरिया येथील सेंट बासील (इ.स. ३३०–३७९) यांनी 'ईश्वराने तोंड वळवल्या'चा अर्थ अडचणीत एखाद्याला सोडून देणे असा लावला. तर नाझियान्झसच्या ग्रेगोरी यांनी ईश्वराचा 'चेहरा' म्हणजे ईश्वराची नजरचुकवण्याशी लावला, थिओडोरेट यांनी ईश्वर कल्याणकारी व स्वतंत्र असल्याचे सांगितले, दमिश्कच्या जॉन यांनी दर्शन व स्वप्रकटीरणाचा अर्थ असंख्य लेखनातून लावला.

दुसरीकडे त्या तुलनेत नव्या करारात मानवीकरण खूप कमी आढळते. ईश्वराचे बोट (ल्यूक ११:२०), ईश्वराचे तोंड (मॅथ्यू ४:४), ईश्वराची दृष्टी (ल्यूक १६:१५), पृथ्वी ईश्वराचा पायआधार आहे (मॅथ्यू ५:३५) आदी. जवळपास या सर्व वर्णनांचा अर्थ आधिभौतिक पद्धतीने लावता येईल. असे असताही व्हॅलेंटिनीयन्स, मेलिटो व टर्ट्युलीयनसारखे अनेक फादर ईश्वराच्या शारीरिक व मानवीकरणवादी प्रतिमेला कवटाळून बसलेले दिसतात. अगदी इरेनियस यांनी ईश्वराची प्रतिमा मानवी शरीरात शोधली. दोन शतकांनंतरही क्लेमेंट, सेंट ऑगस्टीन हे ख्रिस्तीजनातील व चर्चाच्या अतिशय घट्ट स्वरूपाच्या शारीरीकरण व मानवीकरणवादी प्रवृत्तीशी झगडत होते.

नव्या कराराच्या केंद्रस्थानी सर्वशक्तिमान ईश्वर नाही, हेही वास्तव आहे. ते येशू केंद्री आहे. सर्वशक्तिमान ईश्वर/पिता शुभवार्तेचा (गॉस्पेल) केवळ २.५ टक्के भाग व्यापून आहे. उरलेला भाग वेगवेगळ्या अंगाने येशूशी संबंधित आहे. जसे, त्यांचे व्यक्तित्व, शिकवण, त्यांचे शिष्य, त्यांना भेटायला येणारे, त्यांचा यहुदी नेत्यांशी संवाद आदी. (मार्क त्यांच्या शुभवार्तेत केवळ ०.२ टक्के शब्द ईश्वर किंवा पित्यासाठी दिले आहेत, तर मॅथ्यू ०.६ टक्के, ल्यूक १.१टक्के, जॉन ०.६ टक्के शब्द ईश्वरासाठी खर्ची घातले

आहेत). त्यानंतर एका माणसावर खूप केंद्रित झाले आहे; नाजरेथच्या येशूवर. वेगवेगळ्या शब्दांत, संज्ञांत, वेगवेगळ्या मार्गाने त्यांचे वर्णन आले आहे. त्यांना माणूसपुत्र, ईश्वरपुत्र, संदेश, प्रेषित, मसिहा, किरियास किंवा स्वामी आणि अगदी ईश्वरही संबोधले आहे.

येशू या व्यक्तीवर केंद्रित आहे वा नाही, किंवा वरील उल्लेखांविषयी नवा करार सुव्यवस्थित किंवा एकसारखा नाही का, अशा मानवीकरणविषयक नव्या कराराच्या चिकित्सेची किंवा चर्चेची गरज नाही. नव्या कराराचे रचनाकार ख्रिस्ताच्या घडामोडींच्या गारुडात इतके बुडालेले दिसतात की, त्यांनी या घडामोडींचे प्रतिबिंब दुसऱ्या हरेक घटनेमध्ये पाहिले. अगदी ईश्वरातही; जणू आरशासारखे. ऐतिहासिक व्यक्ती येशू ख्रिस्तामध्ये दैवी व मानवीय संगम पाहिले जाते. तेही इतके की, पारंपरिक ख्रिस्ती अनुयायांसाठी येशू एकाचवेळी परिपूर्ण ईश्वर व परिपूर्ण माणूस आहे. हा अवतार, सामान्य दुबळ्या माणसात दैवी व माणूसपणाचे मिश्रण हे दैवी शारीरीकरणवाद व वास्तववादी मानवीकरण आहे. इतकेच नव्हे तर येशूंविषयी इतक्या वैविध्यपूर्ण विशेषणांचा वापर केला गेला आहे की, येशूंना एक, एकसमान वा वैश्विक रूपात किंवा धारणेत बांधणे खूप कठीण होते. म्हणून ख्रिस्तशास्त्र किंवा येशूचे महत्त्व, त्यांचे सर्वशशक्तिमान ईश्वराशी नाते, हे आपल्या नवा करारातील मानवीकरणाच्या अभ्यासाचे  आधारभूत वर्तुळ ठरते.

नव्या करारात अनेक येशूशास्त्र आहेत. अतिशायी ईश्वर व मानवीकरण यांच्यातील मूलभूत प्रश्न एका व्यक्तीचे ख्रिस्तशास्त्र आहे. म्हणजेच ख्रिस्त नावाच्या व्यक्ती व देवत्वाचा सिद्धांत. जुन्या जमान्यातील विद्वानांच्या तुलनेत आधुनिक विद्वानांमध्ये ख्रिस्ताच्या देवत्वाविषयी व येशू म्हणून व्यक्तीविषयीच्या अन्वयार्थावरून दोन तट आहेत. जुन्या ख्रिस्तशास्त्रातील चर्चने पाखंडी ठरवलेले जवळपास सर्व प्रश्न, मते व कल आधुनिक ख्रिस्तशास्त्रज्ञांच्या गरमागरम चर्चेचा व वादविवादाचा भाग आहेत. ही पाखंडी ठरवलेली अनेक मते फार खळखळ न करता किंवा दोष न देता आजच्या ख्रिस्ती धर्मात सामावून घेतलेली आहेत.

येशू दैवी असल्याची ख्रिस्ती श्रद्धा परंपरा एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत टिकून होती. चर्च व सामान्य ख्रिस्तीजन मानून होते की, येशू ख्रिस्तांनी स्वतःला ईश्वराचा मुलगा असल्याचे जाहीर केले होते. दैवी

त्रितत्त्वापैकी (ट्रिनिटी) दुसरी व्यक्ती. ती माणसांच्या विश्वात पूर्णाअर्थाने मर्त्य (तरीही पापमुक्त) जीवन जगली. ख्रिस्तात ईश्वर मानण्याच्या या पारंपरिक अवतार धर्मशास्त्रात आपण ईश्वराच्या मानवीकरणाचे व दैवत्वाच्या शारीरिकरणाचे टोक पाहतो. ख्रिस्ताच्या रूपाने ईश्वर हाडामांसी शरीरात अवतार घेतो, खातो, पितो, झोपतो, दुःखी होतो आणि पुढे सुळावर चढवले जाते. या शरीर धारण करण्याच्या प्रक्रियेत आपल्यापुढे दैवी शारीरीकरणाचे वास्तववादी मजबूत उदाहरण त्याच्या अतिशय शुद्ध स्वरूपात येते.

पारंपरिक ख्रिस्ती धर्मापुढे एक मोठी समस्या आहे. एकीकडे ईश्वराचे अतिशायीत्व जपायचे, त्याचवेळी ईश्वर म्हणून ख्रिस्ताने अवतार घेऊन सुळावर चढून मुक्ती मिळवून द्यायची. कोणतीही सुटका नसलेला हा विचित्र विरोधाभास आहे. कारणमीमांसा ते नाकारते. नवल असे की आजच्या युगात व घडीलाही काही विद्वान येशू ख्रिस्ताचे देवत्व मान्य करतात आणि त्यांच्या लेखी येशू ख्रिस्ताच्या या ओळखीची जाण असतानाही हा अवतार अनेकेश्वरवाद किंवा दैवी शारीरीकरण ठरत नाही. मानवी कारणमीमांसेला मात्र ही विसंगती वाटते.

पारंपरिक ख्रिस्ती ट्रिनिटी (त्रितत्त्व) धारणेला एक मध्यवर्ती समस्या समाधानकारकरित्या सोडवण्यात अपयश आले आहे. येशू ख्रिस्तांचे एक व्यक्ती म्हणून अतिशायी, अद्वितीय, अस्थानांतरीय, एकमेव, शाश्वत व एक अशा ईश्वराशी मेळ घालता आलेला नाही. हे एक वास्तव आहे. याविषयी अंदाज व अटकळ बांधणारे अनेक लेखनकार्य उपलब्ध आहेत. या बोचऱ्या विषयावर विपुल लिहिले गेले असले तरी त्याने मानवी तर्काचे समाधान नक्कीच होत नाही. अतिकप्पाडोसियन चळवळीचा सामाजिक त्रितत्त्व पैलू असो किंवा बार्थचा त्रितत्त्वाचे एकत्व विचारदेखील त्रितत्त्वाला शारीरीकरण व मूर्त मानवीकरणापासून विलग करू शकलेला नाही. ईश्वराचा ख्रिस्त म्हणून मानवी अवतार हा त्याच्या अस्तित्वाचे एक स्वरूप असो वा त्याचे एका व्यक्तीतून प्रकटीकरण असो, तो शारीरीकरणवादाचा अतिशय स्पष्ट प्रकार आहे. पारंपरिक ख्रिस्ती धर्म सातत्याने ख्रिस्त ही व्यक्ती दैवी असल्याचे जोर देऊन सांगत आला आहे. त्यातच खरी अडचण आहे. येशू म्हणजे त्रितत्त्वातील दुसरे तत्त्व. तो सर्व बाबतीत ईश्वरासमान व त्याचवेळी मानवतेच्या बाबतीत (पापारखेरीज) सर्व माणसासारखा आहे. ही मांडणी विरोधाभासी, एकमेकांच्या उलट जाणारी व

तर्काला नाकारणारी आहे. ख्रिस्ती धर्माचा हा पायाभूत सिद्धांत आधुनिक तर्कसंगत विचाराला भावत नाही. तर्काच्या काटेकोर निकषांवर चिकित्सा करणाऱ्या आधुनिक माणसाच्या बुद्धीला ते पटत नाही. अनेक आधुनिक ख्रिस्ती विद्वान व धर्मशास्त्रज्ञ हा पारंपरिक दावा नाकारायला किंवा त्यावर टीका करायला तयार नसले तरी, त्यांच्यापुढे पेच आहेच. या दाव्याची सत्यता किंवा रास्तता समकालीन मनाला कशी पटवून द्यायची हा तो पेच. यामुळे गुळगुळीत युक्तिवाद त्यागणे भाग पडल्याने ते तर्कहीन वक्तव्यांच्या आधारे दावा करतात. हे करत असताना अनेक बाबतीत ते मागील शतकांतील चर्चिली गेलेली जुनी मते मांडत पुनरावृत्ती करतात किंवा पाखंडी म्हणून नाकारलेली मते मांडत राहतात. यातून ईश्वराच्या मानवीकरणवादाच्या, शारीरीकरणवादाच्या व काही बाबतींत त्रिदेववादाच्या आरोपातून सुटका होत नाही.

कदाचित या विरोधाभासाचा स्रोत नवा करार आहे. नवा करारातील एकही शब्द येशू ख्रिस्तांनी लिहिलेला नाही किंवा सांगितलेला नाही. नवा करार नंतरच्या लोकांची निर्मिती आहे. निरनिराळ्या कालखंडांत, विविध समुदायांत व वेगवेगळ्या ठिकाणी होऊन गेलेल्या नंतरच्या अनेक लेखकांच्या पिढ्यांची ती निर्मिती आहे. आजच्या स्वरूपातील, आजच्या आकारातील व आजच्या क्रमवारीतील नवा करार आरंभीच्या ख्रिस्ती अनुयायांकडे नव्हता. तो येशू ख्रिस्त व त्यांचे शिष्य गेल्याच्या अनेक शतकांनंतरही नव्हता. नवा कराराच्या पुस्तकांची रचना विशिष्ट समुदायाच्या विशेष गरजांमधून झाली. या पुस्तकांचे एकत्रित एका ग्रंथात संकलन ही खूप नंतरच्या काळातील गोष्ट आहे. तसे काही करण्याची कल्पना या पुस्तकांच्या मूळ लेखकांच्या मनातही नव्हती. संकलनाचा हा विचार आधीच संकलित असलेल्या हिब्रू बायबलमुळे आला असावा. नव्या कराराचे संपादन, संकलन व या लेखनाच्या विशिष्ट समूहाची ओळख निश्चिती ही कामे ख्रिस्ती चर्चच्या गुंतागुंतीच्या व्यवस्थेतून झाली. या पुस्तकांची यादी निश्चित करून ती अधिकृतपणे सादर करण्यात चर्चला ३६७ वर्षे लागली. आजच्या नवा करार ग्रंथात या सर्व पुस्तकांचा समावेश आहे.

बायबली संशोधकांमध्ये संकलनाची प्रक्रिया, तिचा इतिहास, लेखक, ठिकाणे, स्रोत व तारखांविषयी व्यापक स्तरावर मतभिन्नता आहे. नवा करार अंतिम अधिकृत व येशूच्या शिष्यांकडून प्रेरित लेखन असल्याचे पारंपरिक

किंवा ऑर्थोडॉक्स विद्वानांनी जाहीर केले आहे. हे सर्व लेखन येशूंनंतर लगेच शिष्यांकडून किंवा धर्मगुरूंकडून झाले आहे, अशी त्यांची धारणा आहे. नवा करार अधिकृत व दैवी असण्याचा या पुराणमतवाद्यांचा दावा आधुनिक संशोधक नाकारतात. ते नवा कराराची स्वरूप समीक्षा, संपादन समीक्षा, भाषा-साहित्य समीक्षा व ऐतिहासिक दृष्टीकोनाच्या आधारे पुराणमतवाद्यांशी असहमती व्यक्त करतात. त्यांचा युक्तिवाद आहे की, नवा कराराच्या पुस्तकांचे लेखन येशूंनंतर लगेच शिष्यांनी केलेले लेखन नाही. उलट ते त्यांच्यानंतर खूप उशिरा अज्ञात लेखकांकडून रचले गेलेले आहे. त्यांच्या मते, पॉलच्या पत्रांशिवाय नवा कराराच्या अन्य लेखकांची माहिती (नाव, स्थळ, काळ, प्रसंग व खास परिस्थिती आदी) मिळत नाही. ते पुढे आणखी सांगतात की, येशू ख्रिस्तांनी त्यांच्या शिष्यांना काही लिहून ठेवण्यासाठी कधीच सांगितलेले नाही. पुनर्जीवनानंतर येशूंकडून त्यांच्या शिष्यांना जगाचा अंत व ईश्वरी राज्याविषयी शिकवण मिळाली. म्हणून त्यांना येशूंचे शब्द लिहून ठेवण्यात जास्त रस वाटला नाही. अंतिमनिवाडाशास्त्रामुळे व प्रेषितरूपी ईश्वरी आत्मा त्यांच्यात वावरत असल्याच्या श्रद्धेने पहिल्या ख्रिस्ती मंडळींना संदेश लिहिण्याऐवजी मौखिक प्रसारावर आणि प्रवचनावर लक्ष केंद्रित केले.

परिणामी शब्द किंवा परंपरा मौखिक पद्धतीने दुसऱ्या पिढीपर्यंत हस्तांतरीत होत आली. तोपर्यंत येशूंचे पुन्हा आगमन होणार असल्याचा उत्साह काळाच्या ओघात ओसरत आला होता. त्यांचे आगमन टळल्याने अनेक नव्या समस्या पुढे आल्या. पुस्तके लिहून ठेवण्यास सुरुवात झाली. या मध्यंतरात नवी वचने अस्तित्वात आली आणि त्यांना जुन्या संदेशात स्थान दिले गेले. या पन्नास-साठ वर्षांच्या काळातील प्रक्रियेतून शुभवार्ता आकाराला आली. तसेच नव्या कराराचे रचनाकार केवळ ऐतिहासिक घटनांची मूळ स्वरूपात नोंद करणारे चरित्रलेखक नव्हते. ते एका विशेष 'जीवंत परिस्थिती'शी संवादही साधत होते. म्हणजेच त्यांच्याकडे धार लावण्यासाठी कुऱ्हाड होती. ते त्यांच्या काळातील धर्मशास्त्रज्ञ होते आणि त्यांच्याकडे लोकांना सांगण्यासाठी संदेशही होता. या कारणांमुळे शुभवार्ता रचण्यामागचे चाळीस ते साठ वा सत्तर वर्षांचे जीवन शुभवार्तांच्या मदतीने उभे करण्याच्या प्रयत्नात आश्वासक चित्र हाती येईल असे नाही. येशूंनी जे पाहिले व स्वतःविषयी सांगितले यात आणि आरंभीच्या चर्चने ख्रिस्त म्हणून, स्वामी किंवा ईश्वराचा पुत्र म्हणून ज्या पद्धतीने अर्थ लावला यात मोठी दरी व्यापून

आहे. यावरून या पुस्तकांत केवळ ख्रिस्ताच्या घडामोडींचा अन्वयार्थ आहे; ही पुस्तके आपल्याला प्रत्यक्ष येशूंनी स्वतःविषयी काय सांगितले, संदेश काय दिला, ते खरोखर कसे होते याची नेमकी व बिनचूक माहिती देत नाहीत, असा अर्थ लावणे सहज शक्य आहे. या पुस्तकांनी आकार घेण्याच्या प्रक्रियेत शतकांचे अंतर आहे. पश्चिमेत ही पुस्तके पाचव्या शतकात सेंट ऑगस्टीन व जेरोम यांच्या प्रभावाने बंदिस्त झाली. तर पूर्वेत ग्रीक चर्चसाठी सम्राट कॉन्स्टनटीनने विषय संपवला. त्याने नव्या राजधानीत वापरण्यासाठी धर्मग्रंथाच्या ५० प्रती तयार करण्याचा आदेश युसेबियसला दिला. अशा प्रकारे २७ पुस्तकांचा नव्या करार ग्रंथांत समावेश करण्यात येऊन त्याला अर्धअधिकृतता मिळाली.

आज आपल्या हाती असलेला नवा करार येशू ख्रिस्तांच्या मृत्यूनंतर तीनशेपेक्षा जास्त वर्षांनंतर बिशप मंडळींनी सहमती व मान्यता दिलेल्या काही पुस्तकांचा संच आहे. त्यात शाही दबावाचाही समावेश आहे हेही विसरता येणार नाही. तीन शतकांचा काळ तसा खूप मोठा काळ असतो. स्वाभाविकरित्या, नवा करारातील पवित्र आत्म्याचे संरक्षण, मार्गदर्शन व सांत्वन करणाऱ्या लेखनाचा उल्लेख त्याच्या प्रत्येक शब्दांमागील माणसांना, त्यांच्या मर्यादांना वगळून करणे रास्त नाही. कोणीही या ठाम निष्कर्षावर पोचल्याशिवाय राहणार नाही की, नवा कराराचे लेखक, संकलक, सिद्धांत रचणारे हे आपल्यासारखी साधी माणसे होती.

ख्रिस्ताविषयी मत काय? या मध्यवर्ती प्रश्नाचे उत्तर नवा कराराच्या रचनाकारांनी असंख्य पद्धतीने दिले आहेत. ते प्रेषित आहेत, देवदूतांचे राजकुमार, ख्रिस्त, मसिहा, माणूस पुत्र, ईश्वर पुत्र, स्वामी (Kyrios) आहेत व जॉन यांच्या शुभवार्तेनुसार ते लोगोस (Logos) वा थिओस (Theos) आहेत, याचे पारंपरिक भाषांतर 'ईश्वर' असे आहे. ही विशेषणे मानवीकरणवादाच्या आपल्या अभ्यासासाठी खूप महत्त्वाची आहेत. कारण येशूंना सर्वशक्तिमान ईश्वराच्या विशेषणांनी (दैवी, शाश्वत, ब्रह्मांडाचा अंतिम स्वामी म्हणून) सजवलेले आहे. तसेच त्यांना ईश्वरासमान लेखले आहे, तशी भक्ती केली आहे. सर्वांत शेवटी थेट ईश्वर म्हणून संबोधले आहे. इतक्या वर्णनानंतर नवा कराराची देवता/येशू हे ईश्वराचे मानवीकरण किंवा शारीरीकरण नसल्याचे सांगणे शक्य नाही.

चर्चने इतर ख्रिस्तशास्त्रांच्या तुलनेत लोगोस किंवा थिओस संकल्पनेच्या ख्रिस्तशास्त्राला प्राधान्य द्यायचे ठरवत येशू हे ईश्वर असल्याचा स्वीकार केल्याचे दिसते. विशेषतः ईस्टरच्या अनुभवाच्या प्रकाशात, जॉन यांच्या थिओसला अंतिम मानत ईश्वर (ho theos म्हणजेच The God) म्हणून प्रस्थापित केले. खरं तर जॉन यांनी येशूंना थिओस संबोधणे हे एक संवादाचे साधन म्हणून वापरलेले असू शकते. असो. बदलाची प्रक्रिया स्पष्टपणे ऐतिहासिक तथ्य समोर आणते की, उच्च ख्रिस्तशास्त्र व येशूंना देव करणारे ख्रिस्तशास्त्र हे स्वतः येशू किंवा त्यांच्या सहकारी शिष्यांची मूळ कल्पना नाही. त्याचा उगम ईस्टरच्या अनुभवप्रकाशात नंतरच्या ख्रिस्ती लोकांनी येशूंविषयी केलेल्या समजुतीतून झाला आहे. ती निश्चितपणे नंतरच्या धर्मशास्त्रीय प्रेरणेची नांदी व योजना आहे.

नवा करार ग्रंथबद्ध होण्याच्या प्रक्रियेप्रमाणे येशूंच्या दैवतीकरणाची प्रक्रियाही शतकांच्या काळात क्रमशः झाली. ख्रिस्ताच्या ईस्टर अनुभवाच्या आधाराने चर्चने येशू दैवी असल्याचे एकदा ठरवल्यानंतर या भूमिकेला पाठिंबा देण्याच्या विचाराने शुभवार्तांची व इतर साधनांची निवड काळजीपूर्वक करण्यात आली. ख्रिस्ताला प्रेषित, देवदूत, मसिहा व स्वामी ठरवणारी वेगळी ख्रिस्तशास्त्रे रूपकात्मक ठरवत माणसाचे दैवी विशेषण व गुणांसह वर्णन करून त्याचे देवत्व अबाधित केले. अशा पद्धतीने देवत्व व माणूसपण एका ऐतिहासिक व्यक्तीत म्हणजेच नाझरेथच्या येशूंमध्ये एकत्र सामावले. ते ईश्वराच्या मानवीकरणवादाचा व शारीरीकरणवादाचा परमोच्च बिंदू व अत्युच्च चित्रण ठरले. पॉलकृत व जॉनकृत साहित्याने नंतरच्या ख्रिस्तींना पुढील धोकादायक झेप घेण्यासाठी संदर्भ, संज्ञा व संकल्पनात्मक चौकट पुरवली. याचाच अर्थ पॉलकृत व जॉनकृत ख्रिस्तशास्त्राच्या प्रभावाने सुरुवातीच्या अपोस्टल फादर मंडळींना येशू दैवी व देव असल्याची कबुली देण्यात काहीही संकोच वाटला नाही. उदा. येशूंना 'ईश्वर' संबोधण्यात इग्नाटीसला संकोच वाटला नाही.

जर नंतरच्या धर्मशास्त्रीय घडामोडींच्या उजेडात पाहिले तर दिसते की, नवा करारातील काही पुस्तकांनी येशू ख्रिस्तांचे स्थान दैवी उंचीवर नेले. तसेच काही परिच्छेदांत ईश्वराच्या समकक्ष नेऊन बसवले. त्यात नंतरच्या ख्रिस्तशास्त्रातील पूर्ण देवत्वाच्या (जसे सर्वार्थाने पिता असल्याच्या) दाव्यांची

उसनवारी केल्याची शक्यता आहे. या परिच्छेदांचा वेगवेगळ्या पद्धतीने अर्थ लावलेला असला तरी नवा करारातील पुस्तकांच्या इतर एकेश्वरवादी परिच्छेदांच्या संदर्भाने त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो. तसेच शुभवार्तांच्या सारांशमधील अनेक परिच्छेदांत ईश्वर एक व एकमेव असल्याचे जोर देऊन सांगितले आहे (मार्क १२:२९). नंतरच्या काळात दैवी ख्रिस्तविषयक केलेल्या काही दाव्यांसाठी अन्वयार्थाच्या पातळीवर काही कृत्रिम प्रयत्नांना पॉलकृत व जॉनकृत साहित्यातील परिच्छेदांनी भरीस पाडल्याचे सांगता येईल. दुसऱ्या बाजूला इतर काही परिच्छेद आहेत जे येशूंना पिता ईश्वराच्या तुलनेत निम्न स्थान देतात आणि बाप्तिस्मावेळी त्यांना दत्तक घेतल्याचे सांगतात (ल्यूक ६:१२, १०:२२; मॅथ्यू १९:१७, ११:२७; जॉन ७:२९–३३; मॅथ्यू ३:१६–१७; ल्यूक ३:३२).

आणखी भर अशी की, वर उल्लेख केलेले सर्व परिच्छेद अनेक महत्त्वाच्या ख्रिस्ती परंपरा श्रद्धा बाळगतात तसे येशूंचे ठाम व परिपूर्ण देवत्व सिद्ध करत नाहीत. अनुजात, सांत किंवा निम्न दैवी स्थिती ही पूर्ण देवत्वासारखी स्थिती नसते. तसेच या परिच्छेदांचा येशूंच्या दैवी दर्जाच्या अनुषंगाने अन्वयार्थ लावला तरी, येशूंचे ईश्वराशी नाते, येशूंचे माणसांशी नाते, देवत्वाचे मूळ स्वरूप व गाभा, एकेश्वरवाद, त्रिदेववाद, मानवीकरणवाद, शारीरीकरणवाद व अतिशायीत्व अशा महत्त्वाच्या असंख्य बाबी अनुत्तरीत राहतात.

सुरुवातीच्या चर्चने येशूंना विनासंकोच पूर्णांश देवत्व बहाल केले. तशी नावे, विशेषणे दिली. त्याच पद्धतीची कृती व कार्ये सांगितली. ही देवत्वाची श्रद्धा मुक्ती मिळवण्यात रस असलेल्या ख्रिस्तींपुरती मर्यादित होती तोवर फार मोठ्या समस्या निर्माण झाल्या नाहीत. पापात गुरफटलेल्या माणसाला ईश्वर व केवळ ईश्वरच आणि त्याच्याशिवाय दुसरा कोणी मुक्ती मिळवून देऊ शकत नाही, अशी ती धारणा. ख्रिस्तीजगाच्या बाहेरील विश्वाला तोंड देताना आणि त्यांना ख्रिस्ती शिकवणुकीचे महत्त्व व शहाणपण समजावून सांगताना मोठ्या समस्या उभ्या ठाकल्या. ख्रिस्ती ज्याला ईश्वर संबोधत होते, तो जन्माला आला होता, ३० वर्षांचे सामान्य नैसर्गिक जीवन जगला, खाल्ला, प्यायला, यातना भोगला व त्याला निर्दयीपणे सूळावर चढवण्यात आले. ही वास्तविक आव्हाने चर्चने पाहिली. सिकंद्रियाचा पॅगन तत्त्वज्ञ सेल्सस याने या समस्येवर नेमकेपणाने बोट ठेवले, ‘त्याच्या अनुयायांनी त्याचा देव केला...

ईश्वराने जमिनीवर येणे ही अनाकलनीय कल्पना आहे. गोष्टींच्या समर्थनासाठी ईश्वर कशाला खाली येईल? असे करणे ईश्वराला परिवर्तनीय बनवत नाही का?' त्याने ख्रिस्ती धर्मावर व त्याच्या अवतार सिद्धांतावर कठोर टीका केली. 'ते सर्व प्रकारच्या सकारात्मक मानवी मूल्यांच्या विरुद्ध जाते', असे प्रतिपादन केले.

याविषयी बाहेरूनच नाही तर आतूनही दबाव होता. या संभ्रमाच्या स्थितीने चर्चमध्ये सुरुवातीच्या सैद्धांतिक वादाला जन्म दिला. त्याने चर्चला अधिक नेमकेपणाने भूमिका स्पष्ट करण्यास भाग पाडले. या आतील दबावाने विरोधाभासी मांडणीविषयी, खास करून यहुदी व पॅगन लोकांची कठोर टीका टाळण्यासाठी तार्किक बचाव व बौद्धिक स्पष्टीकरण मागितले. आरंभीच्या ख्रिस्ती धर्मात मार्सियन, टॉलेमी यांच्यासह गूढ ज्ञानवादी (Gnostic) मंडळांनी आवाज उठवला व 'त्याचे भोग श्रद्धेची निर्मिती होती', असे सांगितले. उदा. मार्सियन यांनी येशूचे माणूसपण पूर्णपणे नाकारले. त्यांचा येशू विराट असून तो मांसाच्या तुरुंगात मावू शकत नव्हता. हा स्पष्टपणे डोसेटिझम आहे (डोसेटिझम म्हणजे अलौकिकशरीरवाद. येशूंचे शरीर व मरण माणसासारखे भासते. पण प्रत्यक्षात ते अशारीरिक व शुद्ध आत्मा आहेत; त्यामुळे त्यांचा शारीरिक मृत्यू होऊ शकत नाही ही धारणा).

चर्च येशूच्या माणूसपणाचे समर्थन करत असताना तो स्वतःची डोसेटिझमच्या समस्येपासून सुटका करून घेऊ शकत नाही. स्वतः चर्चने येशूंच्या दैवी असण्याविषयी जोर देऊन सांगितले आहे; जोरही इतका की माणूसपण व देवत्व यांच्यातील सीमारेषा पुसट व्हावी. सिकंद्रिया चर्चचे फादर क्लेमेंट हे 'डोसेटिझमला मान्यता देण्याच्या खूप जवळ होते'.[१७] देव संकल्पनेच्या आधारे येशूच्या पूर्ण दैवी असण्यावर चर्च जसजसे भर देत गेले तसतसे नाझरेथचे येशू हे ईश्वराचे पुत्र व देव असल्याचे सिद्ध करणे कठीण होत गेले. प्राचीन चर्चच्या ख्रिस्तशास्त्रात असलेल्या सौम्य डोसेटिझमपासून चर्चची सुटका शक्य नाही.[१८]

पॅगन, ग्रीक तत्त्वज्ञान व यहुदी धर्माकडून वर्मावर बोट ठेवणारी टीका टाळण्यासाठी ख्रिस्ती धर्माकडे स्वतःचे बौद्धिक महत्त्व सिद्ध करण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याच्या शिकवणुकीत परमपिता ईश्वर व येशू ख्रिस्त यांच्या नात्याविषयी अधिक स्पष्ट व नेमकेपणाने मांडणी करणे भाग पडले. ख्रिस्ती

धर्मात एका बाजूला स्पष्ट एकेश्वरवाद आणि दुसऱ्या बाजूला येशू ख्रिस्तांचे देवत्व, ईश्वर म्हणून त्यांचे भोग व सुळावर चढणे हे बिगरख्रिस्ती यहुदींना व पॅगन धर्मीयांना समजायला खूप कठीण होते. ख्रिस्ती धर्माची सत्यता सिद्ध करण्यासाठी जस्टीन मार्टीर, थिओफिलस, टायटन, ॲरिस्टाइड्स व अथेनागोरससारख्या ख्रिस्ती बचाववाद्यांनी प्रतिक्रिया देताना गृहीत तत्त्वज्ञानाचा आधार घेत स्थिती आणखीन अवघड करून ठेवली. त्यांनी त्यावेळी उपलब्ध तत्त्वज्ञानाच्या संकल्पनांआधारे ईश्वर व येशू यांच्यात स्पष्ट रेषा आखण्याचा प्रयत्न केला. उदाहरण म्हणून सांगायचे तर यातील सर्वांत प्रसिद्ध जस्टीन यांनी आग्रहाने सांगितले की, येशू ईश्वराकडून आलेले असले तरी ते ईश्वरासम नाहीत. येशूं हे ईश्वराकडून जन्माला आलेले ईश्वर आहेत. ते दैवी आहेत मात्र, मूळ देवतास्वरूप नाहीत. त्यांचे देवत्व वेगळे आहे.[१९] ते पूर्वअस्तिव असलेले लोगोस (ईश्वर) होते, ईश्वराचे प्रतिनिधी म्हणून त्यांची अशी निर्मिती ज्यातून इतर सर्व जीवांची निर्मिती झाली. यामुळे त्यांना स्वामी संबोधता येईल व दैवी म्हणून त्यांची भक्ती करता येईल; पण निम्न देवता म्हणून.[२०] इतर टायटन, हिप्पोलिटस यांच्यासारख्या बचाववाद्यांनी ईश्वर अतिशायी, अपरिवर्तनीय, व्यक्त न करता येणारा व वेगळा असल्याच्या जस्टीन यांच्या संकल्पनेचे अनुसरण केले. सोबत त्याचे ईश्वरी खिस्तशास्त्रही स्वीकारले.

ख्रिस्ती बचाववाद्यांनी लोगोस शब्द स्पष्टपणे परमपिता ईश्वराच्या तुलनेत निम्नकक्ष दैवी दर्जा तयार करण्यासाठी वापरला. तसेच त्यांनी अत्यावश्यक असलेली एकेश्वरवादाची संकल्पना अबाधित ठेवण्यासाठी ईश्वराच्या तुलनेत लोगोस शब्दाचा अर्थ मर्यादित ठेवला. ख्रिस्ती बचाववाद्यांच्या या लोगोस अन्वयार्थात मध्यप्लेटोवादाचा श्लेष आहे. त्यात लोगोसचा अर्थ ब्रह्मांड व जगाच्या संदर्भात ईश्वराचे संपूर्ण अतिशायीत्व, अदृष्यता व अज्ञेयता सांगण्यासाठी वापरला जातो. सर्वशक्तिमान ईश्वर थेट माणूस व जगाशी व्यवहार करण्यात खूप अतिशायी होता. लोगोस हा ईश्वराच्या सक्रिय इच्छेची निर्मिती असून निम्न, मध्यस्थी व वेगळ्या स्वरूपातील देव होता. टरच्युलियन (इ.स.१६०–२२०) व ओरिजेन (इ.स.१८५–२५४) सारख्या चर्चच्या फादर मंडळींनी स्पष्टपणे ईश्वराच्या संबंधात ख्रिस्त निम्न, दुय्यम व वेगळा देव असल्याची बचाववादी भूमिका कायम ठेवली. (येशू) मुलगा म्हणून परमपित्याने दिलेले राज्य व अधिकार

वापरत असल्याने ईश्वराचे अतिशायीत्व आणि एकलशाहीत्व अबाधित राहते.[२१] जगाच्या अंतावेळी मुलगा हे राज्य व अधिकार परमपित्याला परत करेल. परमपिता एकलशाहीत्वाची शाश्वती आहे, मुलगा दुसऱ्या स्थानी येतो आणि आत्म्याला तिसरे स्थान दिले आहे. टरच्युलियन यांचे त्रितत्त्व आधिभौतिक नाही; ते व्यवहारी किंवा लवचीक स्वरूपाचे आहे. त्रितत्त्वापैकी दोन तत्त्व एकत्व सिद्ध करण्याचे काम करतात; कारण पूर्ण करण्यासाठी त्यांना ध्येय आहे. तर मग शाश्वत अतिशायी ईश्वर म्हणून केवळ परमपिता उरतो. टरच्युलियन यांची ऐक्याविषयीची धारणाही गणिती नाही. त्यांच्याकडे ईश्वर म्हणून विभागणी नाही. ईश्वरी इच्छाशक्तीशी व व्यक्ती यांच्यात ती विधायक पद्धतीने एकीकृत असल्याने अधिक तत्त्वज्ञानिक, अधिक जैविक आहे. टरच्युलियन यांनीच ख्रिस्तशास्त्रात 'व्यक्ती' संकल्पनेचा समावेश केला.[२२]

ओरिजेन यांनीही येशूंचे ईश्वरापेक्षा वेगळेपण, मध्यस्थी व दुय्यम भूमिकेवर भर दिला. त्यांनी परमपित्यापासून लोगोस प्रकटणे ही मनातून इच्छा प्रकटण्यासारखी असल्याचे सागितले. इच्छेची कृती मनापासून काहीही तोडत नाही किंवा त्याची विभागणीचे कारणही बनत नाही. तर मग लोगोस दुय्यम दर्जाचे व दुय्यम मानाच्या पात्रतेचे आहे. या स्थितीमुळे ओरिजेन हे ख्रिस्तासारख्या प्रकटलेल्यांची भक्ती करण्यास परवानगी देत नाहीत. ख्रिस्तही ज्याची आराधना करतात केवळ त्याच परमपित्याची भक्ती करण्यास ते परवानगी देतात. ख्रिस्तांना केलेली प्रार्थना ख्रिस्त हे मध्यस्थी स्वीकारत ती त्यांच्या मार्फत परमपित्याला पोचवतात. ख्रिस्त व आत्मा त्यांच्यापेक्षा निम्न असलेल्या जीवांच्या परिघापासून उच्च आहेत, तसे ईश्वर या दोहोंपेक्षा उच्च स्थानी आहे.[२३]

आयरेनियस (इ.स. २०२) व सिकंद्रियाचे क्लेमेंट (इ.स. १५०–२१५) हे तत्त्ववेत्त्यांपेक्षा अधिक परंपरावादी होते. त्यांनी परमपिता, मुलगा व आत्मा यांचे आपसातील संबंध स्पष्ट करण्यासाठी बौद्धिक अन्वयार्थाचा आधार घेतला नाही. त्यांनी तत्त्वज्ञानिक संकल्पनांपेक्षा पारंपरिक संज्ञांवर विसंबून राहण्यास प्राधान्य दिले. ते लोगोस ख्रिस्तशास्त्राच्या त्यांच्या समजुतीबाबत अनेक प्रसंगी बचाववाद्यांपेक्षा खूप वेगळ्या मार्गाने जातात. येशू ख्रिस्ताच्या रूपाने अवतरलेला लोगोस हा स्वतः ईश्वरापेक्षा कमी नाही,

असे ते मानतात. लोगोस ईश्वरापेक्षा वेगळा असल्याचे समजणे व ईश्वराच्या तुलनेत तो दुय्यम असल्याचे किंवा बचाववादी सांगतात त्याप्रमाणे तो दुसरे काही तरी असल्याचा विचार करणे हे आयरेनियस यांना अशक्य होते. कारण, तसे केल्यास त्यांच्या लेखनाला ते विध्वंसकारी ठरले असते. त्यामुळे त्यांनी लोगोस म्हणजेच मुलगा पूर्णपणे ईश्वरासारखा असल्याचे सांगितले. थोडक्यात लोगोस ईश्वर आहे. ईश्वर अवतरला असून त्याच्यापर्यंत जाता येत नाही, पोचता येत नाही आणि तो या जगापासून वेगळा आहे, असे नाही.[२४]

चर्चेच्या या भागाचा समारोप एका तथ्यावर करता येईल. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत ख्रिस्ती ईश्वर सामान्यतः व येशू ख्रिस्त व्यक्ती म्हणून धारणा निश्चित नव्हती. उलट ती लवचीक, प्रवाही व संभ्रम असलेली होती. जस्टिन व ओरिजेन यांच्यासारख्या विचारशील ख्रिस्तींमध्ये ख्रिस्तांविषयी निम्न असण्याची संकल्पना, वेगळेपण, दुय्यम दर्जा सामान्य गोष्ट होती. दुसऱ्या बाजूला परंपरावाद्यांसह रूढीवादी चर्च (आपल्या सोयीसाठी ही संज्ञा वापरू शकलो तर ...) यांचा ख्रिस्तांविषयी कल परमपिता ईश्वरासोबत ऐक्य, समान व शाश्वत असण्याकडे होता. ईश्वराविषयी ही धारणा संभ्रम व समस्यांपासून मुक्त नव्हती. किंबहुना तिचे स्वरूप डोसेटिझमची शक्यता असलेले होते. त्यामुळे शारीरीकरणवाद, मानवीकरणवाद, अनेकेश्वरवाद, तसेच ती अतार्किक असल्याचा आरोप झाला. तोही अगदी सेल्सस यांच्यासारख्या पॅगन धर्मीय विरोधकांकडून.

चर्चचे ढोबळ डोसेटिझम हे त्याचे कमाल प्रतिपादन एकत्वशाहीवाद्यांच्या (मॉडॅलिस्ट मोनार्कियन्स) मांडणीत शोधते. ते विश्वनिर्माता ईश्वरास येशूचा पिता संबोधून या दोहोंच्या ऐक्याविषयी ठाम भूमिका मांडतात. येशू वा मुलगा हा परमपिता ईश्वरापेक्षा वेगळा वा दुसरा कुणी तरी असल्याचे सुचवणेही दोन्हींबाबत या मॉडॅलिस्ट (स्वरूपवादी) मंडळींसाठी ईशनिंदाचा प्रकार होता. या श्रद्धेला धर्मशास्त्रीय स्पर्श देत सामान्य बनवण्याचे काम दुसऱ्या शतकात एशिया मायनरमधील प्राझियस (इ.स. २००) व नोएटस यांनी केले. त्यांनी येशूंच्या ठायी पूर्ण ईश्वर असल्याचा युक्तिवाद केला. या चळवळीचा सर्वात जास्त मुखर व महत्त्वाचा धर्मशास्त्रज्ञ सेबेलियस (इ.स. २१५) बनला होता. या सर्वांची भूमिका स्पष्ट होती. धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे विश्वाचा निर्माता व पालनकर्ता ईश्वराशिवाय

दुसरा ईश्वर नाही. तो निर्माता आहे, ज्याला लोक पिता संबोधतात. ते 'मी व पिता सारखे आहोत', असे सांगणाऱ्या समान अर्थाच्या परिच्छेदांचा दाखला देतात. येशू व ईश्वराबाबत सांगताना ते दोघे पूर्णांशाने एकसमान असल्याचे जोर देऊन सांगतात. ते रूढीवादी ख्रिस्तींवर त्रिदेववादी म्हणून आरोप करतात.

येशू व ईश्वर यांच्या नात्यासंदर्भात टोकाची व नेमकी भूमिका स्पष्ट करणे रूढीवादी शिकवणुकीसाठी अपघाती व संदिग्ध असू शकेल. येशूंची स्वामीसारख्या विशेषणांनी भक्ती करणे व त्यांना स्पष्टपणे ईश्वर संबोधणे हे कुणालाही येशू व ईश्वर यांच्यातील फरक संपवण्याच्या दिशेने नेणारे आहे. 'ईश्वर जन्माला आला', 'वेदना भोगणारा ईश्वर' किंवा 'मृत ईश्वर' अशी वाक्ये ख्रिस्तींमध्ये सामान्य होती, असे आपल्याला सांगितले गेले आहे. अशा वाक्यांचा प्रसार इतका विस्तृत होता की, त्यांच्या वापरापासून अगदी त्रितत्त्व ऐक्य-एकत्वशाहीवाद्यांचा कट्टर विरोधक असलेल्या टरच्युलियनचीही सुटका झालेली नाही. या दोन्ही पक्षांतील मुख्य फरक म्हणजे नेमकेपणा व व्यवस्थिपणा. त्रितत्त्व ऐक्य-एकत्वशाहीवाद्यांनी ख्रिस्तांविषयी सामान्य ख्रिस्तीजनांमधील सर्वमान्य श्रद्धेला स्पष्ट व नेमके स्वरूप देत व्यवस्थित केले. ख्रिस्तींच्या भक्तिभावात बुडालेल्या भाषेतील संदिग्धतेला स्पष्ट धर्मशास्त्रीय रंग देणे हे त्यांचे धाडसी पाऊल होते. त्याच्या होणाऱ्या भयंकर दुष्परिणामुळे चर्च हे स्वीकारू शकत नव्हते. ते प्राथमिक शारीरीकरणवाद व पॅट्रिया पासियानिझमशिवाय दुसरे काही नव्हते (पॅट्रियापासियानिझम म्हणजे येशू ख्रिस्तांचे भोग पिता म्हणून ईश्वरानेही भोगल्याचे मानणे). ते येशूंचे देवत्व व एकेश्वरवाद हा चर्चचाच उद्देश जपत असले तरी त्याच्या सुप्त परिणामांमुळे चर्च त्याला धाडसी शब्दांत मान्यता देऊ शकत नव्हता. येशू या ऐतिहासिक व्यक्तीत ईश्वर जर पूर्णांशाने प्रकटला असेल तर अतिशायी ईश्वरासाठी जागाच राहात नाही. नायसियन परिषदेच्या आधीचे चर्च ईश्वराचा काही भाग अवतरित झाला नाही; त्यामुळे तो येशूमध्ये पूर्णांशाने प्रकट होऊ शकला, असे मानत. पण ही गोंधळाची भूमिका मुक्ती मिळवू इच्छिणाऱ्या श्रद्धावानांना स्वीकारण्याजोगी वाटत नव्हती.

जुन्या करारातील मानवीकरण व शारीरीकरण असलेल्या वर्णनांनी एकातच तिघे असल्याच्या दैवी कल्पनेच्या अन्वयार्थात महत्त्वाची भूमिका

बजावली. अतिशायी ईश्वराविषयी ग्रीक तत्त्वज्ञानाला माहिती होती. त्यामुळे त्याने ईश्वराच्या मानवीकरणाची किंवा ईश्वराच्या इतर संकल्पनांची आदिम व पॅगनवादी म्हणून खिल्ली उडवली आहे. प्लेटोवादातील दुय्यम व वेगळ्या देवत्वाच्या योजनेची ख्रिस्तींना सुरुवातीला ईश्वराचे परिपूर्ण अतिशायीत्व टिकवण्यात मदत झाली आणि पॅगनवादी म्हणून टीकेपासून बचाव झाला. मात्र, दुसऱ्या बाजूला अशी दैवी धारणा मुक्ती मिळवण्याच्या उद्देशासाठी पुरेशी वाटत नव्हती. सामान्य श्रद्धावान त्यांच्या स्वतःच्या मुक्तीसाठी अतिशायीत्वाच्या पलीकडे जाणाऱ्या ईश्वरास, त्यांच्या पापांच्या यज्ञकुंडात स्वतःचे बलिदान देणाऱ्या ईश्वरास प्राधान्य देत होते. हा ताण ख्रिस्तशास्त्राच्या संपूर्ण इतिहासात कायम असल्याचे दिसून येते. यामुळे ईश्वराचे अतिशायीत्व व अपरिवर्तनीयता पणाला लागलेली असल्याने रूढीवादाचे समर्थक असलेल्या रोमच्या बिशप मंडळींनी (झेफिरिनस वगळता) त्रितत्त्वऐक्य-एकत्वशाहीवाद्यांची पाखंडी म्हणून निर्भर्त्सना केली. या टीकेनंतरही एकत्वशाहीवाद्यांचा मानवीकरणवाद तोंड वर काढत राहिला. ख्रिस्तींच्या संपूर्ण इतिहासात लोकांनी ख्रिस्तांचे देवत्व नाकारणाऱ्यांची वारंवार निर्भर्त्सना केली आहे. मात्र, परमपिता व मुलगा यांच्यातील फरक नाकारणाऱ्यांची निर्भर्त्सना खूप दुर्मिळ आहे. ख्रिस्ताचे देवत्व नाकारणे हे ख्रिस्तीविरोधी समजले गेले; तर दोहोतील फरक नाकारणे हे केवळ बेअकलीपणा समजला गेला. ठाम विरोधानंतरही त्रितत्त्वऐक्यवाद किंवा ईश्वराची स्पष्ट मानवीकरणवादी संकल्पना ख्रिस्ती विश्वात सर्वत्र कायम होती; खास करून साध्याभोळ्या ख्रिस्ती लोकांमध्ये. बहुसंख्य सामान्य लोकांची तीच धारणा होती आणि एका युगात वरचष्मा असलेल्या धर्मपरायण गोष्टीशी ती सौहार्द बाळगून होती.

दरम्यानच्या काळात एकत्वशाहीचा एक वेगळा प्रवाह पूर्व व पश्चिमेत निर्माण झाला. त्याने येशू व ईश्वर यांच्यातील नात्याचा विषय एका वेगळ्या टोकाला नेला. पश्चिमेत थिओडोटस (इ.स. १९०) यांनी येशू माणूस असल्याची शिकवण दिली. त्यांनी सांगितले की, ईश्वराच्या विशेष आदेशाने पवित्र आत्म्यामार्फत येशू कुमारिकेच्या पोटी जन्माला आले. कुमारिकेच्या पोटी जन्माला येणे ही बाब त्यांना ईश्वर किंवा दैवी बनवत नाही. येशूंच्या पृथ्वीवरील जीवनात ईश्वराने त्यांची धर्मपरायणता तपासली आणि बाप्तिस्माच्या काळात त्यांच्या ठायी पवित्र आत्मा उतरवला. त्यांच्यासाठी

ईश्वराने उद्देश ठरवला आणि त्यांना कार्यप्रवृत्त केले. बाप्तिस्माच्या वेळी येशू हे ख्रिस्त बनले. ते स्वर्गीय किंवा दैवी होते म्हणून ख्रिस्त बनले नाहीत. त्यांच्या ख्रिस्त होण्यामागचे कारण त्यांना दिलेला कार्यउद्देश होता. तसेच मानवी सद्गुणांच्या बाबतीत येशू उच्च स्थानी गेले होते आणि त्याविषयी प्राधिकार मिळवला होता. त्यांच्या या निवडीने किंवा दत्तक जाण्याने कोणत्याही अंगाने त्यांचे माणूसपण कमी केले नाही किंवा त्यांना ईश्वरही बनवले नाही. ते नेहमीच ईश्वराचे आज्ञाधारक सेवक बनून राहिले. या मांडणीने थिओडोटस यांना देवत्व नाकारणाऱ्या बंडाचे आणि दत्तकदेवपुत्रवादाचे (Adoptionism) संस्थापक म्हणून ओळख दिली. दत्तकदेवपुत्रवाद्यांनी बायबली एकेश्वरवादी परिच्छेदाचा आधार दिला. ख्रिस्तांचे वेगळेपण व दुय्यम दर्जा सांगणाऱ्या शुभवार्तांमधील परिच्छेदांचा वापर केला. शेवटी येशू ख्रिस्त माणूस असल्याचे व पार्थिव स्वरूप असल्याचे स्पष्टपणे सांगणाऱ्या शुभवार्तांचा आधार घेतला. तसेच त्यांना ईश्वराचे अतिशायीत्व राखण्यात आणि ख्रिस्तांच्य मृत्यूतून माणसाला मुक्ती मिळण्यात समतोल राखू शकण्यात यश आले. पण, त्यांची ही मांडणी रूढीवाद्यांसाठी पुरेशी नव्हती.

पूर्वेत या चळवळीस सॅमोसटा येथील ॲण्टीओकचे बिशप पॉल यांच्या नेतृत्वाखाली लक्षणीयरित्या संजीवनी मिळाली. सॅमोसटा शहर राणी झेनोबिया यांच्या पलमिरा राज्याची राजधानी होती. पॉल यांना येशूमध्ये देवत्व आढळले नाही. त्यांच्या मते, येशूंचे स्वरूप पूर्णपणे मानवी होते. ते जमिनीवरचे माणूस होते; ते काही वरून स्वर्गातून प्रकटलेले दैवी घटक नव्हते. येशूंचा जन्म सामान्य मानवी होता. ते ज्ञान व विवेकासह वाढत गेले. ईश्वरी लोगोसने त्यांना वरून प्रेरित केले आणि आतील माणूस म्हणून तो त्यांच्या ठायी होता. येशूंनी त्यांचे माणूसपण हरवले नाही किंवा मानवी स्वभावही गमावला नाही. तो येशूंमध्ये नेहमीच प्रभावी स्वरूपात होता. त्यांच्या स्वभावाला लोगोसने परिष्कृत केले, अभिसंस्कृत केले व त्याचे मार्गदर्शन केले. लोगोस व येशू यांचे एकत्र येणे हे काही दोन घटकांचे संयुग वा मिश्रण होणे नव्हते किंवा दोन स्वभावांचे विलगीकरणही नव्हते. तर ते इच्छा व गुणवत्ता यांचा मिलाफ होता. मेरी यांनी दैवी लोगोसला धारण केले नाही किंवा जन्मही दिला नाही. त्यांनी येशू नावाच्या माणसाला जन्म दिला; इतर माणसांप्रमाणे. इतकेच नाही तर, बाप्तिस्माच्या वेळी येशूंना वरून आत्म्याचा स्पर्श घडवण्यात आला; लोगोसचा नाही. येशू खास होते ते वेगळ्या अर्थाने.

ते सतत खास दर्जाच्या दैवी कृपाछत्राखाली जगले. ते अद्वितीय होते. ही अद्वितीयता त्यांच्या मनोवृत्ती व इच्छेच्या एकत्र येण्यात होती. ती काही त्यांच्या व दैवी घटकाच्या एकत्र येण्यात नव्हती.

येशूंच्या चांगुलपणा व ईश्वरी अंशाच्या आधीच्या अस्तित्वाविषयी बोलण्यास आपल्याला मुभा आहे. पॉल येशूंच्या दैवी स्वरूपावर विश्वास ठेवत नव्हते हे स्पष्ट आहे. दुसऱ्या बाजूला दत्तकदेवपुत्रवादात त्यांनी येशूंचे दैवी स्वरूप किंवा त्यांना ईश्वराचे पुत्र म्हणून स्वीकारणे हे एकेश्वरवादास हानिकारक आहे; कारण ते दोन ईश्वर असण्याकडे नेते, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. पॉल यांनी चर्चमधील प्रार्थनांमध्ये कोणत्याही अंगाने ख्रिस्त दैवी असण्याचे सांगणारी स्तोत्रे गाण्यास मनाई केली. परिणामी या मुद्द्यावर दोन परिषदांत अपयशानंतर इ.स. २६८च्या ॲण्टीओक चर्च परिषदेत पॉल यांची निर्भर्त्सना करण्यात आली. त्यांनी येशूंचे पूर्वअस्तित्व व त्यांच्यातील ईश्वरी ऐक्य किंवा दुसऱ्या शब्दांत सांगयाचे तर दैवी स्वरूप नाकारल्याने त्यांना धर्मभ्रष्ट जाहीर करण्यात आले.

दोन्ही स्वरूपाच्या एकलशाहीत्ववादास धर्मभ्रष्ट जाहीर केलेले असले तरी, वेगळ्या अंगाने या विचाराने रूढीवादास आव्हान दिले आणि अतिशय गुंतागुंतीच्या व अवघड गोष्टींना उत्तर देण्यास भाग पाडले. रूढीवाद्यांना त्यांची अतिशायी व एक ईश्वराची संकल्पना बुद्धिगम्य शब्दांत स्पष्ट करण्यास भाग पाडले. रूढीवादी पादरींनी त्यांच्या लोगोस ख्रिस्तशास्त्राच्या आधारे ईश्वराच्या सापेक्ष ऐक्याच्या संकल्पनेवर जोर दिला. तिसरे शतक संपतासंपता लोगोस ख्रिस्तशास्त्र सर्व भागातील चर्चचा सर्वमान्य हिस्सा बनले. त्याकाळात विशेषतः पूर्वेतील बहुतांश पंथांमध्ये त्याने स्थान मिळवले.

अधिकृत ख्रिस्तशास्त्राने किंवा येशू दैवी असल्याच्या मांडणीने एकलशाहीत्ववाद्यांच्या दैवी-मानवी सिद्धांताला गुंडाळले असले तरी त्याचा मागमूस न ठेवता ते ओलांडू शकले नाही. लुसियन व एरियस हे बिशप पॉल यांच्या अन्वयार्थाने व तर्काने प्रेरित झाले. एरियस यांनी ख्रिस्ताचे स्वरूप व त्यांचे ईश्वराशी नात्याचा विषय लोकांमध्ये मांडला आणि एकच खळबळ माजवली. एरियस यांनी सांगितले की, ईश्वर घटक व व्यक्ती म्हणून एक आहे. तोच एकमेव शाश्वत व अजन्मी आहे. लोगोस ही केवळ निर्मिती किंवा निर्मित जीव आहे. एकेकाळी तो अस्तित्वात नव्हता आणि नंतर त्याला परमपित्याने

शून्यातून बनवले. येशू पुत्र व ईश्वर पिता असल्याचे पिता-पुत्र संबंध खरे आहेत. परमपिता पुत्राच्या आधीपासून अस्तित्वात आहे. येशूच्या पूर्वी अस्तित्वात नसलेल्या घटकापासून परमपित्याने पुत्र येशू तयार केला. यासाठी एरियस यांनी धर्मग्रंथातील दाखले दिले. जॉन १४:२८ मध्ये म्हटले आहे की, स्वतः येशूंनी स्पष्टपणे सांगितले, पिता 'माझ्या पेक्षा मोठा आहे', जॉन १७:२०-२६ मध्ये येशूंनी त्यांच्या सहकारी शिष्यांना प्रेरित करताना सांगितले, 'आपण एक असल्यासारखे एक व्हा'. एरियस यांनी सांगितले की, शिष्य व ईश्वराशी किंवा येशूंशी दैवी स्वरूपामुळे एकरूप होऊ शकत नाहीत. पण इच्छेच्या बाबतीत होऊ शकतात. त्याच प्रमाणे मुलाचे पित्याशी ऐक्य हे इच्छेबाबत आहे; दैवी किंवा संयुग म्हणून नाही. त्यात आणखी भर म्हणजे, १ कोरिनथियन ८:५-६मध्ये ईश्वर व ख्रिस्त यांच्यात फरक केलेला आहे. ईश्वर परिपूर्ण आहे. मात्र, ईश्वरपुत्र ज्ञान व विवेकात प्रगती करत राहतो. याचाच अर्थ तो परिवर्तनीय आहे. मुलाला लोगोस संबोधता येईल. पण तो शाश्वत अपौरुषेय लोगोस किंवा ईश्वरापेक्षा स्पष्टपणे वेगळा आहे. मुलाचे स्वरूप ईश्वरासम नाही व मानवांसारखेही नाही. मुलगा, जो येशूंमध्ये अवतरित झाला आहे, तो सर्व जीवांत पहिला आहे व इतरांपेक्षा मग ते देवदूत असोत वा माणूस असोत त्याचा दर्जा उच्च आहे. त्याने पृथ्वीवरील जीवनात जे कार्य केले व दैवी इच्छेवर अढळ भक्ती ठेवली या कारणांमुळे मुलाला वैभव व स्वामित्व मिळाले आणि अगदी ईश्वरही संबोधता येईल व भक्ती करता येईल, असे स्थान मिळाले. पण त्याला ईश्वर म्हणून ओळखणे ही ईशनिंदा आहे.

चर्चला वाटले एरियसने ख्रिस्ताचे देवत्व व माणूसपण मान्य केले आणि त्याचवेळी ते शून्यवत ठरवले. एरियसचे हे 'अर्ध ईश्वर' धर्मशास्त्र रूढीवादी लोगोस ख्रिस्तशास्त्राच्या खंद्या समर्थकांनी नाकारले. शेवटी ते पाखंड असल्याचे सांगत त्याचा पराभव केला.

ईश्वराविषयी अतिशायी दृष्टीकोन व उत्थानासाठी ईश्वराचा बलिदानाने मृत्यू या दोहोंचा चालत आलेला संघर्ष दोन्ही पक्षांसाठी स्रोत आहे. एरियन समर्थकांनी दैवीकरण व गृहीत उत्थानाच्या तुलनेत ईश्वराच्या अतिशायी असण्याला प्राधान्य दिले. अधिकृत पक्ष या संघर्षात स्वतःला जीवंत ठेवताना कृत्रिम मलमपट्टी व अतार्किक गृहीतकांचा आधार घेतो. नायसियाच्या परिषदेत अथेनासियस समर्थकांनी हेच साध्य केले. त्यांनी एरियस व त्याच्या

ख्रिस्त स्वतंत्र वेगळे असल्याच्या सिद्धांताच्या विरोधात युक्तिवाद वरील पद्धतीने केला आणि लोगोस ख्रिस्तशास्त्राने त्याच्या विरोधकांवर कायमस्वरूपी विजय मिळवला. इ.स. ३२५मध्ये सम्राट कॉन्स्टेनटिनने चर्चमध्ये एकवाक्यता आणण्यासाठी नायसियामध्ये स्वतःच्या अध्यक्षतेखाली परिषदा भरवल्या. नायसियाच्या परिषदेत लेखी जाहीर करण्यात आले की, परमपिता व पुत्र एकाच तत्त्वाचे (Homoousios) बनले आहेत. आणि त्यानंतर लोगोस ख्रिस्तशास्त्राने संपूर्ण विजय मिळवला. प्रमुख ईश्वर एक स्वतंत्र आहे, त्यासोबत उत्थानकर्ता म्हणून मानवी व्यक्ती याविचाराची निर्भर्त्सना करण्यात आली आणि ते यापुढे चर्चमध्ये खपवून घेतले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. एरियस यांचीही महापाखंडी म्हणून निर्भर्त्सना करण्यात आली. पुढे अनेक शतके त्याच्या पदरी अशीच वागणूक आली. त्याचे ख्रिस्ती धर्माविषयीचे गांभीर्य, धर्मग्रंथांबाबत त्याची अस्सल अंतर्दृष्टी व त्याचा एकेश्वरवादी अतिशायीत्वाचा इतिहास अव्हेरता येणारा नाही. खरे पाहिले तर एरियस यांनी तसे नवीन काहीही केलेले नव्हते. त्यांनी आधीच्याच अतिशायीवादी विचारांचे एकत्रीकरण व व्यवस्थीकरण खुल्या व एकजीव स्वरूपात केले. इतकेच नाही तर त्यांनी रूढीवाद्यांना त्यांच्या आरामदायी कोषातून बाहेर काढले आणि वास्तवाला तोंड देण्यास भाग पाडले. मात्र ते त्यांना बरे वाटले नाही आणि त्याला भिडण्यासाठी ते तयारही नव्हते. रूढीवाद्यांची प्रतिक्रिया चांगलेच नुकसान करणारी होती. त्यांनी एरियस यांच्यावर धर्मग्रंथाचा अनादर करत असल्याचा आरोप लावला. असे करत असताना ते स्वतःच करत असलेल्या अनादराकडे त्यांनी दुर्लक्ष केले. इतकेच नाही तर त्यांनी एरियस यांची मते वगळण्यासाठी धर्मग्रंथबाह्य व निव्वळ तत्त्वज्ञानिक आणि विरोधाभासी संज्ञा "Homoousios" स्वीकारण्यास भाग पाडले.

पारंपरिक ख्रिस्तीधर्म खऱ्या व अतिशायी एकेश्वरवादच्या धारणांचा आणि व्यक्ती म्हणून ख्रिस्ताविषयीची त्याची समज या प्रश्नांचा शोध टाळत आलेला आहे. गूढत्व नावाखालच्या व विरोधाभासी गोष्टींनी तर्कसंगत विचार करणाऱ्या अनेक श्रद्धावानांना गोंधळात टाकले आहे. एरियस यांनी हे अस्सल मुद्दे लोकांपुढे सार्वजनिक केले. त्यातून त्यांनी लोकांमधील अस्वस्थता जागी केली. हे एरियस यांच्या लोकप्रियतेचे कारण होते. आजही अगदी समकालीन ख्रिस्ती श्रद्धावान, सामान्यजन व धर्मपंडितांमध्ये त्यांचे अनेक अनुयायी असणे

शक्य आहे. थोडक्यात ईश्वर व ख्रिस्त यांच्या नात्याचा न सुटलेला गुंता सोडवण्याचा प्रयत्न करणारे एरियस धाडसी पण अभिसंस्कृत व्यक्ती होते. त्यांनी नेमकी भूमिका घेत व स्पष्ट विचार मांडत अडचण शोधली व उत्तर देऊ केले. ही गोष्ट चर्चच्या गूढ 'अवतारा'स सुरुंग लावणारी होती. ते गूढ नायसियाच्या परिषदेने राखलेले होते.

नायसियन तोडगा द्विईश्वरवादी, विरोधाभासी व शारीरीकरण असलेला आहे. तो ए. हारनॅक यांच्या शब्दांत 'विसंगत' आहे.[२४] तो येशूंच्या देवत्वासाठी त्यांच्या माणूसपणाचे अतिशय उघडपणे संकोच करणारा आहे. नायसियन परिषदेनंतरचा ख्रिस्ती धारणेचा इतिहास हा ईश्वरीमाणसातील श्रद्धेचा इतिहास आहे. ख्रिस्ती धर्माची व्याख्या करण्यात गुंतलेली पुढची पिढी ईश्वरीमाणूस येशूंनी केलेल्या उत्थानाच्या कार्याभोवतीच घुटमळत राहिली. पूर्व व पश्चिमेतील ख्रिस्तीधर्म थोड्याबहुत फरकाने नायसियन परिषदेच्या ख्रिस्तशास्त्राशीच प्रामुख्याने प्रामाणिक राहिला. हे घडले ना पवित्र आत्म्याच्या सांगण्यावरून, ना सर्वचर्च परिषदेतील ३०० पेक्षा जास्त सहभागी बिशप मंडळींच्या सांगण्यावरून. हे घडले पोलादी मूठ असलेल्या सम्राटाच्या सांगण्यावरून. बिशप मंडळींना तोंड देखलेपणा व क्वचित दिलेले महत्त्व याचा अपवाद वगळता तोच घटक निर्णायक ठरला. नंतरच्या ख्रिस्ती व्यवस्थेनेही या परिषदेच्या निर्णयांना व नियमांना अधिकृत म्हणून प्रमाण मानले. हे धार्मिक निर्णय व नियम राजकीय बाजूने जाणारे होते आणि एरियानिझमविरुद्ध लढण्याशिवाय त्याचा दुसरा कोणताही उद्देश नव्हता, हे लक्षात घेतले गेले नाही. ही तितकीच दुर्वैवी बाब.

या मूलभूत ख्रिस्ती धारणेची मध्यवर्ती संज्ञा "Homoousios". त्याचा अर्थ ईश्वराप्रमाणे येशूही त्याच तत्त्वापासून बनले. ही धर्मशास्त्रीय संज्ञा असली तरी हे परिपूर्ण धर्मशास्त्रीय उत्तर नाही. हे फारशा स्पष्टीकरणाच्या, नेमकेपणाच्या व तर्कसंगतीच्या भानगडीत न पडता ख्रिस्तांचे शुद्ध व निश्चयी देवत्व सांगण्यासाठी दिले जाणारे सामान्य माणसाचे उत्तर आहे. हे उत्तर अतिशायी ईश्वर व ख्रिस्त यांच्यात त्रितत्त्वातून प्रकटलेल्या श्रेणीची सीमारेषा सुरुवातीच्या प्लेटावादी पादरी मंडळींनी जपल्याप्रमाणे जपत नाही. तसेच त्याचे गूढ रहस्य कुलूपबंद पेटीतही ठेवत नाही. उलट हे उत्तर मुक्ती देणारी एकत्वशाही योजना लोकांपुढे सार्वजनिक करते आणि स्पष्ट आश्वासक शब्दांत

शिकवते. परिणामी त्याच्यावर व त्याचे पाठीराखे अथेनासियस व मर्सिलस यांच्यावर सेबेलियानिमझमचा आरोप झाला (सेबेलियानिमझम म्हणजे पिता, पुत्र व आत्मा हे तीन तत्त्व एकाच ईश्वराची तीन स्वतंत्र रूपे असल्याचे मानणे).

जोरदार विरोध करत एरियन समर्थकांनी युक्तिवाद केला. ईश्वर व लोगोसच्या नात्यासंदर्भात अशी तुलना व मांडणी पूर्णपणे अनुचित असल्याचे सांगितले. त्यांची बाजू मांडण्यासाठी त्यांनी तीन कारणे पुढे केली. १) ईश्वर, परमपिता स्वयंभू आहे. उगम नसलेला, शाश्वत आहे आणि मुलगा पित्यापासून अस्तित्वात आला आहे. २) परमपित्याचा उगम झालेला नाही व उगम होऊ शकत नाही. याउलट मुलगा उगम पावला व उगम पावू शकतो. ३) परमपित्याकडून मुलाचा उगम झाला, मात्र मुलाने त्याच्या मुलाला अस्तित्वात आणले नाही. तर मग उगम नसलेला परमपिता व उगम असलेला मुलगा हे एकसमान कसे असू शकतील? एरियस यांचा युक्तिवाद तर्कसंगत, विवेकी व सुव्यवस्थित आहे. अथेनासियससारख्या पारंपरिक बचाववाद्यांची दुसरी बाजू तर्कदुष्ट व गोंधळात टाकणारी आहे. इतकेच नाही तर त्यांची उत्तरे विरोधाभासी आहेत. त्यांची धारणा मुलाला उगम पावणारा व उगम न पावणारा असे दोन्ही असल्याचे सांगते. म्हणजेच मुलगा ईश्वर म्हणून उगम न पावू शकणारा आणि त्याच वेळी त्रितत्त्वातील नात्याच्या संदर्भात परमपित्याकडून उगम पावणारा. हारनॅक यांच्या रास्त युक्तिवादाप्रमाणे, 'वस्तुस्थिती अशी की, अथेनासियस यांच्या मांडणीचे आकलनक्षम स्वरूप मांडू शकेल असे सूत्र सध्याच्या तत्त्वज्ञानात नाही.'[२६] ढोबळ मानाने असेच त्रितत्त्वाच्या ख्रिस्ती धारणेविषयी सांगता येईल.

ख्रिस्तीधर्माने शक्तिकेंद्रात स्थान मिळवले होते; पण राजकीय प्राधिकार हे काही न सुटलेल्या धर्मशास्त्रीय गुंत्याचे खरेखुरे उत्तर होऊ शकत नव्हते. हे प्रभावी धर्मशास्त्रीय गुंते चर्चच्या नेतृत्वासह सामान्य अनुयायांना सतत बाधत राहिले. हे स्वाभाविक होते. कारण नायसियन परिषदेत स्पष्टपणे त्रितत्त्वांचा स्वीकार केला गेलेला असला तरी, तिसरे तत्त्व असलेल्या आत्म्याविषयी एकच वक्तव्य सापडते आणि तेही स्पष्टीकरण नसलेले. आपल्या मानवीकरणाच्या अभ्यासाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ख्रिस्ताचे देवत्व पूर्णपणे संरक्षित केले व धर्मशास्त्रीय चर्चेच्या, तसेच तत्त्वज्ञानाच्या चर्चेच्या  परिघाबाहेर ठेवण्यात आले, त्याला मोडॅलिझम

(तिन्ही तत्त्व एकच असून त्यात भेद नाही) म्हटले गेले. तारणहार ख्रिस्तांना देव करणारे आणि याबाबतीत त्यांचे स्थान शक्य तितकेच उच्च करणाऱ्या व ईश्वर म्हणून भक्ती करणाऱ्या सर्व मार्गांना मुक्त हस्ताने मुभा देण्यात आली. भक्तांना अनेकेश्वरवादी, अनाकलनवादी किंवा मानवीकरणवादी असे दोष न लावता हे करण्यात आले. मात्र, तोच दर्जा असलेल्या पवित्र आत्म्याविषयी असे काहीही सांगण्यात आले नाही. नायसियन सिद्धांताने नव्याने भर घातलेल्या पवित्र आत्म्याविषयी मोघम व संभ्रमाची स्थिती ठेवली. नायसियन सिद्धांत सम्राट कॉन्स्टेनटाइनच्या दबावाखाली झालेल्या परिषदेत आकारास आला. तीत उपस्थित बहुतांश बिशप मंडळींचा तो कल नव्हता. किंबहुना ते त्याच्या विरुद्ध बाजूस होते. पण या सिद्धांताने पवित्र आत्म्याविषयी धर्मशास्त्रीय वाद संपुष्टात आणला नाही. परिषदेने येशूंचे स्वरूप निश्चित केले; मात्र ती समान दर्जा व शाश्वत मानल्या गेलेल्या पवित्र त्रितत्त्वातील तिसरे तत्त्व म्हणजेच पवित्र आत्म्याचे स्वरूप व त्याची भूमिका स्पष्ट करण्यात अपयशी ठरली. परिषदेने वास्तविक धर्मशास्त्रीय गुंत्यासाठी राजकीय उत्तर किंवा मुत्सद्देगिरीतील गुळगुळीत उत्तर जरूर दिले. परिषदेच्या लवादी स्वरूपाच्या निर्णयांनी संघर्षरत भावनांना व अन्वयार्थांना तात्पुरते शांत करण्यात जरूर यश मिळवले. मात्र, दीर्घकालीन धर्मशास्त्रीय प्रभाव उमटणे किंवा समाधान होणे शक्य नव्हते. परिषदेचे निर्णय पवित्र आत्म्यापासून प्रेरित असल्याचा दावा लवकरच फोल ठरला आणि तो चुकीचा असल्याचे सिद्ध झाले. हे घडले ते (इ.स. ३३६मध्ये) स्वतः कॉन्स्टनटाइनचे मन फिरल्याच्या किरकोळ कारणामुळे आणि खास करून त्याच्या मृत्यूनंतर (इ.स. ३३७) परिषदेच्या तथाकथित पवित्र आत्म्याने शिक्कामोर्तब केलेल्या निर्णयात बदल करण्यात आला. त्यामुळे ते दैवी नसल्याचे पितळ उघडे पडले. त्याने सर्वकाही बदलले; वरचे खाली गेले आणि खालचे वर आले. एक शाही फर्मान निघाले आणि परिषदेचे जे संत होते ते दोषी झाले आणि जे कालपर्यंत दोषी होते ते संत झाले. पाखंडी म्हटले गेलेल्या एरियनचा त्याच्या विचारांसह गौरव करण्यात आला आणि अथेनासियसला परागंदा करण्यात आले. जेरोमने म्हटले, 'एरियन गवसल्याच्या आश्चर्याच्या सुखद धक्क्याने संपूर्ण जगाने उच्चारले आहे'[२७] यात अतिशयोक्तीचा भाग तसा कमीच होता. पुन्हा एकदा नायसियन सिद्धांताच्या मदतीला सम्राटांची शक्ती धावून आली. पहिल्यांदा वॅलेंटायननियन (इ.स.३६४) नंतर थिओडोसियस (इ.स.३८०)च्या रूपाने. इ.स.३८१ मध्ये

कॉन्स्टंटिनोपल परिषदेत काही दुरुस्ती व काही भर घालत नायसियन सिद्धांत पुन्हा स्वीकारण्यात आला.

इथे एक गोष्ट नमूद करणे योग्य होईल. बासिल द ग्रेट (इ.स.३३०-३७९), ग्रेगोरी ऑफ नाझियनझूझ (इ.स. ३२९-३८९) व बासिल यांचे बंधू ग्रेगोरी नायस्सा (इ.स.३२९-३९४) हे कपॅडोसियन फादर त्यांच्या त्रितत्तवादाच्या सूत्रासाठी ओळखले जातात. ते अथेनासियनच्या मताशी पूर्णपणे सहमत असले तरी एका बाबतीत ते वेगळे मत मांडतात. येशू ख्रिस्त परिपूर्ण ईश्वर असल्याच्या आणि परमपिता व मुलगा यांचे तत्त्वघटक एकच असल्याच्या अथेननासियनच्या मांडणीशी ते सहमत आहेत. त्यात त्यांना काही अडचण वाटत नाही. मात्र, पिता, मुलगा व आत्मा हे एकाच तत्त्वाचे निरनिराळी समान रूपे आहेत, जसे एखादा माणूस पिता असतो, मुलगा असतो त्याच वेळी तो भाऊही असतो. या अथेनासियनच्या मांडणीशी कपॅडोसियन पादरी मंडळी सहमत होत नाहीत. त्यांच्या मते, हे तिन्ही तत्त्व परमपिता, मुलगा व आत्मा हे एकसमान असले तरी त्यांचे अस्तित्व मात्र एकमेकांपासून स्वतंत्र आहे.

संपूर्ण ख्रिस्ती इतिहासातील त्रितत्त्व धारणा स्पष्ट करणाऱ्या दोन वर्णनशास्त्रांपैकी एक कपॅडोसियन त्रितत्त्व वर्णनशास्त्र आहे. वर पाहिल्याप्रमाणे कपॅडोसियन हे तीन तत्त्वांना स्वतंत्र गृहीत धरून सुरुवात करतात. अथेनासियन वर्णनशास्त्र त्रितत्त्वास एखाद्या माणसातील तीन घटकांच्या (स्मृती, इच्छा व विवेक) आपसातील नात्यांप्रमाणे एकसमान असल्याचे मानते. दोन्ही समाधानकारक नाहीत आणि त्यांत अनेक त्रुटी आहेत. पहिली धारणा उघडपणे त्रिदेववादाकडे नेते, तर दुसरी धारणा सेबेलियानिझम किंवा युनिटेरियानिझमकडे नेते. तीन घटकांच्या (व्यक्तींच्या) सामाईक शाश्वतता, सामाईक कृती व सामाईक इच्छाशक्ती याचा एखाद्याने कितीही विरोध केला तरी त्यांच्या एकसमान स्वरूपाच्या व्याख्येवरून ते एकेश्वरवादी धर्मशास्त्र असल्याचे म्हणणे अवघड आहे. कपॅडोसियन यांचे तिघांत एकच तत्त्व किंवा तीन स्वतंत्र अस्तिव हे दैवी त्रितत्त्वाचे वैज्ञानिक सूत्र असल्याचे सांगत असले तरी ज्याचे उत्तर देण्याचा हा प्रयत्न आहे, त्या मूळ समस्येचे उत्तर मात्र मिळत नाही. म्हणजेच ऐतिहासिक व्यक्तिरेखा येशू व ईश्वर यांच्यातील नाते काय व कसे आहे, याचे उत्तर मिळत नाही. त्रितत्त्वातील तीन घटक स्पष्ट करून

सांगण्यासाठी वापरलेले शब्द पॉल टिलीच यांनी सांगितल्याप्रमाणे 'पोकळ' आहेत.[२८] हे सूत्र डोसेटिझम, सेबेलियानिझम किंवा अथेनासियनच्या मोडॅलिझमकडे नेत नसले तरी, ते त्याहीपेक्षा जास्त विनाशकारी म्हणता येईल अशा 'त्रिईश्वरवादा'कडे नेते.

आतापर्यंत स्पष्ट झाले की, रूढीवादी फादर येशू ख्रिस्तांच्या सत्य, परिपूर्ण व पूर्णांशाने ईश्वर असण्यावर जोर देतात. ते दोन परस्परविरोधी तत्त्वांची मांडणी करण्यास प्रेरित झाले. परमपित्याच्या रूपात अतिशायी व अपरिवर्तनीय ईश्वर आणि ख्रिस्त म्हणून मानव रूपात अवतार घेतलेला पूर्ण ईश्वर. याची मांडणी करण्यासाठी दिलेले सर्व स्पष्टीकरण, मग ते स्वरूपाचे असो, व्यक्तीचे असो किंवा अन्य अन्वयार्थ असोत, ते प्रश्नातीत शारीरीकरणवाद आणि मानवीकरणवाद असल्याचा भांडाफोड करते. सत्य, ऐतिहासिक व पूर्ण मानवी जीवन जगणारी व्यक्ती ईश्वराचा परिपूर्ण अवतार असल्याचे सांगणे आणि पुन्हा त्यावर शारीरीकरणवादाचा व मानवीकरणवादाचा होत असलेला आरोप नाकारणे, हे दोन्ही एकाच वेळी साधणे शक्य नाही. व्यक्ती म्हणून येशू ख्रिस्तांचे स्वरूप व इच्छेच्या चर्चेकडे आपण वळल्यानंतर हे अधिकच स्पष्ट होते. हा मुद्दा नंतरच्या वादांच्या केंद्रस्थानी आहे. येशू ख्रिस्तांना ईश्वर असल्याचे मान्य व जाहीर करणारा मुक्तीचा मार्ग हा ख्रिस्तींची प्रेरणा होती व आहे. सुरुवातीचे फादर ते कॉन्स्टेनटिनोपल परिषदेपर्यंत एकसामाईक धागा ख्रिस्ती धारणांना एकत्र गुंफत जातो. त्यातून अतिशायी ईश्वरासह ख्रिस्तांचे परिपूर्ण देवत्व जपणे ही गरज. त्याच वेळी ख्रिस्तांच्या माणूसपणाचा प्रश्न मात्र कायम भेडसावत राहिला. येशू एक ऐतिहासिक वास्तव म्हणून शुभवार्तांमध्ये आलेल्या उल्लेखांमुळे त्यांचे हे माणूसपण नाकारणे केवळ अशक्य आहे. टप्प्याटप्याने चर्च येशू ईश्वर असल्याच्या व परिपूर्ण ईश्वर असल्याच्या निष्कर्षावर शेवटी एकदा पोचले. त्यानंतर चर्चपुढे देवी-मानवी ऐक्य कोणत्या मार्गाने प्रस्थापित करायचे, या नात्यात समतोल कसा राखायचा आणि त्याचा अर्थ कसा लावायचा असे प्रश्न आ वासून उभे राहिले. ख्रिस्ताचे माणूस असणे व त्याचवेळी ईश्वर असणे या अडचणीच्या मुद्याने काहींना डोसेटिझमकडे (अलौकिकशरीरवाद) नेले, काहींना अडॉपशनिझमकडे (दत्तकदेवपुत्रवाद) नेले. येशू यांना परिपूर्ण ईश्वर मानल्याने समस्या जादा गंभीर व नाजूक बनली.

नायसियन परिषदेच्या काही दशकांनंतर लोलक पूर्णपणे दुसऱ्या बाजूला सरकला. आता मुलाचे पूर्वअस्तित्व किंवा ईश्वर पिता-पुत्राचे नाते हा विषय चर्चेचा केंद्रबिंदू राहिला नाही. त्याऐवजी एतिहासिक मानवी येशू व ईश्वर यांचे नाते हा केंद्रबिंदू झाला. ईश्वराने अवतार घेतल्याचे परिषदेचे सूत्र वास्तविक मानवी इतिहासात समजून घेण्यासाठी खूप आधिभौतिक असल्याचे मानण्यात आले. जर येशू खरोखर ईश्वराचा अवतार असतील तर त्यांचे खरे स्वरूप काय होते? मानवी की दैवी? मानवी इतिहासात अशा पद्धतीचे दुसरे उदाहरण नसल्याने हे अवतार स्वरूप तार्किकदृष्ट्या मानवी शब्दांत कसे समजून घ्यायचे?

अथेनासियसचे जवळचे मित्र व लाओडिसियाचे बिशप अपोलिनारियस (इ.स.३९०) यांनी हा गुंतागुंतीचा प्रश्न सोडवण्यासाठी काहीसे तर्कसंगत उत्तर पुढे केले. त्यांनी खूप आधीपासून मान्यता असलेले सिकंद्रीयायी ईश-मांस ख्रिस्तशास्त्र (Word-flesh Christology) त्याच्या तार्किक मर्यादांपर्यंत नेले. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अथेनासियस व नायसियन सिद्धांतानुसार मुक्तीसाठी ख्रिस्तांचे परिपूर्ण देवत्व आवश्यक असल्याचे मानले गेले. केवळ खरा ईशपुत्रच माणसांना ईश्वराचा परिचय करून देऊ शकतो, असा युक्तिवाद जोरदारपणे करण्यात आला. यालाच जोडून ईश-मांस ख्रिस्तशास्त्रात अपोलिनारियस यांनी युक्तिवाद केला की, येशू ख्रिस्त या माणसाच्या दैवीकरणाशिवाय मुक्ती मिळण्याची कृती घडणे शक्य नाही. त्यामुळे येशू एकमेव देवमाणूस किंवा दैवी-मानवी स्वरूप आहे. अपोलिनारियस यांनी सांगितले की, ख्रिस्तात सामान्य मानवी आत्म्याची जागा दैवी ईशने घेतली. ख्रिस्तांचे मांस हे ‘दैवी मांस’ वा ‘ईश्वराचे मांस’ आहे आणि भक्तीसाठी अगदी अनुरूप चीज आहे. हा कल ख्रिस्त खरा माणूस नव्हता, पण तो माणसासारखा दिसत होता असे सांगणाऱ्या डोसेटिकचा असल्याचे वरूनच स्पष्ट दिसते. हा शारीरीकरणाच्या अंगाने जाणाऱ्या सर्व मांडणींचा शिखरबिंदू होता. त्यात चर्चचा विचारही प्रतिबिंबित होतो, जो लपवून ठेवण्याकडे त्यांचा कल होता. याचा अर्थ असा अवतारात ख्रिस्त यांनी त्यांचा दैवी आत्मा, स्वरूप किंवा ousia धारण केलेला होता, मानवी आत्मा किंवा स्वरूप धारण केलेले नव्हते. हा एकलशाहीवादाचाच भाग आहे. नंतर त्याला एकस्वरूपवाद (Monophysitism) हे नाव मिळाले.

दुसऱ्या बाजूला ॲण्टिओशियन शाखेच्या प्रतिनिधींनी एकस्वरूपवादाला किंवा अपोलिनारियानिझमला त्याच्या वैज्ञानिक ख्रिस्तशास्त्रीय धारणेसह आव्हान दिले. सामान्यतः ॲण्टिओशियनचा येशूमंधील रस मुक्तीपेक्षा जास्त नैतिक होता. येशू हे स्वतंत्र इच्छेसह परिपूर्ण माणूस व अस्सल मानवी व्यक्तिमत्त्व नसल्याने परिपूर्ण नैतिक आदर्श नसू शकतील. त्यांचे ख्रिस्तशास्त्र सिकंद्रियायी 'ईश-मांस'ऐवजी 'ईश-माणूस' योजनेला मान्यता देते. त्यांनी ख्रिस्तांच्या परिपूर्ण माणूसपणावर भर दिला होता. लोगोस ख्रिस्तशास्त्र व ख्रिस्त अनुरूप ईश्वर असल्याच्या नायसियन सिद्धांताच्या अनुषंगाने त्यांचा दृष्टीकोन सिद्ध करण्यासाठी त्यांना ख्रिस्तांच्या दोन स्वरूपांना मान्यता देण्याशिवाय पर्याय उरला नाही. एक, परिपूर्ण माणूस व दुसरा, परिपूर्ण ईश्वर. या दोहोपैकी प्रत्येकी परिपूर्ण व्यक्तिमत्त्व असलेले आणि त्यानुषंगाने सर्व गुण व वैशिष्ट्ये असलेले. या दोन्ही व्यक्ती वा स्वरूपापैकी कोणीही एकमेकांत मिसळत नाही. त्यांनी लोगोसचे मांसात रूपांतर होणे किंवा परिवर्तित होणे स्पष्टपणे नाकारले. दैवी स्वरूप हे मानवी स्वरूप बदलून टाकत नाही, हे मत उचलून धरले. मानवी स्वरूप असलेले येशू मुक्त इच्छा व कृपेने दैवी स्वरूपाचे पालन करू शकतात. म्हणून असे एखादा म्हणू शकतो की, मेरीने ईश्वराला जन्म दिला; पण हे शब्दशः नसून अतिशय स्पष्टपणे आधिभौतिक आहे.

ॲण्टीओशियन शाखा नव्या कराराच्या विरोधाभासी लिखाणाच्या स्वरूपाचे आणखी एक प्रतिबिंब आहे. एका बाजूला अतिशायी एकेश्वरवाद आणि येशू दुबळे मनुष्य व सर्वशक्तिमान ईश्वराला दुय्यम असल्याचे सांगतात. दुसऱ्या बाजूला प्रसंगी येशूंना दैवी स्वरूपाची विशेषणे वापरतात. खास करून पॉलकृत व जॉनकृत साहित्यात. परंपरावादी हे येशूंच्या मृत्यूने मुक्ती मिळवणे व दैवी तादात्म्य पावण्याच्या विचारावर मान तुकवतात. हा जॉनकृत अन्वयार्थाकडे जाणारा कल असून त्याने त्यांना त्यांच्या कमाल मर्यादेपर्यंत नेले आहे. हा दृष्टीकोन अतिशायी एकेश्वरवाद व नैतिक धर्मपरायणता यांना धोक्यात घालणारा असल्याची चिंता विवेकी श्रद्धावानांना नेहमीच भेडसावत राहिली. या प्रतिविरोधी व पूर्णपणे विरुद्ध कल व चिंतेचे नाव व निर्मिती म्हणजे ख्रिस्ती धर्म आहे. अनेक निष्पाप व प्रामाणिक अनुयायांना त्यांच्या धर्मग्रंथातील विरोधाभासी लेखनाला सामोरे जावे लागते. या धर्मशास्त्रीय दुःस्वप्नाचे नेस्टोरियस उत्तम उदाहरण आहे.

पाचव्या शतकात ॲण्टीओशियन शाखेचा तरुण सदस्य नेस्टोरियस कॉन्स्टनटिनोपलचा बिशप झाल्यानंतर (इ.स. ४२८) ख्रिस्त व्यक्तीविषयक वादाने डोके वर काढले आणि संघर्षाचे रूप धारण केले. सामान्य लोकांमध्ये, खास करून राजधानीच्या आजूबाजूच्या परिसरातील धर्मगुरूंमध्ये कुमारिका मेरीला 'ईश्वराची आई' मानत होते. याला नेस्टोरियसने विरोध केला. त्यांनी ईश्वर दोन-तीन महिन्यांचे कुक्कुळे बाळ नसल्याचा शेरा मारला.[२९] येशूंचे दोन स्वरूप असल्याचे नेस्टोरियस मानत. येशूंमध्ये माणूस व लोगोस एकत्र येण्यापूर्वी तो माणूस लोगोसपेक्षा वेगळा होता.[३०] नेस्टोरियससाठी हे 'परिपूर्ण', 'अनुरूप' व 'सतत'चे एकत्र येणे आहे.[३१] सिकंद्रियायी ख्रिस्तशास्त्राच्या 'त्रितत्त्वापैकी एक' किंवा 'नैसर्गिक' असण्याच्या उलट हे एकत्र येणे 'स्वैच्छिक' आहे. कॉन्स्टनटिनोपलच्या पाचव्या सर्वचर्च परिषदेत (इ.स. ५३३) दोन स्वरूप व दोन व्यक्तीची धारणा पाखंड असल्याचे सांगून नेस्टोरियसची निर्भत्सना करण्यात आली.

आपल्या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास, असे सिद्ध होते की पारंपरिक ख्रिस्ती धर्म मुक्ती व उत्थानासाठी ईश्वराला सुळावर चढवण्यास नेहमी आग्रही असल्याचे दिसते. त्याने सुळावर चढणे, यातना भोगणे हे निव्वळ माणसासोबत घडल्याचे सांगणारे सर्व प्रयत्न एकजात नाकारण्यात आले. हा अतिशय स्पष्ट शारीरीकरणवाद आहे. तो अनुभवजन्य धर्मशास्त्राच्या वा इतर कोणत्याही तर्कशास्त्राच्या जोरावर टिकू शकत नाही. तो केवळ राज्याच्या पाठिंब्यावर, दडपशाही व राजकीय शक्तीच्या जोरावर अनेक परंपरांच्या ईश-मांस धर्मशास्त्रज्ञांच्या सर्व तर्कसंगत व जिज्ञासू प्रयत्नांना दाबूनच टिकू शकतो. तसेच ही ईशनिंदेची कृती, त्याला 'नेस्टोरियस' शब्द वापरणे, हे रूढीवादी सांगतात त्याप्रमाणे काही पवित्र आत्म्याचे काम नाही; तर ते निधर्मी राजकीय शक्तीचे व तेही पॅगन सम्राटांच्या काळात झालेले काम आहे.

समारोप करताना नेस्टोरियस यांचा प्रसिद्ध परिच्छेद इथे देणे खूप योग्य ठरेल. ते लिहितात, 'माझी कळकळीची इच्छा आहे, अगदी माझा तिरस्कार करून ते ईशनिंदेपासून वाचावेत 'आणि जे वाचतील ते पवित्र, सर्वशक्तिमान व शाश्वत ईश्वराची कबुली देतील, ते नष्ट न होणाऱ्या ईश्वराची प्रतिमा नष्ट होणाऱ्या माणसांत बदलणार नाहीत आणि ख्रिस्ती धर्मात अनेकेश्वरवादाची

भेसळ करणार नाहीत' पण ख्रिस्ताच्या सत्याविषयी, ईश्वर व मानव स्वरूपाविषयी कबुली दिली पाहिजे, ते ईश्वर म्हणून अमर्त्य व अपरिवर्तनीय आणि माणूस म्हणून मर्त्य व परिवर्तनीय असल्याचे सांगितले पाहिजे. ते दोन्ही स्वरूपात ईश्वर नाहीत आणि दोन्ही स्वरूपात मानवही नाहीत. माझ्या कळकळीच्या इच्छेचे ध्येय आहे की, ईश्वराने वसुंधरेवर स्वर्गासारखा कृपेचा वर्षाव करावा; पण नेस्टोरियसला तिरस्कृत होऊ द्या, केवळ ईश्वराविषयी बोलणाऱ्यांना बोलू द्यावे, मी त्यांच्यासाठी प्रार्थना करतो की, त्यांनी ईश्वराविषयी बोलावे. मी, जे ईश्वरासाठी आहेत त्यांच्यासोबत आहे. जे ईश्वराच्या विरोधात आहेत; जे वरून धर्माचा अवडंबर माजवून ईश्वराची निंदा करतात आणि ईश्वराला ईश्वर होण्यापासून रोखतात, मी त्यांच्यासोबत नाही.'[३२]

नेस्टोरियसचे शब्द स्वयंस्पष्ट आहेत, त्यांना वेगळ्या स्पष्टीकरणाची गरज नाही. कोणी कसे काय मेरी यांना ईश्वराची आई गृहीत धरेल, लोगोस ईश्वर नऊ महिने महिलेच्या उदरात राहिला, बाळासारखा वाढला, सर्व मानवी गरजा पूर्ण केल्या, ईश्वर म्हणवून घेतल्यानंतर याचना केली, 'हे माझ्या ईश्वरा, हे माझ्या ईश्वरा, माझा त्याग का केलास?' आणि धर्मभ्रष्टतेचे आरोप नाकारत सुळावर मरण पावला, हे कसे स्वीकारता येईल. हे जनप्रिय ख्रिस्ती धर्मापुढील खरे आव्हान व संघर्ष कालही होते आणि आजही आहे.

चर्चने हे गूढ चाल्सिडोनियन सूत्राच्या आधारे उकलण्याचा प्रयत्न केला (चाल्सिडोन परिषद, इ.स. ४५१). येशू पूर्ण माणूस व पूर्ण दैवी असल्याचे सांगितले. तो ख्रिस्तशास्त्राचा खूप जुना प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न होता. पण, तो येशूंचा व्यक्ती म्हणून प्रश्न किंवा आंतरनात्यासंबंधी अडचणींवर कोणत्याही मार्गाने, पद्धतीने वा स्वरूपाने तार्किक किंवा बुद्धिगम्य वर्गीकरण आणि समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. ख्रिस्त एकाच वेळी परिपूर्ण ईश्वर व परिपूर्ण माणूस असल्याचे स्पष्ट करून सांगण्यापेक्षा ते गृहीत धरलेले जास्त आहे. त्यांचे स्वरूप पापहीन असताना तो कशा पद्धतीचा माणूस होता हा विषय चर्चेला घेतला गेला नाही किंवा त्याचे उत्तर दिले गेले नाही. ख्रिस्तांचे माणूसपण सामान्य माणसांसारखे परिपूर्ण माणूसपण नव्हते आणि त्यांचे दैवीपण हे परमपिता ईश्वरासारखे परिपूर्ण दैवी नव्हते. सगळे काही तर्कसंगत धर्मशास्त्राऐवजी गृहीत धरलेले भेसळीसारखे संभ्रमित होते.

येशूंची दोन स्वरूपे वा डोके (मानवी व दैवी) धारण केलेली आकृती ही विचित्र जीवाची आकृती भासते. हे चाल्सिडोनियन सूत्र डोसेटिझम किंवा एकलशाहीवादापेक्षाही अधिकच अगम्य, नाजूक प्रश्नांना व जिज्ञासेला जन्म देते. पारंपरिक मतानुसार ईश्वर व माणूस दोन्ही एकात सामावले असतील तर दोहोत भेद करणारी तार्किक रेषा आखणे अशक्य बनते. उदा. येशूंमधील ईश्वर कधी सक्रिय आहे आणि त्यांच्यातील माणूस कधी सक्रिय आहे हे कोण ठरवू शकतो? यासंबंधी स्पष्ट मार्गदर्शनही नाही आणि याचे सूत्रही धर्मग्रंथात दिलेले नाही. सम्राटांनी व चर्चच्या राजकारण्यांनी अनेकवेळा पवित्र आत्म्याला दाबले किंवा बाजूला सारल्याचे दिसते. त्यामुळे त्यांच्या अमूर्त दाव्यांना काहीही अर्थ नाही. सुळावर मरण पावणारी आकृती मानवी येशूंची आहे की ईश्वरी येशूंची? जर ईश्वराची असेल तर मग तो स्वतः कोणत्या ईश्वराचा धावा करतोय? जर सुळावरची ती आकृती मानवी येशूची असेल तर मुक्ती मिळवून देणे पूर्ण झालेले नाही. चाल्सिडोनियन सूत्र धर्मशास्त्रीयदृष्ट्या आधीच्या ख्रिस्तशास्त्रांनी दिलेल्या सूत्रांप्रमाणे समस्याग्रस्त दिसते. ऐतिहासिक माणूस येशूंचे दोन वेगवेगळे स्वरूप असल्याचे सांगितले गेले. परिपूर्ण माणूस व परिपूर्ण ईश्वर. दोन्ही एका व्यक्तीत सामावले; तो लोगोस म्हणजेच ईश्वरपुत्र. इतकेच नाही तर तो सामान्य माणसांसारखा माणूस नव्हता कारण तो पापमुक्त होता. जर ख्रिस्त माणूस म्हणून दोन रूपे, दोन इच्छा सामावलेला असेल, पण वास्तव दैवी स्वरूपाप्रमाणे आणि ज्ञान मानवी स्वरूपापेक्षा वेगळे असेल, तर मॉरिस विल्स यांची शंका रास्त वाटते. ते या माणूसपणाविषयी प्रश्न उपस्थित करतात, 'खऱ्या माणसाला पात्र होण्यासाठी किती प्रमाणात मानवी इच्छा लागते?'[३३]

दोन डोके किंवा स्वरूप (मानवी व दैवी) असलेली चाल्सिडोनियन संकल्पना तिच्यात उणिवा असतानाही रूढीवादी ख्रिस्ती परंपरेची अधिकृत धारणा म्हणून ती आजपर्यंत चालत आली आहे. ख्रिस्त व्यक्ती म्हणून चाल्सिडोनियन धारणेतील हा विरोधाभासी गुंता सोडवणाऱ्या व बुद्धिगम्य शब्दांत स्पष्टीकरण देणाऱ्या धर्मशास्त्रज्ञ किंवा तत्त्ववेत्त्याची जग वाट पाहात आहे. तुम्ही गुंता सोडवू शकत नसाल तर, वरवर दिसते तसे स्वीकारा, खोलात जाऊ नका. ही श्रद्धा मानवी तर्क व बौद्धिक दृष्टीकोनाच्या त्यागावर टिकते.

तर्क विसंगत, अशक्य, परस्परविरोधी गोष्टींचे विरोधाभासाच्या नावाखाली समर्थन केले जाऊ शकत नाही. तो मानवी बुद्धिमत्तेचा अपमान आहे. धर्म हे सत्याचे प्रकटीकरण आहे आणि त्याला तथ्यांचा आधार हवा; त्याने तथ्ये तयार करू नयेत. तो रहस्य, अंधश्रद्धा, गूढवाद, आध्यात्मिकता व/वा आत्म्याची दैवी योजना अशा धुराच्या पडद्याआड लपणे म्हणजे धर्मग्रंथांना निरर्थक बनवणे व आदिम, अंधश्रद्धेला पुजणाऱ्या मानसिकतेला खतपाणी घालण्यासारखे आहे. इतकेच नाही तर त्याने धर्माचा विशेषाधिकार निवडक लोकांऐवजी सर्वांना उपलब्ध करून दिला पाहिजे. धारणेवर आधारित गूढ बौद्धिक पेच सर्वांना समजून घेता आले पाहिजेत. वास्तविक पाहता, त्रितत्त्व मताचा इतिहास राजकीय कारस्थानांनी साचलेला आहे, राज्याच्या गरजांसाठी फरफटत गेलेला आहे, त्याचे शोषण करणारे घटक सत्तेच्या आणि इतर शक्तींच्या व्हरांड्यात फिरत आहेत. त्यामुळे धर्मग्रंथ राजकीय अनुकूलतेसाठी दुय्यम तुणतुणे उपलब्ध करून देत असल्यासारखे आहे. या मताचा विशालकाय प्रभाव खूप काळापासून असल्याने सर्वकाही सत्य असल्याचे गृहीत धरण्यात आले आहे. तथ्य असे दिसते की, त्रितत्त्व मतात विसंगत सत्य मांडले आहे किंवा ज्याचा समावेश करण्याचे धाडस करू नये, असे पाखंड व धर्मशास्त्रीय महाघोटाळा करून ठेवलेला आहे. याच्या अधलेमधले काहीही नाही.

संपूर्ण इतिहासात ख्रिस्ती अनुयायी अतिशायी ईश्वराला शारीरीकरण व मानवीकरणापासून वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसते. पण, त्यांची मुक्ती मिळवण्याची महत्त्वाकांक्षा ठीक उलटे परिणाम साधत आहे. हे इस्लामी अतिशायी व एकेश्वरवादी सांगण्याच्या वेगवान प्रसारास कारण ठरले असल्याची शक्यता आहे. विदुषी कॅरेन आर्मस्ट्रांग सांगतात त्याप्रमाणे, '... मध्यपूर्वेत व उत्तर आफ्रिकेत वाऱ्याच्या वेगाने प्रसार झाला. या (ग्रीकवादाचे माहेरघर नसलेल्या) भूमीतील असंख्य धर्मांतरित लोकांनी ग्रीक त्रितत्त्वावादापासून सुटका मिळवून घेतली. त्रितत्त्वातील ईश्वराविषयी गूढ पद्धतीने सांगणारे वाक्प्रचार त्यांच्यासाठी अपरिचित होते आणि त्यांनी जास्त सेमिटिक असलेल्या दैवी वास्तवाच्या धारणेला कवटाळले.'

प्रकरण चौथे

# मानवीकरणवाद आणि कुरआन

इस्लाममध्ये ईश्वर एकटा आहे; अतिशायी व सर्वशक्तिमान. धर्म सक्त व तडजोड नसलेला नैतिक एकेश्वरवाद सांगतो. एकमेव, ऐक्य, अद्वितीय व अतिशायी ईश्वर त्याच्या सर्वोच्च व शुद्ध स्वरूपात मांडतो. तो औपचारिकपणे व निःसंदिग्धपणे अनेकेश्वरवाद, चराचरेश्वरवाद, द्वैतवाद, इष्टदेववाद, बहुएकलदेववाद, त्रिदेववाद, त्रितत्त्ववाद आदी ईश्वराच्या दैवी व्यवस्थेत अन्य कुणी भागीदार असल्याचे सांगणाऱ्या किंवा तसे संकेत देणाऱ्या सगळ्या 'वादां'ना संपुष्टात आणतो. इस्लामचा मुख्य प्रवाह परिपूर्ण अतिशायी व एक ईश्वरावर जोर देतो, हे एक वैश्विक सत्य आहे. ईश्वराच्या शारीरीकरणाच्या धारणा व मानवीकरणाच्या प्रतिमा पूर्णपणे नाकारतो. ही अतिशायी धारणा तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत अमूर्त नाही. ईश्वरासंबंधी दैवी तरी ढोबळमानाने रूपकात्मक स्वरूपाची अनेक काव्यमय वर्णने कुरआनात आलेली आहेत. ती अतिशायी ईश्वराला अंतर्शायी व सजीव करतात, जेणे करून ईश्वराशी अर्थपूर्ण नातेसंबंध प्रस्थापित करण्याची पुरेशी संधी मिळावी. ही मोघम रूपकात्मकता मानवी संवादाच्या गरजा भागवण्यासाठी पुरेशी आहे. कुरआनात काही वर्णने आहेत; जर त्यांचा अर्थ शब्दशः घेतला तर ती वर्णने आपल्याला ईश्वराच्या सौम्य मानवीकरणाकडे नेतात. मानवीकरणासारखी वाटणारी ही वर्णने अनेक शतकांपासून मुस्लिम धर्मशास्त्रज्ञांच्या चर्चेच्या केंद्रात राहिली आहेत. ईश्वराचे 'हात', 'चेहरा', 'डोळे' अशी वाक्ये संख्येने खूप कमी असली तरी, ते गूढ म्हणून बहुतांश मुस्लिम विद्वानांनी स्वीकारले आहे. त्याला 'बिला कैफ' संबोधत (शब्दशः अर्थ 'कसे काय', लक्षणार्थ 'अतिशायी व सर्वशक्तिमानास उचित वाटेल तसे') किंवा त्याचा आधिभौतिक अन्वयार्थ लावतात. या वाक्यांशांसाठी 'बिला कैफ' स्वीकारण्यासोबत नेहमीच ईश्वर व त्याच्या निर्मितीत सारखेपणा (मानवीकरण) असल्याचे पूर्णपणे नाकारले आहे आणि वारंवार ईश्वराचे दैवी वेगळेपण व अतिशायी असण्यावर जोर दिले आहे. या अतिशायी व एकमेव ईश्वराच्या नैतिक इच्छेला पूर्णपणे शरण जाणे म्हणजे इस्लाम होय.

दैवी अतिशयीत्व कुरआनच्या संदेशाचा सार आहे. कुरआनचा दृष्टीकोन वास्तवाला ईश्वर व ईश्वरेतर अशा दोन प्रकारांत विभागतो. ईश्वर शाश्वत निर्मिक असून त्याच्यासारखा दुसरा कोणी नाही. तो सादृश्य, सारखेपणा, भागीदार आणि सहकारी या सर्वांपासून मुक्त आहे. तो अद्वितीय असून त्यालाच वास्तव संबोधता येईल आणि बाकी सर्वकाही या वास्तवापासून अस्तित्वात, वास्तवात आलेले आहे. ईश्वरासाठी अरबी शब्द अल्लाह शब्दार्थमीमांसेच्या दृष्टीने कुरआनातील सर्वोच्च लक्षकेंद्री शब्द आहे. कुरआनाच्या दृष्टीकोनाचा गाभा ईश्वरकेंद्री आहे. अस्तिस्वशास्त्राच्या दृष्टीने त्याच्यासारखा वा त्याच्याविरोधात, त्याच्यासोबत दुसरा कोणीही उभा राहू शकत नाही. तो अतिशायी सर्वांपेक्षा वेगळा असून सर्व अस्तित्वाच्या व्यवस्थेत तिचा मालक व निर्मिक म्हणून त्याची जागा सर्वांत वरच्या बाजूस आहे. त्याच्याशिवाय इतर सारे त्याची निर्मिती असून त्यांचे श्रेणीतील स्थान दुय्यम आहे.

दुसरे जग ईश्वराशिवाय इतर साऱ्यांचे आहे. ती स्थळ-काळाची, निर्मितीची व अनुभवाची व्यवस्था आहे. अस्तित्वशास्त्राच्या दृष्टीने या दोन्ही व्यवस्था नेहमीच वेगळ्या राहतात. निर्मिक स्थळ-काळाच्या जगात उतरून येत नाही. तो या निर्मितीशी एकरूप, अवतारित, संयोग वा संभ्रम होण्याचा अनुभव घेत नाही. तसेच निर्मिती तिच्या निर्मिकाचे स्थान घेऊ शकत नाही, त्याच्याशी संयोग पावू शकत नाही. तो कायम इतरांपेक्षा वेगळा उन्नत व अतिशायी राहतो. ही कुरआनाची दैवी ऐक्याची संकल्पना आहे. हाच धागा कुरआनाच्या संदेशाचा गाभा म्हणून संपूर्ण कुरआन ग्रंथात आढळतो. तो एकमेव, अद्वितीय व अतिशायी असल्याची संकल्पना नेमकी, स्पष्ट सांगण्यात कुरआनाच्या सर्व संकल्पना, कल्पना व विचारधारणा गुंफलेल्या आहेत. त्या ईश्वराशी अर्थपूर्ण व रास्त नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी माणसाला प्रेरित करण्याचे काम करतात. सर्वशक्तिमान ईश्वराच्या एकमेव, अद्वितीय असण्यावर कुरआनात इतका जोर देऊन सांगितले आहे की, वरवर वाचणाऱ्यालाही हे स्वरूप अतिशय स्पष्टपणे जाणवते आणि शंकेसाठी सूक्ष्म जागाही राहत नाही. इतकेच नाही तर कुरआनाची एकेश्वरवादाची संकल्पना उत्क्रांत किंवा बदलत जाणारी नाही किंवा संदिग्धही नाही. ती गोंधळात टाकणारा किंवा परस्परविरोधी नाही. ती एकेश्वरवादी व ईश्वरकेंद्री संज्ञेच्या बरहुकूम आहे. ती नकारार्थी, होकारार्थी, तार्किक, आदर्शात्मक व स्वयंस्पष्ट आहे.

कुरआनातील एकेश्वरवाद एकलबहुदेवापासून सुरू होत नाही. तसा तो ईश्वर एक असल्याच्या होकारार्थी मांडणीनेही सुरू होत नाही. तर त्याची सुरुवात एकापेक्षा अधिक ईश्वर असल्याच्या सर्व दैवी संकल्पना, कल्पना, धारणा, प्रकार, समजुती व भ्रम यांना पूर्णपणे नाकारण्यापासून होते. तो सुरू होतो 'ला इलाह इल्ला अल्लाह' या इस्लामी धर्मतत्त्वापासून. हा 'शहादा' किंवा साक्ष, कबुली थेट कुरआनातून आली आहे. संपूर्ण कुरआन या चार शब्दांवरील भाष्य किंवा त्यांचा विस्तार आहे, असे म्हणता येईल. या कबुलीचा पहिला भाग 'ला इलाह' हरेक व कोणत्याही बनावट ईश्वराला नाकारतो, तो खोट्या, आराधनेला, भक्तीला व अशा ईश्वरावर आधारित संकल्पनांना नाकारतो. या श्रद्धेची साद मूलगामी अतिशायी एकेश्वरवादासोबत एकनिष्ठ राहण्याची आहे.

'शहादा'च्या पहिल्या भागाच्या अर्थानुसार, इतर हरेक व कोणत्याही ईश्वराचे व आराधनेचे प्रतीक यांचे अस्तित्व तसेच वास्तव पूर्णपणे नाकारण्यात आले आहे. या विस्फोटक 'नाही'ने सर्व बहु, स्वयंभू, दैवीतत्त्व व दैवी गोष्टींना एकजात हादरवून टाकले. साक्षचा तिसरा शब्द 'इल्ला' जे नाकारले आणि जे असल्याचे सांगितले यांना जोडणारा दुवा आहे. आधी जे काही सर्व ज्याच्यासाठी नाकारले शेवटी चौथा शब्द 'अल्लाह'ने त्याची प्रतिष्ठापना करण्यात आली. याचा अर्थ असा की, अल्लाह या सत्य वास्तवाखेरीज इतर ईश्वर, वास्तव, स्वयंभू असा कोणी नाही.

'शहादा'चा दुसरा भाग परिणामी लगेच मुहम्मद (त्यांना शांती लाभो, पैगंबर मुहम्मद यांचे नाव आल्यानंतर उच्चारायचा दुआ) यांचे मिशन व प्रेषितत्व सांगतो. ते सांगते, 'मुहम्मदन रसूल अल्लाह', म्हणजेच 'आणि मुहम्मद ईश्वराचे पैगंबर आहेत.' वास्तविक सत्य ऐतिहासिकदृष्ट्या मुहम्मद यांच्या मिशन व प्रेषितत्वामार्फत प्रकटले. मुहम्मद पैगंबर हे दैवी संदेशाचे प्रतीक आहेत आणि ते दैवी व्यक्तित्वाचे प्रतिबिंब नाही. कुरआनात इस्लामी एकात्म सूत्र 'ला इलाह' ४१ वेळा आला आहे. तसेच त्याची इतर असंख्य रूपे (२३ निरनिराळी सूत्रे) वापरून कुरआन इतर कोणतेही देवत्व किंवा दैवी स्वरूप नाकारते. याचे उच्चारण म्हणजे ईश्वर एकमेव, अद्वितीय व अतिशायी असल्याची साक्ष देणे आहे. त्या कारणाने हे वाक्यांश कुरआनात व पैगंबर वचन परंपरेत (सुन्नाह)मध्ये वारंवार आले आहेत.

कुरआन अतिशय स्पष्टपणे ख्रिस्ती संकल्पना त्रितत्त्व किंवा देवत्वाची व्यक्तींत विभागणी नाकारतो. ईश्वराविषयी यहुदी व ख्रिस्ती अतिशयोक्ती दुरुस्त करण्यासाठी अवतरल्याचा कुरआनाचा दावा आहे. ख्रिस्ती परंपरा एकेश्वरवाद मानत असल्याचे सांगते. पण कुरआनाच्या दृष्टीने त्रितत्त्वाची व अवताराची ख्रिस्ती धारणा स्पष्टपणे दैवी ऐक्याचा व अतिशायीत्वाचा भंग आहे. हे सांगायला हरकत नाही की, कुरआनाची विधाने त्रितत्त्वाची ऑगस्टिनियन व कपॅडोसियन मांडणी ठामपणे नाकारतात. ख्रिस्ती धारणांनी गरजा व आसक्तीच्या क्षेत्राची भेसळ करून अतिशायी क्षेत्राला पुसट केल्याचा आरोप कुरआन करतो.

नवा करारासह यहुदी-ख्रिस्तींच्या ईश्वरविषयक आकलनाने अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवले. ईश्वराविषयी संभ्रम, सरमिसळ, अगदी गूढवादातील अवतार, शारीरीकरण व मानवीकरणवाद अशा चालत आलेल्या संकल्पनांच्या दोषनिवारणाचे काम करण्यासाठी कुरआनातील संदर्भ आले. ऐतिहासिकदृष्ट्या पाहिल्यास धर्म परंपरांमध्ये एकेश्वरवादाचे धर्मशास्त्र तसे नवे नाही. तरीसुद्धा ठाम इस्लामी एकेश्वरवाद ईश्वराचे स्वरूप, मुक्तइच्छा व नियती, चांगले व वाईटाचे नाते (ईश्वरी न्याय) व संदेश अवतरित होण्याचे कारण या सारख्या काटेरी व अवघड समस्यांची आगळी उत्तरे देऊ करतो. ईश्वराच्या परिपूर्ण अतिशायी असण्यावर व परिपूर्ण ऐक्यावरील इस्लामचे आग्रही प्रतिपादन सेमिटिक परंपरांमध्ये उठून दिसते.

ईश्वराच्या एक्य, एकता, व अतिशायी असण्यावर जोर देण्यात कुरआन वेळोवेळी सर्वप्रकारच्या मूर्ती-प्रतिमापूजा, अनेकेश्वरवाद व एकलबहुदेववादावर टीका करतो. ईश्वराला अन्य कोणाशीही जोडण्याची कृती म्हणजेच 'शिर्क'. हे कुरआनानुसार एकमेव पाप आहे जे माफ करण्यालायक नाही. 'शिर्क'विरुद्ध धोक्याचा इशारा देताना कुरआनाने ठामपणे सर्वशक्तिमानाशिवाय इतर दैवी अस्तित्व नाकारले आहेत. म्हणून अल्लाहऐवजी इतर ईश्वरांची आराधना ही मानवनिर्मित बाब असून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाही. इथे हेही सांगण्याची गरज आहे की, कुरआन सर्व प्रकारच्या अनेकेश्वरवादावर केवळ टीका करण्यात समाधान मानत नाही; तर तो बनावट ईश्वरांचे स्वतःचे अस्तित्व नसल्याचे आणि ते त्यांच्या भक्तांच्या कल्पनेशिवाय काहीही नसल्याचे जोर देऊन वारंवार सांगतो. त्यांच्यात माणसाचे बरे-वाईट

करण्याची कोणातही तसूभरही शक्ती वा क्षमता नाही; अपवाद केवळ ईश्वराच्या परवानगीचा.

कुरआनात तौहीद (एकेश्वर) संकल्पना ज्या ताकदीने व आश्वासक पद्धतीने आली आहे, त्याच ताकदीने न खोडता येणारे पुरावे मांडत अनेकेश्वरवाद, इष्टदेववाद व दैवीसहकारीवाद नाकारले आहे. कुरआन ईश्वर ऐक्य, एकमेव, अद्वितीय व अंतिम सर्वशक्तिमान असल्याचे सांगण्यापुरते स्वतःला बंदिस्त ठेवत नाही. तर तो त्याच्या दाव्यांच्या समर्थनासाठी तर्कशास्त्रीय व अवकाशीय या दोन्ही संदर्भातील निरनिराळे युक्तिवाद करतो. कुरआन सर्वशक्तिमान ईश्वराचे अतिशायी व एकमेवाद्वितीय वास्तव बजावून सांगण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती, प्रक्रिया, तंत्र, वैचारिक प्रक्रिया वापरतो आणि ज्ञानाचा हवाला देतो. आधी समजावून सांगितलेल्या व पटवून दिलेल्या संकल्पनेचे संरक्षण तो जादा उपाय व चौकट आखून करतो. जेणे करून कोणत्याही शंकेसाठी, संभ्रमासाठी फट राहू नये. मानवजातीला साकल्याने मुक्तीसाठी ठाम एकेश्वरवादावर श्रद्धा ठेवण्याची कृती पूर्वअट असल्याचे कुरआनाने अतिशय सोप्या, थेट व तर्कसंगत पद्धतीने सांगितले आहे. कुरआनातील असंख्य परिच्छेदांनी ही कृती अतिशय आखीव-रेखीव पद्धतीने इतक्या साध्या व स्पष्ट शब्दांत सांगितली आहे की, ती समजावून सांगण्यासाठी कुठल्याही उसनवारीची गरज नाही. या बाबतीत हे परिच्छेद स्वयंस्पष्ट व स्वयंपूर्ण आहेत. तसेच ते सुसंगत, सुव्यवस्थित व पद्धतशीर आहेत. जुन्या कराराप्रमाणे बदलत जाणारे किंवा उत्क्रांत होणारे अवतरण किंवा विरोधाभासी कल कुरआनात नाही. कुरआनाचा एकेश्वरवाद पूर्णपणे अगदी गाभ्यापर्यंत अतिशायी, एकमेव व सुव्यवस्थित आहे. इस्लाममध्ये ईश्वराचे आतील-बाहेरील ऐक्य ‘अल-तौहीद’ शब्दाने स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्वशक्तिमान ईश्वराबाबत ‘तौहीद’ संज्ञा वापरली जाते तेव्हा त्याचा अर्थ ईश्वरासंबंधी माणसाच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सर्व कृतीत दैवी ऐक्य व अतिशायीत्वाची प्रचिती आली पाहिजे. ती अल्लाह एक व अद्वितीय असल्याची श्रद्धा आहे. त्याच्या राज्यात व त्याच्या कृतीत कुणीही भागीदार (रुबुबिय्याह) नाही. त्याच्या गुणवैशिष्ट्यात व त्याच्या प्रकृतीत (अस्मा व सिफात ) त्याच्यासारखा कोणीही नाही. त्याच्या दैवी क्षेत्रात व भक्तीत

(उलुहिय्याह / इबादाह) कोणीही स्पर्धक नाही. या एकमेकांशी निगडित तीन घटकांभोवती 'तौहीद'चे विज्ञान फिरत राहते. यातून एकही घटक वगळला तर हे विज्ञान उद्देश व सार हरवून बसते. तसेच श्रद्धासिद्धांत गमावते. तौहीदचे हे तीन वर्ग काही वेळेस 'तौहीद अल ज़ात' (अस्तित्वाचे ऐक्य), 'तौहीद अल सिफात' (गुणंचे ऐक्य) आणि 'तौहीद अल अफाल' (कृतीचे ऐक्य) म्हणूनही संबोधले जाते. कुरआनानुसार ईश्वराचे ऐक्य हे ईश्वर त्याच्या अस्तित्वात (ज़ात), त्याच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये (सिफात), व त्याच्या कृतीत (अफाल) एकमेव असल्याचे सूचित करते. त्याच्या व्यक्तित्वाचे ऐक्य म्हणजे ईश्वरांचे बहुत्व नाही, ईश्वरांत प्रमुख व्यक्ती म्हणून बहुत्व नाही. गुणांचे ऐक्य सांगते की, इतर कोणीही ईश्वराचे एक वा अधिक दैवी गुणवैशिष्ट्ये धारण केलेला नाही. कृतीतील ऐक्य सांगते, ईश्वराने जे केले वा करू शकतो ती कृती इतर कुणीही करू शकत नाही. इथे भर टाकता येईल की, तौहीदची वर्गवारी मूळ कुरआनातील आहे आणि त्यांची व्याख्यादेखील कुरआनातीलच आहे. मात्र, त्यांचे नामकरण हे नंतरच्या धर्मशास्त्रीय चिकित्सेतून आलेले आहे.

यहुदी व ख्रिस्ती धर्मशास्त्रात ईश्वराची कल्पना त्याने निर्माण केलेल्या जीवांशी कोणत्या ना कोणत्या अंगाने बांधील आहे. हे मागील प्रकरणांत पाहिले आहे. इस्लाम ठामपणे सांगतो की, सर्वशक्तिमान ईश्वर अतिशायी व सर्वोच्च स्वामी, सर्वांचा पालनकर्ता आहे. तो निर्मिक खूप उच्च असून त्याने निर्मितीस, जीवांस दिलेल्या गुणांपैकी कोणतेही गुण ल्यालेला नाही. हे गुण माणूस त्याला चिकटवण्याचा प्रयत्न करतो, मात्र तो त्याच्या पलीकडचा आहे. तो त्याच्या निर्मितीच्या किंवा माणसांच्या मर्यादांना बांधला गेलेला नाही. त्याला आकार नाही, त्याला शरीर नाही, शारीरिक गुण, वैशिष्ट्ये किंवा तशी लक्षणे नाहीत. या उलट त्याचे गुण अनंत व परिपूर्ण आहेत. ते कोणत्याही मर्यादा, दोष व त्रुटींपासून खूप वर आहेत. जसे, त्याला आदि किंवा अंत नाही, तो निर्माण होत नाही वा निर्माण केला जात नाही, त्याला शारीरिक आयाम नाहीत किंवा त्याला अन्न, विश्रांती वा प्रजनन आदींसारख्या गरजा नाहीत. तो निर्मिक आहे, ज्याने असे सर्व आयाम व गुणवैशिष्ट्ये निर्मितीला दिले आहेत. यातील तसूभरही त्याच्या ठायी नाही.

'तौहीद'चे तिसरे अंग हे खास करून दैवी अतिशायीत्वाशी यहुदी व ख्रिस्तींनी केलेल्या तडजोडींसंदर्भात आहे. पृथ्वीवरील दैवी मिशनचे वाहक

म्हणून यहुदी, ख्रिस्ती व इस्लाम धर्म हे इतिहासातील त्यांच्या प्रदीर्घ प्रवासात सेमिटिक जाणिवांच्या क्षणांचा वारसा धारण केलेले आहेत. ईश्वराने माणसांसाठी पाठवलेल्या मूळ शुद्ध स्वरूपातील संदेशाला स्वतःशी जोडून घेत इस्लाम दुरुस्ती घटक म्हणून उभा राहतो आणि यहुदी व ख्रिस्तींचे धर्मग्रंथ म्हणून स्वीकारल्या गेलेल्या ऐतिहासिक दस्तऐवजांतील ईश्वरविषयक संकल्पना व वर्णनांच्या दोषांवर नेमकेपणाने बोट ठेवतो. इस्लाम दैवी अतिशायीत्वाच्या तडजोडीस या दस्तऐवजांना जबाबदार धरतो आणि सेमिटिक जाणिवेविरुद्ध सर्वांत गंभीर प्रमाद केल्याचे मानतो.

इस्लामचा आरोप आहे; यहुदींचा 'ईश्वराचे निवडलेले लोक' म्हणून ईश्वराशी संबंध जोडण्याचा दावा त्यांची अनैतिक कृत्ये, त्यांचे हाल करून घेणे व ते दुराग्रही असतानाही ईश्वराला त्यांची बाजू घेणारा बनवतो (ड्युटेरोनोमी ९:५-६). कोणत्याही स्वरूपात वा प्रमाणात 'बांधील' असलेला ईश्वर प्रेषित इब्राहिम व मोझेस यांचा अतिशायी ईश्वर असू शकत नाही. तसाच आरोप ख्रिस्ती धारणांबाबत आहे. त्यांनी दैवी ऐक्याची चुकीची समजूत करून घेत त्याला त्रितत्त्वात विभाजित केले आणि ईश्वराविरुद्ध या धृष्टतेचे समर्थन करण्यासाठी अवताराचा जुगार खेळत त्याच्यावर असंख्य मर्यादा लादल्या. एकंदर, अतिशायी दैवी अस्तित्वाच्या संकल्पनेविषयी मतभेदांची मोठी दरी यहुदी व ख्रिस्ती धर्मापासून इस्लामला विलग करते.

इस्लाम जोर देऊन सांगतो, ईश्वराची व्याख्या केवळ अतिनैसर्गिक किंवा अतिमानवी जीव म्हणून करता येत नाही. असा जीव जो स्वर्गात बसून जगातील कामकाज पाहतो, तसेच निर्मित जीव-घटकांची विशेषणे, गरजा व गुण धारण करतो, अशी व्याख्या ईश्वराची होऊ शकत नाही. ईश्वर विशाल विश्वाचा निर्मिक, आद्य प्रवर्तक व आकार देणारा आहे. त्यापेक्षा कमी काहीही नाही. अनंत शहाणपण, ज्ञान व बृहत योजनेच्या जोरावर विश्वाचा गाडा हाकणारा तो एक आहे. माणसाचा मेंदू ईश्वराविषयी जितके आकलन किंवा बोध करून घेऊ शकतो किंवा अंदाज बांधू शकतो, कल्पना करू शकतो वा स्पष्ट करू शकतो, त्याच्या अनंतपटीने तो अतिशायी आहे. ईश्वर त्याच्या कोणत्याही निर्मितीच्या तुलनेत किंवा सारखेपणाच्या बाबतीत खूप खूप पलीकडचा आहे. दैवी अतिशायीवर हा खास जोर 'तौहीद'च्या तिसऱ्या वर्गातून आलेला आहे. ईश्वर त्याच्या गुणवैशिष्ट्यांत व नावांत एक आहे.

त्याची कार्ये व विशेषणे मानवी नावे, कार्ये व विशेषणांच्या पलीकडची आहेत. परिपूर्ण निर्मिक त्याच्या विशेषणांत व कार्यांत निर्मितीच्या तुलनेत पूर्णपणे अतिशायी आहे. त्याचे अस्तित्व यांच्या अस्तित्वापलीकडे जाते. हे इस्लामचे पहिले सांगणे 'ईश्वराशिवाय दुसरा ईश्वर नाही' या धर्मसूत्रात आलले आहे. भक्तीसाठी, राज्यासाठी किंवा निवाडा करण्यात ईश्वराचा कुणी सहकारी असल्याचे नाकारण्यासह हेही सांगितले आहे की, निर्मितीपैकी असलेला घटकही दैवी जागा घेऊ शकत नाही. त्याचे कुणी स्वतःला दैवी म्हणून प्रतिनिधित्व करू शकत नाही, प्रकट होऊ शकत नाही हेही स्पष्ट होते. याविषयी कुरआनाने स्पष्ट सांगितले आहे, 'त्याच्यासारखी कोणतीही गोष्ट नाही' (४२:११). 'आणि त्याच्यासारखा कुणीही नाही' (११२:४). यात दैवी वेगळेपणाचे मूलभूत तत्त्व प्रस्थापित करत असताना त्याच वेळी हेही दैवी स्वरूपही स्पष्ट केले आहे. एक व अद्वितीय ईश्वर परम दयाळू व कृपाळू आहे. त्याचे ज्ञान प्रत्येक दृष्य व अदृष्य, वर्तमान व भविष्य, जवळ व दूर, असणे व नसणे या सारख्या पटलांच्या पलीकडचे आहे. किंबहुना हे पटल त्याच्यावर प्रभाव टाकू शकत नाहीत. त्याचे स्वरूप आपल्या ज्ञानाच्या पलीकडचे आहे. पण, त्याला दिलेल्या नावांमधून व विशेषणांमधून त्याचा अंदाज येऊ शकतो. ही सुंदर नावे व विशेषणेच दैवी स्वरूप समजून घेण्याची शक्यता निर्माण करणारे एकमात्र स्रोत व आधार आहेत. बहुतेक हेच कारण असावे त्यामुळे कुरआन व हदीसने (सुंदर नावांमधून) याविषयी चौकट आखण्याची जबाबदारी घेतली.

अतिशायी ईश्वराची धारणा इस्लामी कला, भाषा व इस्लामी अभिसंस्कृती व संस्कृतीच्या इतर अंगांमधून प्रकट झालेली आहे. ईश्वराचे शारीरीकरण व मानवीकरणवादाविषयी, कोणत्याही प्रकारची तुलना, दैवी गोष्टीत मर्त्य गोष्टींची भेसळ याविषयी इस्लाम सातत्याने अतिशय सावध व अखंडपणे जागरूक राहिला आणि आहे. ख्रिस्ती कला आणि यहुदी कलेतील काही निवडक रचनांच्या उदाहरणांच्या उलट इस्लामी कलेने संवेदनशील गोष्टींची प्रतिमा, मानवीकरणाचे किंवा शारीरीकरणाचे चित्रण सर्व स्थळी व काळी टाळलेले आहे. दैवी अस्तित्वाची मानवीकरण प्रतिमा, मूर्ती वा चित्रण कोणत्याही मशिदीत सापडणार नाही; अगदी दूरून संबंध येणाऱ्या गोष्टींबाबतही नाही. तशीच काटेकोर काळजी भाषेसंदर्भात घेण्यात आली आहे. इस्लामी धर्मशास्त्रीय चर्चा कटाक्षाने कुरआनाच्या संज्ञेतच करण्यात

आलेली आहे. तेही मुस्लिम जगात भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक आणि वांशिक वैविध्य व प्रचंड विस्तार असताना.

'तौहीद' त्याच्या बहुअंगाने केवळ ईश्वराचा उच्च गौरव आणि त्याच्या वैभवाची स्तुती करण्यावर सर्व जोर देण्यासाठी नाही. तसेच ईश्वराच्या विशेषाधिकारांचा दावा करण्यासाठीही नाही वा त्याचे श्रेष्ठत्व निर्मितीवर लादण्यासाठीही नाही. या पैकी कोणताही अर्थ कुरआनाच्या एकेश्वरवादात नाही. त्याची रचना माणसासाठी आली आहे. जेणे करून माणसांनी त्यांच्या स्थळ व काळातील मानवी समाजात दैवी नैतिकतेच्या आधारे बदल घडवून आणण्यासाठी प्रेरित व्हावे. या कार्यासाठी त्याने योग्य प्रतिसाद द्यावा, हा त्याचा हेतू आहे. ईश्वराचे ऐक्य त्याच्या निर्मितीविश्वाच्या ऐक्याकडे नेणारे आहे. जन्म, वंश, रंग, जमात किंवा आर्थिक वा सामाजिक स्थानानुसार श्रेष्ठत्व बहाल केलेले नाही. प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समता व न्याय हे मूलभूत मानवाधिकार वैश्विक पातळीवर सर्व माणसांना त्यांच्या माणूसपणासाठी बहाल केलेले आहेत. ईश्वरासोबत योग्य नातेसंबंध हे माणसामाणसांत योग्य नातेसंबंधाची एकमेव खात्री आहे. माणूस व त्याच्या ईश्वरात प्रेमळ संबंध हे नैतिकताबद्ध मानवी समाजाची खात्री देते.

दुसऱ्या बाजूला ईश्वर कोण याविषयी चुकीची समजूत किंवा त्याच्याशी चुकीचे नातेसंबंध माणसांमधील नात्यात असमतोलपणा आणते. इस्लामी अतिशायी एकेश्वरवाद योग्य पद्धतीने समजून घेतला आणि त्या पद्धतीने अमलात आणला तर, वांशिक समतोल व मानवी समाजाच्या देखभालीची खात्री देते. माणूसपणाची जिम्मेवारी, सामाजिक-राजकीय व आर्थिक जबाबदारी व वैश्विक न्याय त्याचा पाया आहे.

कुरआनाची अतिशायी एकेश्वरवादाची कल्पना उत्क्रांत होत जाणारी नाही. ती अस्सल व वैश्विक आहे. या एकेश्वरवादाच्या नैतिक समजुतीला कुरआन वैश्विक आयाम देतो. तो जाहीर करतो, हा तोच संदेश आहे जो सर्व पैगंबरांना, सर्व समाजांना सुरुवातीपासून दिला गेला. 'आम्ही प्रत्येक समाजात एक प्रेषित पाठवला, (या आदेशासह) अल्लाहची भक्ती करा, वाईटापासून लांब राहा'(१६:३६). हा संदेश काळहीन आहे, अपरिवर्तनीय व वैश्विक आहे. उदा. सर्वांत प्राचीन प्रेषित नूह यांना त्यांच्या लोकांसाठी संदेश देऊन

पाठवण्यात आले, ‘ईश्वराची आराधना करा, त्याच्याशिवाय दुसरा ईश्वर नाही.’(७:५९). नंतर ओळीने आलेल्या सर्व ईश्वरीय प्रेषितांना तोच संदेश मिळाला व पाठवला गेला (७:६५-९३). हा विषय कुरआनात वारंवार येत असल्याचे आढळते. मोझेस यांना पर्वतावर दिल्या गेलेल्या संदेशाचा येशूंनी पुनरुच्चार केला आणि त्याच संदेशाचा मुहम्मद पैगंबरांनी कुरआनात पुन्हा उच्चार केला. मूळ हिब्रू ‘शलोम’ हे इस्लामच्या कुरआनातील ‘सलाम’ आहे. येशूंचा मूळ संदेश मुक्तीसाठी ‘आदेशांचे पालन करा’ याशिवाय दुसरा काही नव्हता. ईश्वराविषयी प्रीती बाळगा आणि शेजाऱ्यावर प्रेम करा हा वैश्विक एकेश्वरवादाच्या जाणिवेचा सार आहे, दुसरे काहीही नाही, असे म्हणू शकतो.

इस्लाम शब्दाचा अर्थ शरण जाणे व शांतता आहे. एक व अतिशायी ईश्वराच्या नैतिक इच्छेला शरण जाणे आणि निर्मिक व त्याच्याकडून निर्मित जीवांशी शांतता प्रस्थापित करणे. प्रेषित मोझेस व येशू यांच्या मूळ संदेशाशी एकसंधपणा असल्याचा दावा इस्लाम करतो. पण, त्याच वेळी तो यहुदी व ख्रिस्तीच्या ऐतिहासिक ईशधारणेत दोष शोधतो. हिब्रू बायबलची याहवेह (ईश्वर)च्या मानवीकरणाची धारणा व ख्रिस्तींची त्रिदेवातील श्रद्धा या दोन्ही बाबी इस्लामला मान्य नाहीत; कारण त्या ईश्वराच्या अतिशायी व ऐक्याशी तडजोड करतात. इस्लामी धर्मग्रंथ कुरआन एका पातळीवर सुधारणात्मक उपाय प्रयत्न म्हणून अवतरल्याचे मानले जाते. तो केवळ अनेकेश्वरवादी धारणेत सुधारणेसाठी अवतरलेला नाही तर अतिशायी ईश्वराविषयी यहुदी व ख्रिस्तींनी केलेली तडजोड दाखवून देणे व ती दुरुस्त करण्यासाठी आलेला आहे. आधीच्या अवतरित संदेशातील तडजोडीस (जाणीवपूर्वक वा अजाणतेपणी) कारण ठरलेल्या ऐतिहासिक भेसळीचे स्रोत इस्लाम शोधतो. कुरआनाच्या अवतरणाने ही समस्या दूर झाल्याचा दावा करतो. त्यासाठी नंतरच्या काळात भ्रष्ट व दुर्लक्ष केलेल्या शुद्ध मूळ संदेशाकडे परत जाणे हा उपाय असल्याचे इस्लाम सांगतो. तसेच ईश्वरी शब्दांत मानवी शब्दांच्या मिश्रणाकडे नेणाऱ्या ऐतिहासिक चुका टाळल्याचा इस्लाम दावा करतो. खरोखर ऐतिहासिक अधिप्रमाणिकरण, मजकुराची शुद्धता व खूप प्रामाणिकपणे मूळ धर्मग्रंथाचे जतन ह्या आश्वसक गुरूकिल्ल्या असून त्या ईश्वराचे अतिशायी असणे आणि त्याचे बिनचूक मानवी आकलन याची खात्री देणाऱ्या असल्याचे इस्लाम मानतो.

ईश्वर अतिशायी, एकमेव व आकलनाच्या पलीकडे असल्याच्या धारणेवर खूप जोर देऊन सांगितले असले तरी कुरआनात काही वेगळी वर्णने आली आहेत. ही वर्णने शब्दशः अर्थाने घेतली तर ईश्वराला मानवी गुण व कार्ये चिकटवले जात असल्याचे भासते. यांची संख्या खूप कमी असून यांना 'मुतशाबीह' म्हणजे संदिग्ध संबोधले गेले आहे. ज्याचा अर्थ स्पष्ट व प्रस्थापित आहे, त्यांना 'मुहकम' म्हटले जाते. हा संदिग्ध श्लोकांचा समूह नंतरच्या काळात धार्मिक अन्वयार्थाच्या व धर्मशास्त्रीय चर्चेत नेहमीच वादाचा विषय राहिला आहे. मुख्य प्रवाहातील मुस्लिमांनी कोणत्याही प्रकारचे ईश्वराचे मानवीकरण नाकारले व फेटाळले आहे. असे असले तरी काही व्यक्ती व पंथ गल्लत करत ईश्वराच्या सौम्य मानवीकरणाच्या संकल्पनेला बळी पडले आहेत.

इथे हे स्पष्ट करणे गरजेचे आहे की ही समस्या आदिम वा वर्णनात्मक मानवीकरण किंवा पूर्ण शारीरीकरण वा शारीर-मानवीकरणवादाची नाही. ही मानवीकरणाच्या अतिशय सूक्ष्म लक्षणांची समस्या आहे. मुकतील इब्न सुलेमान असे परंपरावादी आणि हिशाम इब्न हकम यांच्यासारख्या काही आरंभीच्या शिया विद्वानांच्या विचारांत ही समस्या उद्भवते. मकतील यांनी शब्दशः मांडणीशिवाय कुरआनातील काही वाक्यांशांचा अन्वयार्थ आधिभौतिक पद्धतीने लावला आहे. ते शब्दशः गृहीत धरले तर तेही आपल्याला ईश्वराच्या शारीरीकरणाकडे नेतात. स्रोतांच्या विवादास्पद स्वरूपामुळे मकतील यांच्या कथित शारीरीकरणवादाची अधिक चिकित्सा करण्याची गरज आहे. त्यांच्या कथित शारीरीकरणास जबाबदार स्रोत मुळात विश्वसनीय नाहीत. आता उपलब्ध झालेला त्यांचा कुरआनाचा अन्वयार्थ त्यांना वेगळ्या रूपात समोर आणतो. हिशाम यांच्या मते, ईश्वराला शरीर आहे. मात्र, हे शरीर इतरांसारखे नाही. त्याच्यासारखे दुसरे दैवी की बिगरदैवी शरीर अस्तित्वात नाही. या कथित मानवीकरणवादाचे पुरस्कर्ते तर्क देतात की, सर्व अस्तित्वात असलेल्या घटकांना शरीर असते. ईश्वर आहे म्हणजे त्यालाही शरीर असणार आहे. अर्थात ते शरीर इतर सामान्य शरीरासारखे असणार नाही.[३५] इथे ज्याला मानवीकरणवाद म्हणता येईल, असे फारसे काही आढळत नाही. इथे कोणत्याही अर्थाने किंवा स्वरूपाने निर्मित घटकांशी ईश्वराची थेट तुलना करणारा सिद्धांत नाही किंवा दैवी व बिगरदैवी क्षेत्रातील सीमारेषाही पुसट केलेली नाही. त्यांना केवळ एका बाबतीत दोषी म्हणता

येईल; त्यांनी शब्दशः अर्थ लावण्याच्या आणि ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्याच्या त्यांच्या निकडातून दोन्ही क्षेत्रांना विभागणारी रेषा किंचित धूसर केली. या दोषपूर्ण परिकल्पनेमुळे परिणाम असा झाला, मुख्य प्रवाहातील मुस्लिमांनी त्यांना शारीरिकवादी म्हणून हिणवले व त्यांना नाकारण्यासाठी उत्तम संरक्षित, उत्तम मांडणी असलेल्या तडजोडहीन अतिशायी स्वरूपाच्या कुरआनाच्या संदेशाचा बचाव केला.

इथे मानवीकरणवाद ही संज्ञा मुस्लिम वापरतात त्या 'तशबिह' व 'तज्सीम' या संज्ञांसाठी ढोबळ मानाने वापरली आहे. एकमेकांना पर्यायवाची असलेल्या या दोन शब्दांचा अर्थ संदर्भबिंदूविषयी भौतिक किंवा दृष्टीकोनाच्या अंगाने घेतला जातो. तसेच उच्च शुद्धतेच्या पातळीवर त्यांच्यात फरक करता येईल. यात 'तशबिह' संज्ञेचा अर्थ ईश्वर व बिगरईश्वरीय गोष्टींत तुलना करण्याची कृती. तर 'तज्सीम'चा अर्थ प्रामुख्याने तुलनेच्या घटकावर केंद्रित आहे. मुस्लिमांची 'तशबिह' व 'तज्सीम' ही संकल्पना समकालीन पाश्चात्त्य वापरतात त्या मानवीकरणवादाच्या (Anthropomorphism) तुलनेत वेगळी आहे. सामान्यतः पाश्चात्त्य मंडळी ईश्वराच्या मानवरूपासंदर्भातील सर्व अर्थच्छटांसाठी मानवीकरणवाद शब्द वापरतात. त्यात शारीरिक, भावनिक वा तार्किक अंगांचा समावेश केला जातो. तार्किक किंवा भावनिक अंगाकडे दुर्लक्ष करत नसली तरी इस्लामी संज्ञा प्रामुख्याने संवेदन, भौतिक व शारीरिक पैलूंवर सर्वांत जास्त केंद्रित आहे. ईश्वराची भावनिक वा तार्किक विशेषणे परिपूर्ण असून तीच विशेषणे माणसांत सांत व सापेक्ष आहेत. ही विशेषणे केवळ ईश्वराचे अस्तित्व निश्चिती, स्वरूप व माणूस व ईश्वर यांच्या अर्थपूर्ण नाते सांगण्याच्या उद्देशापुरतीच वापरली जातात. ती मानवी मर्यादांमधून उत्पन्न झालेली भाषेची निकड आहे. ही विशेषणे केवळ आधिभौतिक वर्णने किंवा भाषालंकार म्हणूनच घेतली गेली पाहिजेत. ती दैवी स्वरूप किंवा त्याच्या अंशाचे प्रतिबिंब असल्याचे समजता कामा नये.

या वर्गात मोडणाऱ्या कुरआनातील काही परिच्छेद व वाक्यांशाचे उदाहरण म्हणून 'वजहा'कडे पाहता येईल. त्याचा शब्दशः अर्थ म्हणजेच चेहरा. हा शब्द ईश्वारासंबंधी एकूण ११ श्लोकांत आलेला आहे (पाच वेळा 'अल्लाहचा चेहरा' म्हणून आला आहे) (२:११५, २:२७२, ३०:३८-३९, ७:६९). एकदा 'त्यांच्या स्वामीचा चेहारा' म्हणून आला आहे (१३:२२). एकदा 'तुमच्या

स्वामीचा चेहरा' (५५:२७), एकदा 'त्यांच्या स्वामीचा चेहरा' (९२:२०), आणि तीन वेळा 'त्याचा चेहरा' (६:५२, १८:२८, २८:८८) असा उल्लेख आलेला आहे. कुरआनातील अनेक श्लोकांत आलेल्या या वाक्यांशाचा संदर्भ पाहणे रंजक ठरणार आहे. उदा. २:२७२ श्लोक सांगतो, 'तुम्ही जे काही चांगले देणार आहात ते तुमच्या आत्म्यासाठी देणार आहात आणि तुम्ही हे अल्लाहच्या चेहऱ्याच्या (ली वजहिल्लाह) शोधात केले पाहिजे.' १३:२२ सांगतो, 'जे कुणी त्यांच्या स्वामीच्या चेहऱ्यासाठी (ली वजही रब्बिहिम) संयम बाळगतात..'. या आणि ३०:३०, ३०:४३ अशा सर्व श्लोकांतील ईश्वराचा 'चेहरा' शब्दाचा वापर शब्दशः नसून तो प्रतीकात्मक जास्त असल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे बहुसंख्य धर्मशास्त्री व विद्वानांनी त्याचा अर्थ 'जातिल्लाह' म्हणजेच 'अल्लाहचे स्वरूप' किंवा 'त्याच्यासाठी' असा लावला आहे. या अन्वयार्थाला दुसऱ्या एका श्लोकाचा आधार आहे. त्यात म्हटले आहे, 'अल्लाहऐवजी दुसऱ्या ईश्वराला साद घालू नका. त्याच्याशिवाय दुसरा ईश्वर नाही. (अस्तित्वात असलेले) सर्व काही नष्ट होईल, केवळ त्याच्या चेहऱ्याशिवाय. आदेश त्याला बांधील आहेत आणि तुम्ही सर्व त्याच्याकडे परत जाणार आहेत (२८:८८). श्लोक ५५:२६-७ मध्ये आपण वाचतो, 'पृथ्वीवर जे काही आहे ते सर्व नष्ट होईल, पण परम सर्वशक्तिमान, कृपाळू व वंदनीय अशा तुमच्या स्वामीचा चेहरा कायम राहील.' या श्लोकांचा शब्दशः अर्थ घेत अन्वयार्थ लावणे शक्य नाही. ईश्वराच्या चेहऱ्याशिवाय सर्व काही नष्ट होईल, असे सांगण्यात काहीही अर्थबोध होत नाही. कुरआनाचे धर्मशास्त्र 'वजहा' (चेहरा) शब्द स्वतः परमेश्वरासाठी असल्याचे मत स्वीकारतात; त्याच्या अंग किंवा उपांगांविषयी नाही.

यावरून दिसते की, कुरआनात काही वाक्यांशांचा शब्दशः अर्थ घेता येत नाही. धर्मग्रंथ स्पष्टपणे अन्वयार्थशास्त्रासाठी आव्हान उभे करते. त्यामुळे या काव्यमय मांडणीचा खरा अर्थ उलगडण्यासाठी धर्मशास्त्राची एकंदर योजना आणि अवतरणांमागील खास संदर्भ व उद्देश याविषयीचे आकलन होण्यासाठी तार्किक शास्त्रांचा वापर सुयोग्य पद्धतीने केला पाहिजे. मानवीकरणाचा भास देणारे अवतरण केवळ ईश्वराचे अस्तित्व व वास्तव जोर देऊन सांगण्यासाठी वापरले आहेत. खास करून मूर्तिपूजेत व शारीरीककरणाच्या दैवी संकल्पनांमध्ये गढून गेलल्या मक्केतील अनेकेश्वरवादी लोकांसाठी ते वापरले आहेत. त्यांच्यासाठी निव्वळ अतिशायी दैवी संकल्पना अप्रस्तुत व समजुतीच्या पलीकडची असणार आहे. ही अवतरणे साधारणपणे त्या

स्थितीपासून आणि दैवी स्वरूपाच्या ऐंद्रीय जाणिवेपासून दूर जाण्याचा बिंदू प्रदान करतात आणि लगेच 'त्याच्यासारखे काहीही नाही' या वक्तव्यातून स्पष्टपणे मानवी दृष्टीकोन व आकलनाची मर्यादा जाणवून दिली आहे.

शब्दशः अर्थ लावण्याचा दृष्टीकोन या धर्मग्रंथीय वाक्यांशातील केवळ शारीरिक पैलू सांगतो. शाब्दिक अर्थवादाचा कल संदर्भ चौकटीतून पाहण्याचा असतो. परिणामी मानवीकरण असलेल्या या अवतरणांचा शाब्दिक दर्शनी अन्वयार्थ कुरआनाच्या ईश्वराचे स्थान घसरवत त्याची मूर्ती करण्याचे काम करतो. कुरआनाचा मूर्तीपूजेतील श्रद्धा हटवण्याचा हेतू संपुष्टात आणतो. अशा वाक्यांशांचा अर्थ कुरआनाच्या इतर श्लोकांच्या आधारे आणि अरबी भाषेच्या प्रस्थापित नियमांनुसार लावला पाहिजे. याचा अभाव तार्किक व धर्मशास्त्रीय कोंडीकडे नेतो. धर्मग्रंथाच्या अन्वयार्थाचे रूपकात्मक चित्रण किंवा 'तआविल' पद्धती भौतिक, शब्दशः व दर्शनी अर्थाच्या पलीकडे नेते आणि त्या मांडणीला दुय्यम वा रूपकात्मक ठरवते. अनेक प्रसंगी मानवी भाषा द्विअर्थी असते. शब्दशः व रूपकात्मक (लक्षणार्थ व व्यंग्यार्थ). या दोन्ही अर्थांनी अरबी भाषा खूप समृद्ध आहे. दर्शनी (हकिकी) व रूपकात्मक (मजाज़ी). तार्किक किंवा धर्मशास्त्रीय कोंडी निर्माण होते तेव्हा रूपकात्मक अन्वायार्थाची गरज भासते. जेव्हा निवडक लोक अतिशायी ईश्वराविषयीच्या ठराविक अवतरणांचा शारीरीकरणवादी अर्थ लावण्याचा निर्णय घेतात तेव्हा रूपकात्मक अर्थाची गरज भासते. आधी सांगितल्याप्रमाणे या तथ्यापासून सुरुवातीचे मुस्लिम अनभिज्ञ होते. कारण श्लोकांत जे काही आले आहे ते त्यांच्यासाठी अतिशय स्पष्ट होते. त्यांना 'ईश्वराचा चेहरा' शब्दाचा अर्थ स्वतः ईश्वर असल्याचे स्पष्टपणे माहीत होते. त्यामुळे या सुरुवातीच्या मुस्लिमांपुढे हा काही पेच नव्हता. उलट अल्लाहचा अवतरित संदेश 'तौहीद'सह सुस्पष्ट होता. तोही इतका की कोणत्याही पातळीवर त्याला आव्हान मिळू शकत नव्हते. हा विषय नंतरच्या काळातील काही निवडक लोकांच्या काहीही आधार नसताना शब्दशः अर्थ घेण्याच्या प्रवृत्तीमळे उभा ठाकला. श्लोकांचा संदर्भ आणि अरबी भाषेचे बारकावे बरोबर उलट अर्थ सांगत असताना शब्दशः अर्थ लावण्याच्या हेक्यामुळे हा पेच निर्माण करण्यात आला.

इथे एक प्रश्न उपस्थित होतो. कुरआन व हदीस यांनी असे वाक्यांश का वापरले ज्यामुळे अर्थाच्या बाबतीत अनावश्यक ताण निर्माण होऊ शकतो?

याचे साधे व सरळ उत्तर आहे. ते म्हणजे भाषाशास्त्र व मानवी मर्यादांची निकड. कुरआन माणसांसाठी आलेले मार्गदर्शन आहे. तो काही आधिभौतिक एकाकी ग्रंथ नाही. मानवी संगती राखण्यासाठी माणसांना समजेल अशा मानवी भाषेतील वाक्प्रचार व प्रतिमा वापरणे भाग होते. ईश्वराविषयी मानवी कल्पना, संगती व क्रियाकलाप रद्दबातल करण्यासाठी हे वाक्यांश निखलास अतिशायी ऐक्यापेक्षा जास्त अनुरूप पर्याय होता. हेही लक्षात घेणे गरजेचे आहे, की धर्मग्रंथाची रचना दरखेपेस बहुअर्थी नाही. रूपकात्मक किंवा अन्वयार्थाची गरज आहे की नाही हे भाषेचा संदर्भ व हेतू तसे संकेत पुरवत निश्चित करतो. रूपकात्मक अन्वयार्थ लावताना प्रस्थापित कोणत्याही भाषाशास्त्रीय, व्याकरणात्मक व तत्त्वज्ञानाचे स्वरूप यांची मोडतोड करण्यास मुभा नाही. कोशकार, व्याकरणकार, तत्त्ववेत्ते, धर्मशास्त्र समीक्षक, कवी व साहित्य समीक्षक यांनी दाखवलेल्या मार्गाने जात भाषाशास्त्राची दीर्घ एकसुरी प्रक्रिया आणि मजकुराचे विश्लेषण करणे क्रमप्राप्त आहे. काळजीपूर्वक व परिपूर्ण विश्लेषण न करणारे, अभ्यासात्मक साधनांचा वापर नसलेले किंवा मजकुराचा किंवा भाषाशास्त्राचा आधार नसलेल्या सोयीच्या निवडक रूपकात्मक अन्वयार्थाला मनाई आहे. मानवी कारणमीमांसा व तर्कवादाने अवतरित संदेशाचे अनुसरण केले पाहिजे आणि त्याला ओलांडता, पदच्युत करून त्याची जागा घेता किंवा त्याचा अर्थ लोप पावता कामा नये.

एकंदर कुरआनातील निर्मिकाने त्याचे अतिशायी, एकमेवाद्वितीय व वेगळेपण पटकन सांगत छान पद्धतीने ईश्वर व ईश्वरेतरांमध्ये विभागणी करणारी रेषा आखली आहे. ही संकल्पना केवळ ऐक्य व अमूर्त नाही. तर ती सक्रिय व ठसा उमटवणारी आहे. कुरआनातील असंख्य श्लोकांत सांगितलेल्या अंतर्शायी स्वरूपावर जोर देत ईश्वराला ‘इथे व आता’ प्रस्तुत ठेवण्याची मागणी करणारी ही संकल्पना आहे. ईश्वरी स्वरूपाचे वर्णन व भाषा अशा पद्धतीने रचलेली आहे की, ईश्वराला त्याने निर्माण केलेल्या जगातून गायब किंवा सदृष्य न करता संवादाच्या अनेक शक्यता निर्माण केल्या आहेत. अशा पद्धतीची अतिशायी संकल्पना संपूर्ण कुरआनात, अधिकृत हदीस साहित्यात आढळते. तसेच संपूर्ण इस्लामी अभिसंस्कृतीच्या इतिहासात आढळते. मुख्य प्रवाहातील सर्व विचारवंत, अगदी तत्त्ववेत्ते आणि साहित्यिक देखील याच भूमिकेचे अनुसरण करताना दिसतात. गूढ, अवर्णनीय व अनाकलनीय स्वरूप असल्याची आणि त्याचवेळी तो त्याच्या ज्ञानाच्या, शक्तीच्या, दयेच्या व

प्रेमाच्या माध्यमातून त्याच्या निर्मित जीवांच्या खूप जवळ असणारा अशी अतिशायी ईश्वराची जाण व श्रद्धा सर्वत्र कायम दिसते. कुरआनातील काही संज्ञांमध्ये भेग दिसते. त्याचा अर्थ मानवी भाषेचे अपुरेपण व दोषपूर्ण असल्याचे दर्शवते. तसेच ईश्वराची अवर्णनीय रहस्ये, त्याच्या स्वरूपाचे अधिकृत ज्ञान मिळवण्यासाठी मानवजातीचे ईश्वरावर व त्याच्या अवतरित संदेशावर पूर्णपणे अवलंबून असणे दर्शवते.

कुरआनातील ईश्वराचे सुव्यवस्थित स्वरूप हा कुरआन अधिकृत असल्याचा पुरावा आहे. संकलनाच्या बाबतीत कुरआन बायबल (नवा करार)पेक्षा वेगळे आहे. कुरआन पवित्र ठरले, त्याची नोंद केली गेली, ते काळजीपूर्वक जतन व अवतरित होण्याच्या क्षणापासून संकलन केले गेले; त्याचे कारण म्हणजे त्याची सुरुवातच अगदी तशी झाली. धर्मग्रंथ संकलनाची ख्रिस्ती व यहुदी धारणा काळाच्या ओघात मुस्लिमांसाठी परकी ठरली. कुरआन माणसांसाठी ईश्वराचा शेवटचा व अंतिम अवतरित संदेश असल्याची मुस्लिमांची धारणा आहे. पैगंबरांच्या हयातीतच कुरआनाचा संपूर्ण भाग तोंडपाठ आणि लिपीबद्ध झालेला होता या विषयी मुस्लिम साधने पूर्णपणे सहमत आहेत. अल फारुकी यांच्या माहितीनुसार, 'पैगंबरांच्या शेवटच्या काळात सुमारे ३० हजार समकालीन लोक कुरआन 'हाफीज' (स्मृतीत संरक्षित केलेले) होते. त्यांनी पैगंबरांच्या तोंडून कुरआन ऐकलेले होते. संपूर्ण कुरआन किंवा त्याचे वेगवेगळे भाग त्यांना तोंडपाठ होते. त्यांच्यापैकी असंख्य लोक लिहू-वाचू शकत होते. हे लोक संपूर्ण कुरआन किंवा त्याचे भाग लिहून काढण्यासाठी कटीबद्ध होते.'[३६] पैगंबरांना त्यांच्या मिशनच्या अगदी सुरुवातीपासून कुरआनाच्या दैवी व वेगळ्या स्वरूपाची जाण होती. ही वस्तुस्थिती ऐतिहासिक तथ्यांनी व पाश्चात्त्य संशोधकांनीही सिद्ध केलेली आहे. पैगंबरांनी खूप आधीपासून कुरआनाचे पठण करण्याची पद्धत सुरू केल्याचे दिसते. ते कुरआनाचे परिच्छेद त्यांच्या सहकाऱ्यांना समधानकारकपणे तोंडपाठ होईपर्यंत पठण करून घेत. ही कुरआनाची स्मृती परंपरा वैश्विक असून लाखो मुस्लिमांकडून पिढ्यांपिढ्या चालत आली आहे.

व्यापारी केंद्र असल्यामुळे मक्कासारख्या महानगरात लेखन कौशल्य सामान्य बाब असल्याचे प्राच्यविद्या पंडितांनी मान्य केले आहे. मुहंमद पैगंबर अवतरित संदेश लिहून घेण्यासाठी लेखनिकांची मदत घेत असत. हेदेखील

सर्वमान्य ऐतिहासिक सत्य असून ते पाश्चात्त्य विद्वानांनीही स्वीकारले आहे. ते मदिना येथे गेल्यानंतर लेखनिकाचा वापर करत असल्याची साक्ष आहे. ही तथ्ये व इतर अधिकृत परंपरेनुसार मुस्लिम विद्वानांनी स्पष्ट केले की, संपूर्ण कुरआन पैगंबरांच्या हयातीतच लिपीबद्ध झालेले होते. तसेच श्लोकांची 'सुराह'बद्ध (अध्याय) रचनादेखील त्यांनीच केली असल्याविषयी सर्व मुस्लिम विद्वानांनी एकमताने सांगितले. या निष्कर्षाविषयी मुईर, बर्टन व स्मिथसारख्या पाश्चात्त्य विद्वानांनी सहमती व्यक्त केली आहे. उदा. बिशप के. क्रेग यांनी निरीक्षण नोंदवले आहे. ते लिहितात, 'इथे जे आहे ते पैगंबरांनीच सांगितलेले आहे किंवा कुरआनाच्या प्रेरणेने त्यांनी जे सांगितले ते इथे नाही, अशी शंका घेण्यासाठी जागा नाही.'[३७] वॅट, ट्रिटन, गिबसारख्या इतर प्राच्यविद्या विद्वानांनी सांगितले की, कुरआनाचा बराच भाग पैगंबरांच्या हयातीत लिपीबद्ध झालेला होता. वॅट यांच्या मते, 'बहुतांश कुरआन पैगंबर असतानाच लिपीबद्ध झालेले होते.'[३८]

इथे हे सांगणे उचित होईल की, पैगंबरांच्या मृत्यूनंतर (इ.स. ६३२)मध्ये खलिफा झालेले अबु बकर यांनी हजरत उमर यांच्या सल्ल्यानुसार कुरआनाचे सर्व लेखन एका ग्रंथात संकलित करण्याचा आदेश दिला. ही जबाबदारी पैगंबरांचे सहकारी व लेखनिक झैद इब्न साबित यांच्यावर सोपवली. त्यांना संपूर्ण कुरआन मुखोद्गत होते. त्यांनी कुरआनाचे सर्व लेखन एकत्र गोळा केले. ते त्यांनी स्वतःच्या स्मृतीशी ताडून पाहिले आणि इतर निकषांनुसार तपासले आणि त्याला एका ग्रंथाचा आकार दिला. पुढे खलिफा उमर यांच्यानंतर खलिफा उस्मान (इस. ६४०-६५४) यांनी झैद यांना कुरआनाचा अर्थ मक्केच्या प्रमाण अरबी भाषेत लिपीबद्ध करण्यास सांगितले. अल फारुकी यांच्या मते, पैगबरांच्या मृत्यूनंतर १२ वर्षांत किंवा वॅट सांगतात, तसे १८ वर्षांच्या काळात अधिकृत ग्रंथबद्ध कुरआनाच्या प्रती तयार करून साम्राज्याच्या विविध महानगरांमधील तज्ज्ञ शिक्षकांना पुरवण्यात आल्या.

कुरआनाचा मजकूर तेव्हापासून शाबूत आहे. जॉन बर्टन यांनी त्यांच्या पुस्तकाचा समारोप पुढील शब्दांत केला आहे, 'कुरआनाचा अस्तित्वात असलेला मजकूर एकच आहे. हे वैश्विक पातळीवर मान्य केलेला मजकूर असून केवळ त्याच्या आधारे केलेली मुस्लिमांची प्रार्थना वैध आहे. या एक असलेल्या मजकुराने मुस्लिमांना नेहमीच एक केले आहे... आज आपल्या

हाती जे आहे ते मुहंमद यांचे मुसहाफ (पोथी) आहे.'[३९] सर्व मुस्लिमांसाठी केवळ एकच मजकूर उपलब्ध आहे. त्याला कोणताही अपवाद नाही. रूढीवादी मुस्लिमांच्या मते, अशा पद्धतीने कुरआनाचे संरक्षण अल्लाहच्या चमत्कारापेक्षा कमी नाही. किंबहुना हा चिरस्थायी चमत्कार आहे. कुरआनाने स्वतः त्याच्या खूप सुरुवातीच्या मक्की काळात सांगितले की, अल्लाहने स्वतः त्याच्या संरक्षणाची ग्वाही दिली; 'निःसंशय आम्ही संदेश पाठवला आहे व (भ्रष्ट होण्यापासून) त्याचे संरक्षणही आम्हीच करणार आहोत' (१५:९). या दैवी ग्वाहीमुळे आणि कुरआनाचे विलोभनीय स्वरूप व त्याचे अशक्यप्राय अनुलेखन (इजाज़) यामुळे कोणीही त्यात भर घालू शकलेले नाही. परिणामी सर्व मुस्लिमांच्या हाती एकच कुरआन आहे. वैश्विक मान्यता असलेला हा ग्रंथ सर्वांसाठी प्राधिकारीचा दर्जा असलेला आहे.

कुरआन सात प्रकारच्या वाचन पद्धतीत (किराअह) अवतरल्याचे मानले जाते. हे प्रकार स्वतः पैगंबरांनी स्वीकारले व मान्य केले. कारण ते जनजातींच्या किंवा स्थानिक भाषाशास्त्राच्या परंपरेनुसार होते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर त्याचा उद्देश वाचनाबाबत मुस्लिमांना सोय प्रदान करणे होता. वाचन पद्धतीतील वैविध्यामुळे श्लोकांच्या अर्थ किंवा वाक्यरचनेत बदल होत नाही. ए. एस. ट्रिटन यांनी निरीक्षण नोंदवल्याप्रमाणे, 'कुरआनाच्या सात किंवा दहा वाचन पद्धती आहेत. इंग्रजीत सांगायचे तर त्यांना उच्चारणाचे वेगवेगळे मार्ग म्हणता येईल. यात काही अक्षरांचा लोप किंवा सारखा उच्चार होतो. उच्चारणाच्या अनेक प्रकारांची नोंद केली गेली आहे. पण, त्यांतील फरक इतका किरकोळ व सूक्ष्म आहे की केवळ तज्ज्ञांच्याच लक्षात येऊ शकेल. पण, त्यामुळे अर्थबोधात फरक पडत नाही.'[४०]

कुरआनाची व पैगंबरांची मूळ भाषा असलेली अरबी आज जगातील सर्वांत जास्त बोलली जाणारी भाषा आहे. लाखो लोक त्यांची पहिली भाषा म्हणून वापरतात. वास्तविक ती एकमेव सेमिटिक भाषा आहे जी हजारो वर्षांनंतरही जीवंत आहे. इतकेच नव्हे तर ती जीवंत असूनही गेल्या चौदाशे वर्षांत फारशी न बदललेली भाषा आहे. पी. हित्ती युक्तिवाद करतात, 'कुरआनाने अरबी भाषा एकसारखी ठेवण्यात भूमिका बजावली आहे. मोरोक्कन बोली ही अरबांपेक्षा किंवा इराकींपेक्षा वेगळी असली तरी ते सर्व

एकाच लेखनशैलीत लिहितात.'[४१] तर इस्पोसितो यांच्या मते, 'कुरआन अरबी भाषाशास्त्राच्या विकासात केंद्रस्थानी आहे. त्याने अरबी व्याकरण, शब्दसंग्रह व वाक्यरचनेसाठी आधार प्रदान केला आहे.'[४२]

इतकेच नव्हे तर बायबलच्या उलट कुरआनाचे अनुयायी कुरआन शब्दशः ईशवाणी संदेश असल्याची श्रद्धा बाळगतात. शब्दांच्या व्याख्येसाठी कुरआन प्राधिकारी व प्रमाण आहे. मुस्लिम कुरआनाच्या शब्दांची व्याख्या व अन्वयार्थ लावण्यात फरक करत आलेत आणि फरक करत असले तरी धर्मग्रंथ म्हणून त्याच्या अधिकृततेविषयी, प्राधिकाराविषयी व सच्चेपणाविषयी कधीच प्रश्नचिन्ह उपस्थित केला नाही. हे विशेष आहे, मुस्लिमांनी त्यांच्या संपूर्ण इतिहासात कुरआनाचा हरेक भाग शब्दशः ईशवाणी असल्याचे एकमताने स्वीकारले आहे. यास कोणताही अपवाद नाही. ते त्यांनी त्यांच्या धार्मिक श्रद्धेचे पहिले तत्त्व मानले. त्यांच्या कायद्याचे मूलभूत स्रोत आणि श्रद्धा व धर्माविषयी निःसंदिग्ध प्राधिकारी मानले. ते इतर कोणीही बाजूला सारू शकत नाही.

निष्कर्ष असा की, इस्लामी ईश्वराचे साधे, थेट, सातत्यपूर्ण व विश्वनीय स्वरूप हे ऐतिहासिक शुद्धता, प्राधिकारी व प्रमाण स्वरूप असलेल्या त्याचे धर्मग्रंथ कुरआनातून आल्याचे सहज सांगता येईल.

# सारांश

मानवजातीने ईश्वराची परिकल्पना मानवीरूपात कशी केली व त्या कामासाठी धर्माला कसे जुंपले आणि ईश्वरविषयक आकलनाच्या अनेकविध चमत्कारिक बाजू दाखवण्याचा या अभ्यासाचा प्रयत्न होता. ईश्वराला जीवंत करण्यासाठी वापरलेली भाषा शब्दशः घ्यायची की तिचा रूपकात्मक अर्थ लावायचा या युक्तिवादाचा आणि धर्मशास्त्रीय चर्चेत बचावाची, मी दाखवून दिल्याप्रमाणे गहन प्रश्नाची, जबाबदारी नेहमीच धर्मग्रंथाकडे असते.

बाब काहीही असो, ईश्वराच्या मानवीकरणात व काटेकोर एकेश्वरवादात थेट व उलट संबंध दिसतो. मग ते मानवीकरण ईश्वराला मानवी गुणवैशिष्ट्ये व भावना चिकटवण्याचे असो वा शाब्दिक स्वरूपात काल्पनिक किंवा शारीरिक रूप देण्याचे असो. याचा अर्थ अधिकाधिक शारीरिक पैलू जोडण्याने व ते अधिकृत करण्याने अतिशायी व एक ईश्वराची आणि त्याच्या ऐक्याची जाण असलेली धारणा दूषित होते; प्रसंगी संपुष्टात येते.

ईश्वराला प्रकट करण्याचा जितका जास्त प्रयत्न केला गेला, तितका तो त्यास शोधण्यास कठीण, प्रच्छन्न करत गेला. तो न संपणारा धर्मशास्त्रीय अभ्यासाचे आणि प्रसंगी गरमागरम चर्चेचे कारण बनला. त्याने ईश्वराचे स्वरूप, सार व बाह्य रूप यांच्यात नाना तऱ्हेने ऐतिहासिकदृष्ट्या वाढच होत गेली.

कारण संदिग्धता आणखी संदिग्धतेला जन्म देते. एकदा का ईश्वराचे मानवीकरण सुरू झाले की तशा कल्पनांची उत्तरोत्तर वाढ होत जाते आणि एक व अतिशायी ईश्वराच्या आकलनास धोकादायकरित्या खोडा घातला जातो. कुरआनाने अतिशय स्पष्ट, अतिशय उच्च दृष्टीकोन स्वीकारला. कोणत्याही स्वरूपाने, मार्गाने किंवा पद्धतीने कुरआन व हदीसने सांगितलेल्या 'तौहीद'चे उल्लंघन होणार नाही याची खूप काळजी घेण्यात आली आहे. याबाबत कुरआनातील श्लोक इतके स्पष्ट व तपशीलपूर्वक आहेत की, त्यावरून भ्रष्टतेच्या धोक्याची इस्लामची खोलवरील धास्ती स्पष्ट होते. त्यामुळे इस्लाममध्ये ईश्वर एक, अद्वितीय व सर्वशक्तिमान आहे आणि मुस्लिम 'शिर्क'बाबत सजग राहिले आहेत. ईश्वराचा जोडीदार करणे किंवा त्याचे ऐक्य कमी वा कमकुवत करणे किंवा तो अतिशायी व एक असल्याच्या त्यांच्या आकलनात भेसळ न होण्याबाबत सावध आहेत. दुसऱ्या बाजूला बायबल (जुना व नवा करार)ची ईश्वरविषयक

संकल्पना मानवीकरण, शारीरिक आहे; तसेच ती मानवी बुद्धीस व तर्काला आव्हान देणारी आहे.

**या अभ्यासातील प्राथमिक शोध, मते व निष्कर्ष असे :**

१) हिब्रू बायबलमध्ये ईश्वराविषयी आलेल्या माहितीत सातत्य नाही. ध्रुवीकरणाचे कल स्पष्ट आढळतात. अतिशायी एकेश्वरवाद सांगितला आहे; पण तो सुव्यवस्थित, स्पष्टपणे वर्णन केलेला नाही. तसेच त्याचे उल्लंघन, गैरवापर वा चुकीच्या संकल्पना घुसडल्या जाण्याविषयी संरक्षणाची व्यवस्था नाही. तो हिब्रू बायबलच्या सर्व पुस्तकांत विखुरलेला आहे. अतिशायी व वेगळेपण असणाऱ्या ईश्वराची संकल्पना शोधण्यासाठी एखाद्यास परस्परविरोधी प्रतिपादन व मते चाळावी लागतात, प्रचंड असंगत माहिती नांगरावी लागते, काटेरी प्रश्नांना भिडावे लागते. हिब्रू बायबलबाह्य मदतीशिवाय हे समाधानकारकरित्या शक्य होत नाही.

या उलट मानवीकरण असलेली दैवी संकल्पना ठळकपणे आढळते. मानवीकरणाचे आदिम व उघड वर्णन, मानवी वैशिष्ट्ये, गुण चिकटवलेले आणि तसे असंख्य चित्रण ग्रंथात केलेले आहे. तेही इतक्या प्रमाणात पसरलेले आहे की सरसर वाचणाऱ्यालाही हिब्रू बायबलचा ईश्वर निःशंकपणे मानवीकरण केलेला असल्याची खात्री पटते. बायबली मानवीकरणवाद अनेक ठिकाणी कच्चा असून प्रसंगी मूर्त व शारीरिक आहे. अंगभूत योग्य धार्मिक संवादाच्या स्वरूपासाठी अशा पद्धतीच्या वर्णनांची गरज नसते. अपवाद जिथे ईश्वर पूर्णपणे शारीरिक असल्याचे गृहीत धरलेले असते. ईश्वराला शरीर रूपाने मांडलेले आहे. तो चालतो, बोलतो, एखाद्याचा शोध घेतो, रडतो व आक्रोश करतो, विश्रांती घेतो, कुस्ती खेळतो, पश्चात्ताप करतो, विलाप करतो आदी. काही प्रसंगी तो त्याला शक्तिहीन, ज्ञानहीन, दयाहीन, न्यायहीन, पक्षपाती, अवैश्विक आदी दाखवले आहे. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर अतिशायी ईश्वरात मूलभूत मानवी प्रेरणा दाखवल्या आहेत. दुसऱ्या बाजूला अनेक मानवी मर्यादा, गुण व वर्गवारी त्याला अशा पद्धतीने चिकटवलेली आहे की तो माणूस भासतो; उच्च किंवा अतिशय विराट माणूस. यातील अनेक परिच्छेदांचा अर्थ रूपकात्मक लावता येईल. मात्र, तसे करण्यात बहुसंख्य परिच्छेदांच्या बाबतीत खूप मोडतोड होईल; एका अर्थाने मूळ मजकुराशी प्रतारणा होईल. अनेक प्रसंगी आपल्या पुढे असे चित्र उभे राहते, जणू माणूस स्वतःच्या प्रतिमेतून ईश्वराला स्वतःसारखे,

स्वतःच्या स्वरूपासारखे साकारत आहे; ईश्वराने माणसाला साकारण्याऐवजी! परिणामी त्या प्रतिमेला तिच्या रचनाकाराप्रमाणे सांत व्हावे लागते.

एकंदरीत हिब्रू बायबलमध्ये चित्रित केलेला ईश्वर पूरिपूर्ण अतिशायी नाही. उलट तो शक्तिहीन, अनेक मानवी मर्यादांनी ग्रस्त असा माणसांचाच अतिमानवी प्रतिबिंब आहे.

२) हिब्रू बायबलमधील ईश्वराचे स्वरूप विकसित होत जाणारे, उत्क्रांत होत जाणारे आहे. सुरुवातीच्या लेखनाच्या तुलनेत नंतरच्या, खास करून इ.स. पूर्व आठव्या शतकानंतरच्या, प्रेषितांची ईश्वरविषय़क संकल्पना अधिक व्यवस्थित, स्पष्ट वर्णन व संगती असलेली आहे. ती संकल्पना अशारीरिक किंवा अमानवीकरण नसललेली असली तरी त्यात एक संगती आहे. या प्रेषितांनी सांगितलेली संकल्पना आधीच्या लेखनाप्रमाणे मानवीकरण असलेलीच असली तरी ती वेगळ्या स्वरूपात मांडलेली आहे. ईश्वराचे मानवीकरण असलेली वर्णने ही काही प्रमाणात उन्नत आहेत आणि प्रसंगी गूढ अनुभव किंवा आध्यात्मिक प्रचिती देणारी आहेत. त्यापैकी अनेकांचा अर्थ कथित मोझेस यांचे पुस्तक किंवा इतर आधीच्या लेखनाच्या तुलनेत सहज रूपकात्मक पद्धतीने लावता येतो. पण हेही खरे की हे सर्व मानवीकरण केलेली ईश्वरी प्रतिमा आणि अपरिपक्व दैवी संकल्पनेशिवाय दुसरे काहीही नाही.

३) पारंपरिक रब्बिनिक मन हिब्रू बायबलमध्ये सांगितलेल्या ईश्वरी स्वरूपाच्या खूप जवळ आहे. एक काळ होता हिब्रू बायबलमधील ईश्वराच्या तुलनेत रब्बिनिक ईश्वर अधिक मानवीकरण केलेला, शारीरिक, ओळखीचा व बांधील होता.

४) अशारीरिकवादी किंवा अमानवीकरणवादी ईश्वराचा तत्त्वज्ञानिक आणि अतिशायी विचार बहुतांश धार्मिक यहुदींकडून बायबलबाह्य असल्याचे मानले जाते. अशा ईश्वराची धारणा रब्बिनिक काळ येईपर्यंत अनेक शतके यहुदी परंपरेत लोकप्रिय नव्हती. फिलो व मैमोनिद्स यांच्यासारख्या काही विवेकी लोकांनी (बाह्य प्रभावाने) हिब्रू दैवी धारणेत तत्त्वज्ञानिक अतिशायीत्वाचा समावेश करण्याचा प्रयत्न केला. पण, रूढावाद्यांना अतिशायी धारणा पटवून देण्यात ते अपयशी ठरले. त्यांचे विचार धर्मग्रंथ संमत नसल्याचे व हिब्रू परंपरेनुसार नसल्याचे मानण्यात आले.

५) ईश्वराच्या मानवीकरणाचा उगम व मानवी स्वरूप असलेले बायबली परिच्छेद शोधणे तसे अवघड नाही. हिब्रू बायबलच्या परिच्छेदांतील हा मानवीकरणवादी कल, शारीरिक रूप, प्रसंगी अनैतिक वळण मानवी हस्तक्षेपाचा परिपाक आहे. हा मानवी कारक, हिब्रू बायबलचा उगम व त्याचे स्वरूप याकडे अनेक शतके दुर्लक्ष केले गेले. एकोणिसाव्या शतकापासून अनेक बायबली संशोधकांनी ते उजेडात आणले. त्यानंतर ते हिब्रू बायबलमधील अनेक धार्मिक, नैतिक व धर्मशास्त्रीय प्रश्नांसाठी प्रमाण स्पष्टीकरण झाले. खास करून संशोधकांच्या वर्तुळात.

६) हिब्रू बायबलमधील शब्द ईशवाणी असल्याचा पारंपरिक दावा तार्किकदृष्ट्या किंवा कारणमीमांसेत सिद्ध करणे अवघड बनले. आधुनिक चिकित्सक संशोधन त्याच्याकडे मानवी शब्द म्हणून किंवा ईशवाणीच्या शब्दांत अप्रत्यक्ष प्रेरणेतील मानवी शब्दांची सरमिसळ म्हणून पाहतात. दैवी धारणांविषयी रूपकात्मक अन्वयार्थ, टोकाचा व परस्परविरोधी कल या अनेक शतके जुन्या भूलभुलय्यांसारखी कोडी समस्याग्रस्त परिच्छेदांच्या गहन व अनंत गूढ रहस्यांचा पुरावा नाही. तर उलट ते त्याच्या मानवी लेखकांच्या सगळ्या मर्यादा व उणेपण, विचारातील घसरणाचा पुरावा आहे. या सर्व समस्या अस्तित्वात असल्याचे सर्व बायबली संशोधकांनी जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणी मान्य केले आहे. हेही स्पष्ट केले आहे की आजच्या स्वरूपातील व आकारातील हिब्रू बायबल ईशवाणी म्हणून स्वीकारता येत नाही.

७) नवा करार हिब्रू विश्वापासून दूर व मुक्त असल्याचे दिसते. ते ग्रीक विचार परंपरेच्या आणि दृष्टीकोनाच्या खूप जवळ आहे. तसेच ते ईश्वरकेंद्री नसून ख्रिस्तकेंद्री आहे. जुना कराराच्या तुलनेत नवा करारात धर्मशास्त्रे (ख्रिस्तशास्त्रे) संख्येने जास्त आढळतात. त्यातील सर्वांतच सामंजस्य आहे असे नाही. हे धर्मशास्त्रीय नमुने अधिक समस्याग्रस्त, वेगवगळ्या वळणाचे व आपसांत सामंजस्य नसलेले आहेत.

८) येशूंनी स्वतःविषयी जे सांगितले किंवा लिहिले ते म्हणजे नवा करार असे नाही. त्यांची स्वतःविषयी जी समजूत होती बहुधा तीही त्यात नाही. ते चर्च व नंतरच्या ख्रिस्ती लोकांनी येशूंविषयी जी समजूत करून घेतली किंवा ते काय असतील याचा अंदाज बांधत लावलेला अर्थ आहे.

९) पारंपरिक ख्रिस्ती अवतार धर्मशास्त्र हे शतकांनंतरची मतमतांतरे, विवाद व घडामोडींचा परिपाक आहे. ते नवा करारातील लेखनाचे प्रतिबिंब नाही आणि शुद्ध धर्मशास्त्रीय जिज्ञासेचे फलितही नाही. वास्तविक त्याला आकार देण्यात व लेखन रचण्यात सांस्कृतिक निकड, राजकीय प्रेरणा व वैयक्तिक हेतू व वैरभाव यांनी मोठी भूमिका बजावली. अवतारवादी धर्मशास्त्र नवा करारात स्पष्टपणे सांगितलेले नाही. त्याच्या विकसित, पारंपरिक व साहित्यिक बोधातून तसे आढळतही नाही. अवतारवाद नवा करारातील लेखनाचा सार असल्याचे कोणीही सिद्ध करू शकत नाही. त्यासाठी त्यांना बाह्य मदतीची व प्राधिकारी अन्वयार्थाची गरज भासते. तसा अर्थ नवा करारातील काही लेखनातून ओढूनताणून काढणे शक्य आहे. पण तसा अर्थ काढणाऱ्यासाठी कृत्रिम प्रयत्न करणे आणि मूळ लिखाणाचे उल्लंघन करणे भाग आहे.

१०) ख्रिस्ती अवतार धर्मशास्त्र हे पूर्णपणे ईश्वराचे शारीरीकरण व मानवीकरण आहे. त्यात तीन दैवी तत्त्वांच्या पूज्यभावाचा समावेश आहे. वास्तविक तो काही सेमिटिक लोकांच्या धार्मिक जाणिवेतील शारीरीकरणाच्या विचाराचा सार आहे. अवतारात दैवी व माणूसपण यांच्यात प्रत्यक्ष फरक करणे अशक्य बनते. वास्तविक पाहता त्यातील दैवी, लोगोस प्रभावी असून दृष्यमान व पूजला जाणारा आहे. पण, त्यातील माणूस येशू कुठेतरी मागे पडणारा व त्याच्या सावलीत वावरणारा आहे. ईश्वर असल्याचा दावा केला जात असला तरी क्वचितच त्याचे खरे व नैसर्गिक अस्तित्व दिसून येते. पवित्र त्रितत्त्वात परमपिता ईश्वराला पहिले तत्त्व व सर्वांचे मूळ स्रोत समजले जाते. मात्र, तो दुसरे तत्त्व समजले गेलेल्या येशू ख्रिस्ताच्या तुलनेत दुय्यम भूमिकेत दिसतो. येशू ख्रिस्तांचा वावर अशा पद्धतीने दाखवला आहे की अनेक प्रसंगी ईश्वर अदृष्य होऊन जातो. प्रसिद्ध ख्रिस्ती परंपरा नावाप्रमाणे ख्रिस्ती या शब्दाचा शब्दशः अर्थ आहे. ती येशू ख्रिस्तांविषयी श्रद्धा आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचे दैवीकरण आहे. एक ऐतिहासिक व्यक्तिरेखा पूर्णपणे देवतेच्या दर्जात प्रस्थापित करणे म्हणजे देवत्वाचा ऱ्हास घडवणे आहे. अवतार हा खरोखर ईश्वराचे मानवीकरण व पूर्णपणे शारीरीकरण आहे. ख्रिस्ती धर्माने शेवटी पवित्र परिपूर्ण अतिशायी, सर्वांपेक्षा वेगळ्या असलेल्या ईश्वरास, विश्वाच्या नियंत्यास खाली, सदोष व वाईट जगात आणले. त्याला अपरिपूर्णत्वाच्या बेड्यांमध्ये बांधले. दोन वेळा सुळावर चढवले.

पहिल्यावेळी शारीरीक व दुसऱ्यावेळी संकल्पनेच्या पातळीवर; येशूंच्या मूळ संदेशात सरमिसळ करून नव्याने भर टाकत बळी दिला. ही ईश्वराविरुद्ध व सेमिटिक एकेश्ववादाच्या जाणिवेविरुद्ध आतापर्यंतची सगळ्यात मोठी धृष्टता होती.

११) अवतार धर्मशास्त्र विरोधाभासी नाही. ते आरपार व निखालस परस्परविरोधी आहे. ख्रिस्तांचे खरे स्वरूप व त्यांचे ईश्वराशी नाते सांगण्याच्या प्रयत्नातील शतकांच्या धर्मशास्त्रीय चर्चा, अडचणी, घडामोडी, विवाद व राजकीय हस्तक्षेप हे ख्रिस्ती धारणेच्या परस्परविरोधी स्वरूपाचे निकष व स्पष्ट पुरावे आहेत. या सर्वांनी अवतार सिद्धांताला अशा स्वरूपात पुढे आणले की ते मानवी बुद्धिमत्तेपुढे व तर्कसंगत विचारापुढे टाळता न येणारे व जिंकता न येणारे आव्हान बनले. एखाद्याला अवतार सिद्धांताचा दावा सामावून घेण्यासाठी व ते समजेल अशा स्वरूपात मांडण्यासाठी सर्व तर्कसंगतीच्या गृहीतकांचे व कारणमीमांसेचे उल्लंघन करावे लागेल. हे तार्किक अडथळे एकाच मार्गाने टाळता येतील. तो म्हणजे येशूंची शुभवार्ता परमपिता परमेश्वर याच्याशी जास्त संबंधित असल्याचे आणि आपले नाते येशू या व्यक्तीपेक्षा आपल्या शेजाऱ्याशी जास्त संबंधित असल्याचे जाहीर करणे. या भेडसावणाऱ्या धर्मशास्त्रीय पेचांपासून मुक्ततेसाठी शुभवार्तेने जाहीर केल्याप्रमाणे ‘ईश्वरावर प्रेम करा आणि शेजाऱ्यावर प्रेम करा’ हाच एकमेव मार्ग आहे. अशा मोकळ्या व प्रामाणिक कबुलीशिवाय अवतार संकल्पनेचे पारंपरिक झग्यातील रूपकात्मक अन्वयार्थदेखील चुकीच्या दिशेने नेणारे व अनाकलनीय ठरेल.

१२) नव्या कराराचे संपादन व संकलन एक दीर्घ प्रक्रिया व गुंतागुंतीची मांडणी आहे. शतकांच्या प्रवासात अनेक प्रांत, असंख्य व्यक्ती व हेतू आदी गोष्टी तीत सामावलेल्या आहेत. त्यातून नवा करारातील मजकुरास ईशवाणी संबोधण्याच्या प्रश्नातून अनेक मोठे गहन प्रश्न, अशक्यप्राय गोष्टी, न सुटलेला गुंता उभे राहाणे स्वाभाविक आहे. खोटी साक्ष, नंतर समावेशन, मजकुराचे उल्लंघन व (या अभ्यासात सांगितलेले) इतर कारकांनी नवा करारातील मजकुराच्या शुद्धतेबाबत आणि ऐतिहासिक प्राधिकाराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या सर्व अडचणी बहुसंख्य बायबली संशोधकांनी अतिशय योग्य पद्धतीने अधोरेखित केल्या आहेत. हे आणि संकलनाची प्रदीर्घ प्रक्रिया पाहता नवा करारातील मानवी हस्तक्षेप अधोरेखित करणे आणि मानवी लिखाणाचे स्वरूप

स्वीकारणे काळाची गरज आहे (संकलनाची प्रदीर्घ प्रक्रिया स्वतःच नवा कराराच्या मानवी अधिक्षेप, गैरवापर व गैरअर्थाचा मोठा पुरावा आहे).

१३) बायबलच्या उलट कुरआन त्याच्या सुरुवातीपासूनच संकलित आहे. त्याच्या संकलनाचा काळ प्रदीर्घ शतकांचा नाही तर अल्प वर्षांचा आहे. अतिशय महत्त्वाचे म्हणजे तो संदेश थेट ऐकलेल्या पैगंबरांच्या सहकाऱ्यांच्या हयातीत कुरआनाचे संकलन झालेले आहे. कुरआनातील मजकुराचे अधिकृत, शुद्ध व वैश्विक एकसारखेपण हे ऐतिहासिक तथ्य आहे. याची ग्वाही मुस्लिम व मुस्लिमेतर संशोधकांनी व साधनांनी दिली आहे. शतकांच्या काळात अनेक मुस्लिमेतर संशोधक कुरआनाच्या अनेकविध पैलूंविषयी हरकत घेत प्रश्न उपस्थित करत आले आहेत. आजच्या काळातील कुरआनाच्या अभ्यासात सक्रियपणे गुंतलेल्या संशोधकांत कुरआनाचे ऐक्य, वैश्विकता व शुद्धता हे ऐतिहासिक वास्तव असल्याची वादातीत सहमती आहे. कुरआनाने त्याच्यासारखे दुसरे लेखन रचण्याचे दिलेले आव्हान चौदा शतकांनंतरही शाबूत आहे; तसे अनेक प्रयत्न केले गेले तरीही त्याच्यासारखे साहित्य रचता आलेले नाही. दुसऱ्या बाजूला त्याच्या मजकुराच्या संरक्षणाचा, जतन करण्याचा व शुद्ध ठेवण्याचा त्याचा दावाही चौदा शतकांनंतरही शाबूत आहे. शतकांच्या प्रदीर्घ काळानंतरही मजकुराची शुद्धता, ऐक्य, एकात्मता व वैश्विकता टिकून राहणे ही बाब ते ईशवाणी असल्याची आणि त्याच्या दैवी दर्जाची ग्वाही देणारे आहे.

१४) कुरआनातील ईश्वराचे स्वरूप अतिशायी आहे. त्याचा एकेश्वरवाद शुद्ध, काटेकोर व परिपूर्ण आहे. ईश्वराचे अतिशायी, वेगळेपण, अद्वितीय व परिपूर्ण स्वरूप कुरआनाने सुव्यवस्थितपणे स्पष्ट केले आहे. त्याला असंख्य श्लोकांचा आधार असून अनेकविध पद्धती व युक्तिवाद वापरून समजावून सांगितले आहे. बायबलच्या उलट (इतर ईश्वराचे अस्तित्व, भलेबुरे करण्याची त्यांची शक्ती, ईश्वराच्या शक्तीत, ज्ञानात विभागणी, देव म्हणून व्यक्ती किंवा इतर दैवी घटकाची विभागणी आदी पद्धतीने) भ्रष्ट होण्याच्या शक्यतेपासून त्याच्या बचावाची व्यवस्था केलेली आहे. इतकेच नाही तर ती केवळ अलिप्त व अमूर्त अतिशायी धारणा नाही; ती संतुलित, सुस्पष्ट व चैतन्यमय ईश्वराची संकल्पना आहे. अतिशायी ईश्वर समीप आहे; कुरआनात सांगितलेल्या त्याच्या अनंत ज्ञानाच्या भंडारासह,

शक्ती, प्रेम, दया व इतर सकारात्मक वैशिष्ट्यांसह तो आपल्या खूप जवळ आहे. बायबलच्या तुलनेत कुरआनात ईश्वराच्या स्वरूपात सातत्य आहे. यात एकच अतिशायी ईश्वर आहे, तो त्याची नावे व विशेषणांच्या बाबतीत अंतिम परिपूर्ण आहे. तो अज्ञात असला तरी, त्याची चिन्हे, विशेषणे, गुण व कृतीतून त्याला जाणता येते. अशा पद्धतीच्या अतिशायी ईश्वराची कल्पना संपूर्ण कुरआनातून एकसंगतीने पोचवलेली दिसते. त्याचे मजबूत नैतिक स्वरूप व समतावादी सूरही खुद्द कुरआनातून प्रकटतो. कुरआनातील नैतिक अतिशायी एकेश्वरवाद सुव्यवस्थित व स्वयंपूर्ण आहे. ईश्वराचे स्वरूप मांडण्यासाठी, स्पष्ट करण्यासाठी आणि ते भ्रष्ट होऊ नये यासाठी कुरआनाला बाह्य मदतीची किंवा मध्यस्थीची गरज नाही. त्यासाठी कुरआन स्वतः समर्थ आहे.

१५) कुरआनातील ईश्वराचे स्वरूप शारीरिक आणि मानवीकरण असलेले नाही. मानवीकरणासारख्या भासणाऱ्या काही किरकोळ वर्णनांचा अर्थ सहजरित्या रूपकात्मक लावता येतो. त्यासाठी कोणत्याही प्रकारच्या तथ्याची किंवा रूपकांची वेगळी भर टाकण्याची जरूरी भासत नाही. अशी मानवीकरण नसलेली स्पष्टीकरणे त्याच्या संदर्भातून, कुरआनातील मजकुरातून किंवा प्रचलित भाषेतील रूपकांतून देता येतात. ही वस्तुस्थिती अनेक शतकांतील असंख्य थोर मुस्लिम संशोधकांनी व धर्मशास्त्रींनी सिद्ध केली आहे. तसेच ही ईश्वराचे मानवीकरण वाटणारी वर्णने कुरआनाच्या चौकटीत पाहिल्यास ईश्वराचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी ईश्वर व माणूस यांच्यात गरजेचा सुसंवाद तयार करतात. मानवीकरणवादी वा शारीरीकरणवादी चित्रणाशिवाय कुरआनातील ईश्वराचे स्वरूप स्पष्ट करता येते. हे कुरआनातील स्वरूपाचे वैशिष्ट्य आहे. परिणामी इस्लाम त्याच्या काटेकोर मानवीकरणविरोधी भूमिकेसाठी जाणला जातो. अपवाद शब्दशः लावण्याच्या प्रवृत्तीचा. इस्लामी मुख्यप्रवाहाने ईश्वराचे मानवीकरण व शारीरिकरण पूर्णपणे नाकारले आहे. हे नाजूक संतुलन कुरआनाने स्वतः त्याच्या मजकुरामार्फत राखलेले आहे.

बौद्धिक व वैज्ञानिक जिज्ञासेच्या युगात मानवीकरण केलेला ईश्वरच वास्तविकपणे सांगतो, देव मरण पावला आहे, याच्याशी मी सहमत नाही. हे अतिशय नाट्यमय शब्दांत सांगितलेले असले तरी ते वास्तव आहे आणि सुदैवाने पूर्ण सत्य नाही. मरण पावलेला ईश्वर हा मानवीकरण केलेला ईश्वर आहे, पण एकेश्वरी अतिशायी ईश्वर नक्कीच नाही. माझ्या मते, निधर्मी

दृष्टीकोनाचे यश बिगरबौद्धिक स्वरूपाच्या ईश्वराविरुद्ध त्याने केलेल्या बौद्धिक आवाहनात दडलेले आहे. असा ईश्वर जो आमच्या पंचेंद्रियांनी नियंत्रित आहे, नित्शेच्या भाषेत जो सतत आमच्या 'दये'स पात्र आहे, अशा बिगरबौद्धिक स्वरूपाच्या ईश्वराविरुद्ध ते आवाहन आहे. कोणत्याही समस्येच्या उत्तराबाबत सांगायचे निधर्मवाद हा काही अंधश्रद्धेवरील बौद्धिक जय नाही. उलट तो वैश्विक पातळीवर माणसात दूरीकरण निर्माण करणारा, जीवनाचा अर्थ व उद्देश संपवणारा, माणसापेक्षा आणि तो राहात असलेल्या विश्वापेक्षा काहीतरी श्रेष्ठ अशा अतिशायी ईश्वराची माणसाची गरज मारणारा आहे, हे आपल्याला कबूल केले पाहिजे.

मध्ययुगाच्या शेवटी जुन्या जगात चार प्रमुख अभिसंस्कृती होत्या. यापैकी तीन आता एक नाही तर दुसऱ्या अंगाने निधर्मी झालेल्या आहेत. पण चौथी इस्लामी अभिसंस्कृतीविषयी स्थिती पूर्णपणे वेगळी आहे. इ. गेलनर यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'इस्लाममध्ये निधर्मवाद यशस्वी झाल्याचे म्हणणे विवादास्पद नाही. तर ते निव्वळ खोटे आहे. शतकापूर्वी इस्लाम जितका मजबूत होता तितकाच मजबूत आजही आहे. उलट काही बाबतीत तो अधिक मजबूत झालेला आहे.'[४३] ते इस्लामच्या या स्थैर्याचे व चिकाटीचे कारण 'आग्रही व गंभीर एकेश्वरवादा'त असल्याचे सांगतात. यावरून सहज निष्कर्ष काढता येईल, कुरआनातील ईश्वराचे स्वरूप आधुनिक निरीश्वरवादाच्या आव्हानांपुढे मजबुतीने उभे राहण्याची आणि इतर अभिसंस्कृतीच्या गाभ्याला धक्का पोचवलेला धोका परतवून लावण्याची सुप्तक्षमता असलेले आहे. कुरआनाच्या ईश्वराचे स्वरूप सुव्यवस्थित, नैतिक व अतिशायी आहे. ते तर्कसंगत व मुळातून साधे आहे. तो माणसांची मुक्ती, धर्मपरायण आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक सुधारणांवर जोर देतो. ते मुहम्मद व्यक्ती म्हणून किंवा इस्लामचे पैगंबर म्हणून किंवा स्वतः ईश्वरापेक्षा जास्त केंद्रस्थानी आहे. इस्लाम ईश्वर केंद्रीपेक्षा माणूस केंद्री आहे. तसेच त्याचे स्वरूप खऱ्या अर्थाने वैश्विक आणि नैतिक प्रभाव टाकणारे आहे. सर्व वांशिक पूर्वग्रहाच्या शक्यता, निवडलेल्या जमातीची धारणा, ठरावीक भूभागाचे वचन आणि इतर संकुचित ओळखी दूर सारणारे आहे. त्याची दैवी एकात्मता ही माणसाच्या वैश्विक एकात्मतेची खात्री देणारी आहे.

तिन्ही सेमिटिक परंपरा अशा ईश्वराच्या धारणेने प्रेरित आहेत. याविषयी

बायबली साहित्यात सातत्य नसले तरी ही धारणा त्यात जरूर दिसते. त्यामुळे अशारीरिक, अमानवीकरण असलेल्या ईश्वराचा आग्रह धरणे अन्याय करणारे नाही. उलट ती तिन्ही श्रद्धा परंपरांची ध्येयप्रेरणाच आहे. या साध्या पण सुंदर दैवी कल्पनेच्या मदतीने दूरीकरण झालेला माणूस व ईश्वर यांच्यातील खोल दरी कमी करता येईल. विज्ञान आणि धर्म यांना एक करता येत नसले तरी त्यांना निश्चितच जवळ आणता येईल. ईश्वराविषयी श्रद्धा बाळगणे सुरू करणे आधुनिक विज्ञान व तत्त्वज्ञानासाठी काही रम्य कल्पना नाही. उदाहरण म्हणून पॉल चार्ल्स विल्यम डेविस (जन्म १९४६) यांचे देता येईल. ते भौतिकशास्त्रज्ञ, अवकाशशास्त्रज्ञ, अवकाशजीवशास्त्रज्ञ असून ॲरिझोना स्टेट विद्यापीठात कार्यरत आहेत. उद्देशहीन व निरर्थक विश्वाच्या धारणेविरुद्ध ते अतिशय ठामपणे युक्तिवाद करतात. डेविस निरीक्षण नोंदवतात, 'अनेक आधिभौतिक व धार्मिक सिद्धांत पुरातन व बालिश वाटत असले तरी, कारण नसताना विश्व अस्तित्वात आहे आणि ते जसे हवे त्या स्वरूपात आहे, अशी श्रद्धा बाळगणे हे जास्त अनाकलनीय आहे ... आपण खरोखर येथे असण्यासाठी बनवले आहोत.'[४४] डेविस हे ईश्वराचा विचार कमी मानवीकरण पद्धतीने करण्यावर जोर देतात. ते सांगतात की, ईश्वराची प्राथमिक स्वरूपाची प्रतिमा बाळगायला नको, उलट ईश्वर अतिशायी, 'वैश्विक मन', 'सर्वोच्च पवित्र संकल्पना', 'स्वअस्तित्व' किंवा 'निर्मितीक्षम शक्ती' वा 'गणितज्ञ' असल्याचा विचार करा. ते युक्तिवाद करतात की, आपल्या आसपास घडणाऱ्या नैसर्गिक घडामोडींसाठी स्थळ व काळाच्या पलीकडे जाणारा आणि मानवी हस्तक्षेपापासून वर असलेला ईश्वर हवा. तर त्याला खरा अर्थ आहे व प्रस्तुतता आहे.

मी असे म्हणणार नाही की, धर्मांनी ईश्वराची विज्ञान सांगतो ती संकल्पना स्वीकारावी किंवा अवतरित संदेशाला विज्ञानाच्या तुलनेत दुय्यम लेखावे. उलट मला असे सांगायचे आहे की, आदिम, मानवीकरण वा शारीरीकरण असलेल्या ईश्वराची धारणा आधुनिक बौद्धिक विचार व ईश्वरावर श्रद्धा यांच्यात उभा मोठा अडथळा आहे. त्याने धर्म व ईश्वराचा प्राधिकार कमकुवत केला आणि त्याहून वाईट त्याला बाद ठरवले आहे. मानवी बुद्धिमत्तेला माणूस-ईश्वर वा माणसासारखा ईश्वर ही कल्पना आता पचू शकत नाही. आपण ज्याची उपासना करतो तो आपल्या परिघातला असता कामा नये, तो विश्वापेक्षा महान, श्रेष्ठ हवा. ईश्वराची मानवीकरण व शारीरीकरण

केलेली संकल्पना आधुनिक निरीश्वरवादाचे कारण आहे. नैतिक अतिशायी ईश्वराचा आग्रह धरल्याने ही धार्मिक जाणीव व बौद्धिक विचार यांच्यातील दरी लक्षणीयरित्या कमी होऊ शकते.

आज श्रद्धा बाळगण्यातील अचडण स्वतः श्रद्धा नाही. तर कमकुवत, शक्तिहीन, ओजस्वी वा अतिशायी नसलेल्या, मानवीकरण व शारीरीकरण केलेल्या ईश्वराची संकल्पना मानवी बुद्धिमत्तेला आकर्षक वाटत नाही. तरीही यावर एक उपाय आहे. तो म्हणजे कुरआनातील ईश्वर.

कुरआन लोक शोधत असलेला व स्वीकारू शकतील असा प्राधिकारी, ईश्वर प्रदान करतो; सोप्या शब्दांत सांगतो आणि दैवीविषयक जाण लगेच, परिपूर्ण व बुद्धिगम्य होण्यासाठी तर्काने अधोरेखित करतो. तेही अशा पद्धतीने की ते अतिशायी ईश्वर व धर्माविषयी वैश्विक श्रद्धा पुन्हा जिवंत करण्याकामी बायबलपेक्षा जास्त योगदान देऊ शकते. त्याचा सारा जोर एकमेव, ऐक्य, अद्वितीय व अतिशायी ईश्वरावर केंद्रित आहे. तसेच उच्च व शुद्ध स्वरूप जपण्यावर आणि मानवीकरण असलेल्या प्रतिमेस व वर्णनास ठाम नकार देत शारीरिक ईशधारणेचे धोके त्याच्यासारखे कुणीही टाळलेले नाही, तसेच तो उच्च बुद्धिमत्तेसह आणि सारासार विवेकासही साद घालतो. तसेच तो इस्लामी श्रद्धेस जोम प्रदान करणारा करार आहे, ज्यामुळे तो वादातीतपणे गुंतागुंतीच्या निरीश्वरवादी तत्त्वज्ञान आणि धर्माच्या मूलतत्त्वांविषयी व्यापक प्रमाणात पसरलेल्या अश्रद्धा या दोन्ही प्रकारच्या घाल्यांपुढे ठामपणे उभा राहू शकला.

ईश्वराला सर्वशक्तिमान, एकमेव, एकटा व एक, विश्वाचा निर्मिक व त्या पसाऱ्याचा चालक म्हणून पुन्हा स्थापित करण्यापेक्षा दुसरे काहीही कामी येणार नाही.

# लेखकाविषयी

जुल्फिकार अली शाह यांनी धर्मशास्त्र व धार्मिक अभ्यासात वेल्स विद्यापीठातून (इंग्लंड) पीएच.डी. केली आहे. ते धर्मांतील तुलनात्मक अभ्यासात आंतरराष्ट्रीय इस्लामी विद्यापीठ (इस्लामाबाद) येथून एम.ए. झाले आहे. नंतर त्यांनी या दोन्ही विद्यापीठांत शिकवण्याचे कामही केले. तसेच नॉर्थ फ्लोरिडा विद्यापीठातही शिकवले आहे. त्यांना अरबी, इंग्रजी, उर्दूसह पाच भाषा येतात. ते गेली २५ वर्षे आंतरधार्मिक व धर्मांत संवाद साधत आहेत. उत्तर अमेरिकेच्या विविध मुस्लिम संस्थांसाठी धार्मिक संचालक म्हणून काम केले. तसेच आयसीएनएसारख्या अनेक संस्थांसाठी अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. सध्या ते फिक काऊंसील ऑफ नॉर्थ अमेरिकाचे सरचिटणीस आहेत. तसेच मिलवाऊकी इस्लामी सोसायटीचे (विसक्सीन)चे धार्मिक संचालक आहेत. त्यांनी तौलनिक धर्म, धर्मशास्त्र, इस्लाम, कुरआन, हदीस, तुलनात्मक फिक (इस्लामी कायदा), गूढवाद, इस्लामी अभिसंस्कृती, इब्राहिमी धर्म, तसेच समकालीन विषयांवर जगभर व्याख्याने दिली आहेत. त्यांनी असंख्य लेख व अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यात ॲस्ट्रोनॉमिकल कॅलक्युलेशन्स : ए फिक डिसकोर्स या पुस्तकाचाही समावेश आहे.

# संदर्भसूची


१. Francis Bacon, The New Organon and Related Writings, Fulton H. Anderson, ed.(New York: Liberal Arts Press, 1960), p.52.

२. J. Samuel Preus, Explaining Religion (London: Yale University Press, 1987), pp.43–44.

३. David Hume, The Natural History of Religion, H. E. Root, ed. (Stanford: StanfordUniversity Press, 1957), vol. II, p.28.

४. Ludwig Feuerbach, Lectures On the Essence of Religion, Ralph Manheim, trans. (New York: Harper & Row, 1967), p.17.

५. Charles Darwin, The Descent of Man(New York: Appleton & Co., 1962)

६. Claude Lévi-Strauss, The Savage Mind (Chicago: University of Chicago Press, 1966), p.221.

७. Stewart Guthrie, Faces in the Clouds: A New Theory of Religion (New York: Oxford University Press, 1995), p.178.

८. Kevine J. Vanhoozer, Is There a Meaning in This Text? (Michigan: Zondervan, 1998) p.368.

९. http://www.cnn.com/2009/LIVING/wayoflife/03/09/us.religion.less.christian/

१०. Jacob Neusner, The Incarnation of God: The Character of Divinity in Formative Judaism (Philadelphia: Fortress Press, 1988), p.12.

११. Michael Fishbane, Biblical Myth and Rabbinic Myth making (Oxford: OxfordUniversity Press, 2003), p.164.

१२. Neusner, The Incarnation of God, p.15.

१३. Suffrin, A. E. “God,” James Hastings, Encyclopedia of Religion and Ethics, John A. Selbie, ed. (Edinburgh: Kessinger Publishing, 1925-1940), vol.6, p.296. For an Islamic interpretation of the Rabbinic theology see Abu Muhammad Ali ibn Ahmad ibn Hazm al-Zhiri, Al-Fasl fi al-Milal wa al-Ahwa wa al-Nihal (Cairo: Maktabah al-Salam al-alamiyyah, n.d.), vol.1, pp.161 ff.

१४. Isadore Twersky, A Maimonides Reader (New York: Behrman House, 1972), p.420.

१५. Richard E. Friedman, Who Wrote the Bible?(New Jersey: Prentice Hall, 1978), p.28.

१६. Robin L. Fox, The Unauthorized Version: Truth and Fiction in the Bible (New York: Penguin Books, 1992), p.360.

१७. Charles Bigg, The Christian Platonists of Alexandria: The 1886 Bampton Lectures (Oxford: Clarendon Press, 1968), p.102.

१८. Jurgen Moltmann, The Crucified God (New York: Harper & Row, 1974), p.89.

१९. Richard A. Norris, ed. and trans., The Christological Controversy (Philadelphia:Fortress Press, 1980), p.7
२०. John N. D. Kelly, Early Christian Creeds (New York: David McKay Co., 1972), p.72.
२१. Quoted from Norris, The Christological Controversy, p.114.
२२. Alois Grillmeier, Christ in Christian Tradition, John Bowden, trans. (Atlanta: JohnKnox Press, 1975), p.119, p.125.
२३. Arthur C. McGiffert, A History of Christian Thought (New York: Charles Scribner's Sons, 1960), vol.1, p.223.
२४. McGiffert, A History of Christian Thought, vol.1, p.144.
२५. Adolf V. Harnack, History of Dogma, Neil Buchanan, trans. (New York: Dover Publications, 1961), vol.4, p.46.
२६. Harnack, History of Dogma, vol.4, p.47.
२७. W. H. C. Frend, The Early Church (Philadelphia: Fortress Press, 1985), p.157
२८. Paul Tillich, A History of Christian Thought, Carl E. Braaten, ed. (New York: Simon & Schuster, 1968), p.78
२९. Henry Chadwick, The Early Church (New York: Dorset Press, 1967), p.198.
३०. Quoted from Harry A. Wolfson, The Philosophy of the Church Fathers, 3rd edn. (Cambridge, MA: Harvard University Press, 1970), vol.1, p.452.
३१. John N. D. Kelly, Early Christian Doctrines (New York: Harper and Brothers, 1958), p.314.
३२. G. R. Driver, L. Hodgson, eds. and trans., The Bazar of Heraclides Nestorius (Oxford; New York: Clarendon Press, 1925), p.370.
३३. John Hick, ed., The Myth of God Incarnate (Philadelphia: The Westminster Press, 1977), p.5.
३४. Karen Armstrong, A History of God: The 4000-Year Quest of Judaism, Christianityand Islam (New York: Ballantine Books, 1994), p.131
३५. Binyamin Abrahamov, Anthropomorphism and Interpretation of the Qur'an in the Theology of al-Qasim ibn Ibrahim (Boston: Brill, 1996), p.3.
३६. Ismail R. al-Faruqi, al-Faruqi, Lois L., The Cultural Atlas of Islam (New York: Macmillan Publishing Company, 1986), p.100.
३७. Kenneth Cragg, The House of Islam (California: Dickenson Publishing Co. Inc., 1969), p.7.
३८. William M. Watt, Bell's Introduction to the Qur'an (Edinburgh: Edinburgh UniversityPress, 1970), p.37

৩৯. John Burton, The Collection of the Qur'¥n(London: Cambridge University Press,1977), pp.239–40.

৪০. Arthur S. Tritton, Islam, Beliefs and Practices (London: Hutchinson University Library, 1966), p.18. See also Ahmad Ali al-Imam, Variant Readings of the Qur'an: A Critical Study of Their Historical and Linguistic Origins (London: IIIT, 2006).

৪১. Philip K. Hitti, The Near East in History (New York: D. Van Nostrand Co., 1961), p.194.

৪২. John L. Esposito, Islam the Straight Path (New York: Oxford University Press, 1991), p.23.

৪৩. Earnest Gellner, Postmodernism, Reason and Religion (London; New York: Routledge, 1993), p.5.

৪৪. Paul Davies, The Mind of God: The Scientific Basis for a Rational World (London: Simon & Schuster, 1992), pp.231–32.

संक्षिप्त ग्रंथ मालिकेच्या स्वरुपात IIIT ग्रंथ मालिका :

संक्षिप्त स्वरूपातील IIIT ग्रंथ मालिका संस्थेद्वारे सोप्या भोषत प्रस्तुत एक मूल्यवान संकलन आहे. मूळ उद्देश हा आहे की, वाचकांना मूळ ग्रंथाचा परिचय प्राप्त व्हावा व ते वाचण्याची प्रेरणा प्राप्त व्हावी.

वर्तमान काळामध्ये ईश्वराच्या अस्तित्त्वाविषयी व स्वरूपाविषयी जगभरात जोरदार चर्चा होत आहे. विशेषतः चर्चेचा एक मुख्य विषय आहे, 'ईश्वर हा मरण पावला का?' विद्वान लेखक शाह यांनी या विषयी सांगोपांच चर्चा करण्यासाठी विश्वातील प्रमुख धर्म इस्लाम, यहुदी व ख्रिश्चन यांच्या मौलिक तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक विवरण व विश्लेषण केले आहे. त्यामुळे सकारात्मक व नकारात्मक दोन्हीं प्रकारचे विचार समोर आलेले आहेत. विशेषतः इस्लामच्या 'तौहीद' या मूळ संकल्पनेचे यथोचित विश्लेषण व त्याच्या आधारे इस्लाम विरोधी विचारांचे खंडन केलेले आहे. लेखक शाह यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, ईश्वरी विषयीच्याआधुनिक संकल्पने मुळे पूर्वीच्या वास्तविक स्वरूपावर परिणाम झालेला आहे. त्यामुळे ईश्वराचे श्रेष्ठत्व कमी झालेले आहे. ईश्वराविषयीची ऐतिहासिक परंपरा श्रेष्ठ परंपरा आहे. या संबंधी विविध विद्वानांची मते खालील प्रमाणे आहे.

❋ खालिद अबु फज्ल, ऊमर व अजमेराल्डा अल्फी, प्राध्यापक (कायदे विषयाचे), इस्लामिक स्टडीज : यांचे मत :

'मला जुल्फिकार शाहच्या कार्याविषयी पूर्ण माहिती आहे. धर्मांचा तुलनात्मक अध्ययन करणारा प्रत्येक विद्यार्थी किंवा व्यक्ती हा त्यांच्या ग्रंथाचा अभ्यास करून त्यावर आपली प्रतिक्रिया अभिव्यक्त करू शकतो. मी स्वतः त्यांच्या ग्रंथाचे पूर्ण वाचन केलेले आहे. परंतु पुन्हा ते ग्रंथ वाचण्याची इच्छा निर्माण झाली व ज्या नुसार मी ग्रंथाचे रूची पूर्ण वाचन केलेले आहे.'

❋ रेव्हरन्ड रिचर्ड जे स्कल्बा, विकार बिशप, विस्कॉनसिन यांनी केलेले मत प्रस्तुतीकरण :

'शाह यांच्या ग्रंथामध्ये इस्लाम व ख्रिश्चन धर्माची विशेष रूपाने तुलनात्मक चर्चा केलेली आहे. लेखक अलीशाह यांनी विश्वातील प्रमुख धर्म, विशेषतः इस्लाम, ख्रिश्चन व यहुदी धर्म यांच्या धार्मिक आस्थेच्या संदर्भातील मूलतत्त्वांचा खोल अभ्यास करून तुलनात्मक चर्चेच्या आधारे सार प्रस्तुत केले आहे. विशेषतः त्यांनी ख्रिश्चन धर्माविषयी अतिउच्च पदवी पीएच. डी. ग्रहण करण्यासाठी खोल संशोधन केलेले असल्यामुळे या ग्रंथातील त्यांचे विवरण साधार व प्रमाणबध्द आहे. आपली विशेष आवडी नुसार त्यांनी इस्लाम धर्माची व्याख्या ही केलेली आहे. विविध धर्मा बाबतचे हे विवेचन तुलनात्मक आहे.'

❋ ईलीएट आर. वोल्फसन, अब्राहम लिबर मॅन – प्रोफेसर – हिब्रु ज्युडाइक स्टडीज, न्युयॉर्क युनिव्हर्सिटी यांनी प्रस्तुत केलेल विचार :

'तीन महत्वपूर्ण धर्मांच्या आस्थे संबंधी जुल्फेकार अलीशाह यांचा पूर्ण अभ्यास व चिंतन असल्यामुळे त्यांनी केलेले विवेचन हे ऐतिहासिक दृष्टिने अत्यंत महत्त्वाचे आहे. गोंधळलेल्या विचारांना त्यांनी सुव्यवस्थित केलेले आहे. आपण नेहमी आपल्या विचारामध्ये नवीनता व परिवर्तन स्वीकारावयास पाहिजे. अज्ञानामुळे आपण असावध असतो व चुकीच्या विचारांचा स्वीकार करून त्यालाच ठामपणे पकडून राहण्याची आपली प्रवृत्ती असते. या मानसिक स्थितीतून बाहेर येण्यासाठी नवीन विचारांचे स्वागत करणे आवश्यक आहेत. लेखक शाह यांनी अशा प्रकारचेच नवीन विचार आपल्या ग्रंथात प्रस्तुत केलेले आहेत. त्यामुळे स्वतंत्र विचारी प्रवृत्ती निर्माण होते.'

100/-

GENUINE PUBLICATIONS & MEDIA PVT. LTD.
B - 35 (LGF), Nizamuddin West, New Delhi - 110 013
Tel.: +91-11-41827475, 24352732, 24352048
info@genuinepublications.com | www.genuinepublications.com

978- 93- 91659- 24- 0.